योजना,कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक,राजकीय,कौटुंबिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये निर्णयक्षम बनविणे, स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे,स्त्रियांना पुरुषासारखी विकासाची संधी उपलब्ध करून देणे या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हटले जाते.

आर्थिक नियोजनात पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी तरतुदी करण्यात आल्या,यात महिलांच्या कल्याणासाठी प्रोत्साहनपर पर्याप्त सेवा उपलब्ध करणे,महिला व बालकांसाठीच्या विकासाला चालना देणे हा उद्देश्य होता.दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत महिलांच्या कल्याणकारी दृष्टिकोनासोबत श्रम प्रधान शेती क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टिकोनाचा समावेश होता.तसेच समान कामासाठी समान वेतनांची अंमलबजावणी

करण्यासोबतच प्रशिक्षणाची देखील सोय करावी असे सुचविले गेले.तिसऱ्या योजनेत शिक्षणाला मुख्य कल्याणकारी निधीच्या रूपात स्वीकारले गेले.यात सेवांच्या विस्ताराबरोबर आरोग्य,पोषण,परिवार व नियोजन या व्यवस्था करण्याच्या प्रयत्न चालू ठेवला.चौथा योजनेत महिलांचे महत्त्व टिकवून ठेवणे तसेच परिवारात महिलांच्या कल्याणाला प्रोत्साहन देणे यावर भर देण्यात आला.

**निष्कर्ष :-**

1) भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आर्थिक नियोजनाला अनन्य साधारण महत्त्व आहे.

2) दारिद्र्य निर्मूलनासाठी पंचवार्षिक योजनेत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांमुळे आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झाली आहे.

3) प्रधानमंत्री आवास योजनेमुळे शहरी व ग्रामीण भागातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासाला चालना मिळाली आहे.तसेच गरिबांच्या आर्थिक,सामाजिक,सांस्कृतिक विकास होऊन त्यांना प्रतिष्ठेने जीवन जगणे सोपे झाले आहे.

4) महिला सक्षमीकरण धोरणामुळे महिलांच्या दृष्टीकोनात बदल होऊन त्यांना समाजात आदर, सन्मान व प्रतिष्ठा प्राप्त होत आहे.त्यामुळे त्यांच्यात पूर्वीपेक्षा अधिक आत्मविश्वास व साहस निर्माण होऊन त्या सर्वच क्षेत्रात अधिक कणखरपणे वावरताना दिसून येतात.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) रंजन कोळंबे, भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, जानेवारी 2022 पृष्ठ क्र.56,80,427,428

2) विकास समर्पित मासिक योजना - एप्रिल 2014

3) प्रा.डॉ.गजेंद्र कढव, लेख, Journal Of Emerging Technologies And Innovative Resrarch फेब्रुवारी 2020 पृष्ठ क्र.106,107.

4) https://mr.mwikipedia.org, विकिपीडिया.

ISSN : 2278-9308
February 2024

# आर्थिक विकास आणि महिला सबलीकरण

**मुयरी सुरेश टवाळे**
संशोधक विद्यार्थी (एम.ए.सेट अर्थशास्त्र) (कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालय तळोदा जि.नंदुरबार)
**प्रा.डॉ.पी.आर.बोबडे**
मार्गदर्शक (एम.ए.पी.एचडी.नेट,सेट) (कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालय तळोदा जि.नंदुरबार)

**प्रस्तावना :-**

विकसनशिल देशाचा विकास आणि महिलांचा विकास त्यांच्या अत्यंत जवळचा संबंध आहे. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची एकुण लोकसंख्या 121 कोटी इतकी होती त्यापैकी महिलांची संख्या ही 58 कोटी 64 लाख इतकी आहे. एकुण लोकसंख्येमध्ये पुरुषांचे प्रमाण 52 प्रतिशत आणि महिलांचे प्रमाण 48 प्रतिशत इतके आहे. म्हणजेच महिलांची संख्या जवळ जवळ निम्मे आहे. महिला सबलीकरणासाठी केंद्रशासन, राज्यशासन सातत्याने प्रयत्न करीत आहे. महिलांना त्यांच्या हक्क आणि अधिकार याची जाणीव करुन देणे आवश्यक आहे महिलांना त्यांचे हक्क व अधिकार प्राप्त करुन देण्यासाठी व त्यांना संरक्षण देण्यासाठी अनेक घटनात्मक कायदे तयार करण्यात आलेले आहे. भारत सरकारने 2001 हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष म्हणुन जाहीर केले त्यानिमित्ताने महिलांच्या आर्थिक परिस्थीतीचा आढावा घेण्यात आला. भारतातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांनी केलेली सकारात्मक प्रगती केंद्रस्थानी ठेवुन तात्कालीन प्रंतप्रधानांनी स्त्रीशक्ती पुरस्कार देण्यास सुरुवात केली. 1975 हे वर्ष संयुक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणुन घोषीत केले 8 मार्च हा दिवस जगभरात जागतिक महिला दिन म्हणुन दरवर्षी साजरा केला जातो या सर्व गोष्टींमागे महिलांचे सबलीकरण व्हावे हा एकमेव उद्देश आहे.भारतीय राज्यघटनेने बहाल केलेला समानतेचा मुलभूत हक्क हा महिलांच्या विकासाचा भक्कम पाया आहे. सरकारने 1990 साली राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय महीला आयोगाची स्थापना केली.

**शोधनिबंधाचा उद्देश :-**

1. आर्थिकदृष्ट्या महिलांना स्वालंबी बनविणे.
2. महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविणे.
3. आर्थिक व्यवहार आणि संपत्तीमध्ये सहभागी करुन घेणे.
4. महिला सबलीकरण संकल्पनेचा अभ्यास करणे.
5. महिलांना प्रशिक्षीत व संघटीत करुन त्यांना रोजगाराचा संधी उपलब्ध करुन देणे व त्यातुन त्यांच्या आर्थिक विकास करणे.

**माहिती संकलन पध्दती :-**

सदर अध्ययनसाठी दुय्यम स्त्रोतांद्वारे माहीती संकलन केले आहे. महिला सबलीकरण या विषयावर आधारीत प्रकाशित झालेल्या विविध पुस्तकांधमुन माहीती प्राप्त केलेली आहे.

**गृहित कृत्ये :-**

1. आर्थिक संक्षमतेमुळे महिलांचे सबलीकरण घडुन येते.
2. बचतगट योजनेमुळे महिला स्वावलंबी बनतात.

**महिला सबलीकरणाची संकल्पना :-**

महिला सबलीकरण म्हणजे प्रत्येक स्त्रीला स्वत:ची ओळख करुन देणे होय. महिला सबलीकरण स्त्री अधिकाराचा पुरस्कार करणारी संकल्पना आहे. लिंगभेदांवर आधारलेली विषम समाज रचना नष्ट करुन समतेवर आधारीत समाजव्यवस्था महिला सबलीकरणात अपेक्षीत असते. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय हक्क मिळवुन देणे म्हणजे महिला सबलीकरण होय. थोडक्यात समाजात स्त्रीयांना अपेक्षीत ठेवणाऱ्या शक्तींमध्ये मतपरितर्वन घडवुन स्त्रीयांच्या विचारांना नवीन दिशा देणे, दृष्टीने देणे महिला सबलीकरणात अपेक्षीत आहे.

**महिलांचे आर्थिक सबलीकरण :-**

भारतातील ग्रामीण भागातील बहुसंख्य महिला घरकामास गुंतलेल्या आहेत कोणत्याही व्यक्तींचा समाजांमध्ये माणूस म्हणुन जगावयाचे असेल तर आर्थिक स्वावलंबन आवश्यक आहे. स्त्रीयांच्या आर्थिक स्थीती बाबत मार्केस म्हणतात की, उत्क्रांतीच्या टप्प्यावरुन पुढे सरकत असतात आणि रानटी अवस्थेतुन सांस्कृतीक अवस्थेपर्यंत येतात उत्पादन साधने विकसित होत गेली त्यानंतर खाजगी मालमत्ता ही संकल्पना रुढ झाली आणि संपत्तीवरील इतर हक्क पुरुषांकडे गेले.एन्जेल्स म्हणतो की, जस जशी संपत्ती वाढली तसतसा पुरुषांचा कौटूंबीक आणि सामाजिक दर्जा स्त्रायांच्या तुलनते उंचावला यातुन स्त्रीया लेखी दुय्यम दर्जा प्राप्त झाला वरील संदर्भानुसार वेतनासंबंधी भेदभाव स्वयंरोजगार अर्थसहाय्याचा अभाव विना वेतन काम व बरोजगारी, कुटीर, उद्योगात मालकी हक्क नाही. अशा अनेक कारणांमुळे स्त्रीयांचे आर्थिक स्थान पुरुषांपेक्षा दुय्यम राहीलेले दिसले. महिलांना स्वयरोजगाराचा संधी उपलब्ध करुन देवुन आर्थिक दृष्ट्या महिला समक्षीकरण करणे हा या प्रक्रियेचा उद्देश आहे. महिलांना आर्थिक अधिकार मिळवुन देणे. उत्पादन प्रक्रियेत सहभाग करुन घेणे या गोष्टी केल्या तरच राष्ट्राचा विकास होईल.

महिलांच्या आर्थिक सुरक्षेसाठी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत अनेक तरतुदी आहेत राष्ट्रीय ग्रामीण उपजिविका कार्यक्रम म्हणजे एनआरएलएम मध्ये ग्रामीण महीलांना आर्थिक सुरक्षा व समक्षीकरणाची संधी दिलेली आहे. राष्ट्रीय महिला कोष योजनेत गरीब महिलांना नियमित निधी दिला जातो. महीला ई-हाट योजना ही सुरु केली असुन त्यात महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन दिले जाते.इंटनेट उद्योग व्यवस्था डिजिटल इंडिया उपलब्ध केली असुन त्यातही महिलांना उद्योजगतेत प्राधान्य व आर्थिक विकासात त्यांच्या समावेश करण्याचा प्रयत्न आहे. प्रधानमंत्री जनधन योजनेत लाखो महिलांचे बँक खाते सुरु करण्यात आले त्यातुन गरीब व दारीद्रयाचे दुष्टचक्र संपवण्याची अपेक्षा आहे. भारतात जवळजवळ 47 टक्के महिलांची बँक खाती उपलब्ध आहेत. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेत दारिद्रयातुन बाहेर पडण्यासाठी रोजगार उपलब्ध करुन दिले जातात त्यामध्ये महिलांना मोठ्या प्रमाणात संधी आहे. सुकन्या समृध्दी योजना बेटी बचाओ, बेटी पढाओ अंतर्गत राबवली असुन त्यात जुन 2019 मध्ये 86 लाख खाती सुरु करण्यात आली.

महिलांचे बचतगट स्थापन करुन बचत गटाचा माध्यमातुन 4% दराने कर्ज देण्याचा महत्तपुर्ण निर्णय शासनाने घेतला आहे त्यामुळे त्यांच्या आर्थिक विकास तर होत आहे परंतु त्यांच्या आर्थिक विकासालाही त्यांच्या हातभार लागत आहे तसेच शिक्षणाची संधी व त्यासाठी आवश्यक असे पोषक असे वातावरण त्यामुळे महीलांना स्वयंरोजगाराचा विविध संधी उपलब्ध झाल्या आहेत. विविध योजनांमुळे आता महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. महाराष्ट्रात महिला स्वयसहाय्यता बचत गटाची फारच मोठी चळवळ उभी राहीली असल्यामुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासस सक्षमीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

आर्थिक सक्षमीकरणाचा दिशेने सुध्दा त्यांनी काही तरतुदी केल्या महिला व पुरुष यांच्या पगारात तफावत होती ती दुर करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 8 फेब्रुवारी 1944 ला मुद्दा उपस्थित करुन मिहिलांना अधिकार

देवुन त्यांना समान संधी देवुन समाज कामासाठी समान मजुरी मिळण्याचा महत्तवाचा पुरस्कार केला कामाचा ठिकाणी सुरक्षितता असावी प्रसुती रजा, मिळावी, पाळणाघराची सोय, मताधिकाराचे स्वातंत्र्य असावे अश्या प्रकारे स्त्रियांनाही अर्थजनाचे स्वातंत्र्य असावे त्यांचे आरोग्य चागले राहुन त्यांनी तणावमुक्त वातावरणात काम करावे आर्थिक स्वातंत्र्यामुळे स्त्रीची कौटूंबीक व सामाजिक प्रतिष्ठा वाढते व ती आत्मोध्दासाठी तयार होते म्हणुन त्यांनी आर्थिक क्षेत्रातले स्वांत्र्य मिळवुन देण्याचा प्रयत्न बाबासाहेबांनी केला, स्त्री दर्जा उंचावणे व समाजात त्यांना योग्य स्थान प्राप्त करुन देणे. त्यांचा त्यामागील उद्देश होता 1942 च्या महिला परिषदेत आपल्या भाषणातून डॉ.बाबासाहेब म्हणाले मुला-मुलींचे लग्ने लवकर करुन नका त्यांना आपल्या पायावर उभे राहु द्या पत्नी ही पतीशी समान अधिकार असलेली गृहीणी असली पाहीजे. नवऱ्याची गुलाम होता कामा नये कुटूंब नियोजनाची जबाबदारी स्त्री पुरष दोघांचीही आहे.

प्रस्तुत शेध निबंधमध्ये महिलांच्या बदलत्या आर्थिक स्थीतीचा अभ्यास केला असता असे निदर्शनास आले महिला सबलीकरण करण्यसाठी त्यांना उत्पन्नाचे स्वातंत्र्या साधन मिळाले पाहीजे त्या साक्षर झाल्या पाहीजे, त्यांचे आरोग्य सुधारले पाहीजे, त्यांना स्वत: बचत करुन स्वत:च्या जोरावर मत मिळाले पाहीजे, पर्यावरण ऱ्हास रोखण्याचा कार्यात त्यांना सहभाग करता आला पाहिजे. त्याचप्रमाणे आरोग्याच्या बाबतीत भर हा महिला जननक्षमता कमी करणे आणि आता एड्सवर नियंत्रण आणणे या महत्वाचा कार्यक्रमा अंतर्गत स्त्रियांमार्फत समाजात परिवर्तनाची नवि दिशा मिळते.

**निष्कर्ष :-**

1. महात्मा फुले, डॉ.आबेडकर, स्त्री-पुरष समानतेचे पुरस्कर्ते होते.
2. महिला सबलीकरणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे.
3. महिला योजना व बचत गटामुळे महिलांचे आर्थिक उत्पन्न वाढले.
4. स्त्री-पुरुष समानता निर्माण होते.

**संदर्भ सुची :-**

1. प्लॅटिनम, आधुनिक महिला सबलीकरण अथर्व पब्लिकेशन
2. प्राचार्य, डॉ.संभाजी देसाई, महिला सबलीकरण, प्रशांत पब्लिकेशन
3. संपादक, डॉ.मधुकर व्ही पाटील, महिला सबलीकरण अथर्व पब्लिकेशन
4. इंटरनेट
5. 5) प्रा.डॉ.अशोक बापुराव देवाकर अर्थशास्त्र विभाग प्रमुख ता.आरटी जि.बीड गामीण महिलांचे आर्थिक सबलीकरण एक आढावा
6. डॉ.झामरे जी.एन. भारतीय अर्थशास्त्र व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, पिंपाळपुरे, प्रकाशन (2005)

# महिला सशक्तिकरण: संधी आणि आव्हाने

**श्री. रामराव विठ्ठल पाटील**
M.A(.Edu.),B.Ed.,SET
**प्रा.डॉ.अर्चना पुंडलिकराव भोसले**
M.A,B.Sc.,M.Ed.,SET,PhD ( प्राचार्य ओम साई कॉलेज ऑफ एजुकेशन शिरसोली,जळगाव)

**सारांश:**

निसर्गतः जन्माने सर्व मानव जात ही समान आहे. कारण जन्मतः सर्वांना बुद्धी समान असते.स्त्री पुरुष अशा प्रकारचा कुठलाही भेदभाव नसतो. म्हणून अगदी प्राचीन काळापासून स्त्री ही पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून सर्व क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे. अगदी प्राचीन काळापासून जेव्हापासून मनुष्य शेती करू लागला, तेव्हापासून अगदी इसवीसनपूर्व दहा हजार ते रामायण काळ, महाभारत काळ म्हणजेच पूर्व वैदिक संस्कृती व वैदिक काळ यातही स्त्रियांच्या कामगिरीचा ठसा पाहायला मिळून येतो. प्राचीन इतिहासामध्ये मैत्रेयी, गार्गी या स्त्रियांच्या उल्लेखनीय कामगिरीवरून स्त्री ही सर्व क्षेत्रांमध्ये अग्रेसर आहे हे दिसून येते. प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये अशाप्रकारे स्त्रियांचे उल्लेखनीय कार्य आढळून येते तसेच प्राचीन भारतीय इतिहासामध्ये राजकीय क्षेत्रात रजिया सुलताना सारखी स्त्री तसेच मध्ययुगीन भारताच्या इतिहासामध्ये महाराष्ट्रामध्ये राजमाता जिजाऊ यांचा उल्लेख व कामगिरी आपणास दिसून येते.आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये तर स्वातंत्र्यलढयामध्ये स्त्रियांनी भाग घेतल्याचे दिसून येते. 1817 चे स्वातंत्र्यसमर यामध्ये बेगम हजरत महल,झाशीची राणी आदी महिलांचे प्राबल्य दिसून येते . त्यानंतर समाजसुधारणा विषयक कार्यांमध्ये सुद्धा स्त्रियांचे कार्य दिसून येते.भारताच्या आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले,फातिमा बेगम यांचे कार्य उल्लेखनीय आहे.क्रांतिकार्यामध्ये विविध स्त्रियांचे कार्य उल्लेखनीय आहे. उषा मेहता, प्रीती लता वड्डेदार यांसारख्या स्त्रियांचे कार्य तर क्रांतिकारकांसारखे दिसून येते. सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी यांचे कार्य सुद्धा उल्लेखनीय आहे. एकूणच सामाजिक,राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये भारतीय इतिहासाच्या परंपरेमध्ये स्त्रियांचे कार्य हे उल्लेखनीय दिसून येते यावरून स्त्री ही सर्व क्षेत्रांमध्ये कार्य करण्यासाठी सक्षम आहे हे समजते.

**प्रस्तावना :**

भारतीय राज्यघटनेनुसार सर्व नागरिकास समान नागरी हक्क देण्यात आलेले आहेत.त्या स्त्री पुरुष असा कुठलाही भेदभाव करण्यात आलेला नाही. परंतु भारतीय स्वातंत्र्यानंतर विविध क्षेत्रांमध्ये स्त्रियांची उल्लेखनीय कामगिरी,त्यांचे सक्षमीकरण व त्यांच्या सक्षमीकरणापुढील आव्हाने हे भेडसावणारी आहेत.कारण अजूनही स्त्रियांच्या प्रगतीस मारक ठरतील अशा विविध घटना परिस्थिती यांचा उद्भव होत आहे. अजूनही शंभर टक्के स्त्रियांचा विकास हा सर्व क्षेत्रांमध्ये झालेला दिसून येत नाही. राजकीय,सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाची मोहोर उमटवलेली आहे,परंतु त्यांच्या विकासासंदर्भात मात्र शंभर टक्के उन्नती दिसून येत नाही.भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध कायदे केलेले आहेत. योजना राबविले आहेत. तसेच भारतीय संविधानामध्ये सुद्धा त्यासंदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे.परंतु सर्व योजनांच्या अंमलबजावणीच्या संदर्भात अडचण निर्माण होऊन अगदी स्त्रियांच्या संदर्भाने विचार करता आजही भारतातील सर्व राज्यांचे व राज्यातील जिल्ह्यांचे लिंग गुणोत्तर हे समाधानकारक दिसून येत नाही. सन 2011 मध्ये झालेल्या जनगणनेनुसार देशाचे लिंग गुणोत्तर,राज्यांचे लिंग गुणोत्तर व जिल्ह्यांचे लिंग गुणोत्तर तसेच वरील स्तरावर बाल लिंग गुणोत्तर यामध्ये मोठी तफावत दिसून येते.म्हणजेच अजूनही स्त्री ही सक्षम झालेली नाही. हे दिसून येते. लिंग

गुणोत्तरातील तफावत हेच सांगून देते की आजही स्त्री ही जन्मापासून सुरक्षित नाही.विविध क्षेत्रांमध्ये तिच्या विकासात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे आणि त्यावरून त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये किती यश संपादन केले हे तपासणे आणि त्यांच्या यशप्राप्तीमध्ये येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

सदरील संशोधनातून महिलांचा विविध क्षेत्रातील विकास अभ्यासणे.

महिलांच्या विविध क्षेत्रातील विकासातील अडचणींचा अभ्यास करणे.

महिला सबलीकरणाच्या योजनांचा अभ्यास करणे व अंमलबजावणीतील अडचणी तपासणे.

महिलांच्या संदर्भातील कायद्यांचा अभ्यास करून महिलांची सद्यस्थिती अभ्यासणे.

महिला सक्षमीकरणासमोरील आव्हानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

सदरील संशोधनासाठी दुय्यम माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे.सदरील संशोधन हे महिलांचे संदर्भात व्यापक स्वरूपातील असून विविध क्षेत्रांचा अभ्यास हा संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे, मासिके, माहितीपत्रे, भारतीय जनगणना 2011, आर्थिक सर्वेक्षण यांतून केलेला आहे.

**विश्लेषण व चर्चा :**

महिलांचा सहभाग क्षेत्र

**राजकीय क्षेत्र:**

राजकीयक्षेत्रामध्ये प्राचीन काळामध्ये सुद्धा भारतीय स्त्रियांचा सहभाग होता.अगदी स्वातंत्र्योत्तर काळामध्ये सुद्धा माननीय राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील या भारताच्या सर्वोच्च नागरी पदावर विराजमान झाल्या.तसेच भारताच्या पंतप्रधान म्हणून माननीय इंदिरा गांधी यांनी सुद्धा विराजमान होऊन सबळ कारकीर्द पार पाडली. त्यांच्याच काळात 42 वी व 44 वी घटना दुरुस्ती ही सुद्धा करण्यात आली.त्याच काळात दारिद्र्य निर्मूलनाच्या योजना राबविण्यात आल्या.तसेच मुख्यमंत्री म्हणून सुचिता कृपलानी यांचा सुद्धा उल्लेख करावा लागतो.विभिन्न राज्यांच्या मुख्यमंत्रीपदी स्त्रियांचे योगदान आहे. अगदी अलीकडील काळामध्येच लोकसभा व राज्यसभा यांच्यामध्ये महिलांचे 33 टक्के आरक्षण दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये तर महिलांसाठी 50 टक्के राखीव जागा ठेवण्याचे धोरण राबवण्यात आलेले आहे. त्यानुसार अगदी ग्रामपंचायतीवर सरपंच पदी सुद्धा आज रोजी महिला या विराजमान झालेल्या दिसून येतात. एकूणच भारतीय इतिहासामध्ये राजकीय क्षेत्रामध्ये सुद्धा यांनी आपले वर्चस्व उमटवले आहे. तसेच विविध राजकीय पक्षांच्या अध्यक्षपदी सुद्धा स्त्रिया आहेत. यामध्ये तृणमूल काँग्रेसचे अध्यक्ष ममता बॅनर्जी त्याचप्रमाणे उमा भारती, मायावती,जय ललिता(अम्मा) यांचा उल्लेख करावा लागेल.

**आर्थिक क्षेत्र:**

आर्थिक क्षेत्रामध्ये इंद्रानुई(c.e.o. PepsiCo ), सुधा मूर्ती ( लेखिका), चंदा कोचर(M.D.ICICI) यांसारख्या स्त्रियांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. सेल्फ हेल्प ग्रुपच्या मदतीने ग्रामीण भागातील स्त्रियांचे आर्थिक समावेशन करण्यात आलेले आहे. भारताच्या अर्थमंत्री या सुद्धा एक स्त्रीच आहेत. माननीय निर्मला सीतारामन यांनी नुकताच भारताचा अंतरिम अर्थसंकल्प सादर केलेला आहे. यावरून भारतीय स्त्रियांचे आर्थिक क्षेत्रामधील प्रगती दिसून येते.

**सामाजिक क्षेत्र:**

सामाजिक क्षेत्रामध्ये स्त्रियांनी आपले कर्तव्य अगदी जबाबदारीने पार पडलेले दिसून येते. अनुताई वाघ, ताराबाई मोडक, सिंधुताई सपकाळ, अरूंधती रॉय आदींसारख्या स्त्रियांनी सामाजिक कार्यामध्ये सहभाग घेऊन आपले प्रतिबिंब उमटवलेले दिसून येते.

ISSN : 2278-9308
February 2024

**शैक्षणिक क्षेत्र:**

इतर क्षेत्राप्रमाणेच शैक्षणिक क्षेत्रात सुद्धा स्त्रियांनी उच्चपदे बसवलेली आहेत.यामध्ये पहिल्या महिला आयपीएस अधिकारी किरण बेदी, मीरा बोरवणकर, मंदाकिनी आमटे, कुसुमताई कर्णिक, रेणू गावस्कर, रेणू दांडेकर आदींचा उल्लेख करता येईल. नुकत्याच उत्तराखंड राज्याच्या मुख्य सचिव म्हणून राधा रातुरी यांची निवड झाली. सर्वेक्षणानुसार आयआयटी,आयआयएम,तसेच मेडिकल क्षेत्रामध्ये मुलींचा उच्चांक दिसून येतो. इयत्ता दहावीच्या निकालामध्ये उत्तीर्णचे प्रमाण मुलींचे अधिक दिसून येते.यावरून शिक्षण क्षेत्रामध्ये सुद्धा स्त्रियांच्या सहभाग हा मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे.

**सांस्कृतिक क्षेत्र:**

सांस्कृतिक क्षेत्राचा विचार करता स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळ या दोन्हींमध्ये महिलांची नृत्य, गायन, वादन या क्षेत्रामध्ये विशेष प्रगती दिसून येते. भारताची गानसम्राज्ञी म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो अशा मा.लता मंगेशकर या सर्वोच्च भारतरत्न पुरस्काराने सन्मानित झालेल्या आहेत. आशा भोसले, उषा उत्तप, अनुराधा पौडवाल, अलका याग्निक यांनी गायन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावलेली आहे. गायिका एम. एस. सुब्बलक्ष्मी यांना 1998 सर्वोच्च भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.अभिनय क्षेत्रामध्ये सुलोचना चव्हाण, सुलोचना लाटणकर तसेच विविध अभिनेत्रींचा उल्लेख करता येईल.

**क्रीडा:**

क्रीडा क्षेत्रामध्ये सुद्धा स्त्रियांनी आपली उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे सुवर्णपदक विजेत्या कर्णम मल्लेश्वरी, पी टी उषा,सायना नेहवाल, सानिया मिर्झा मीराबाई चानू, मेरी कोम अशा विविध स्त्रियांचा उल्लेख करता येईल.

**महिलांची स्थिती**

**लिंग गुणोत्तर:**

भारत देशाचा लिंग गुणोत्तराचा विचार करता देशाचे लिंग गुणोत्तर 943 आहे. तर महाराष्ट्र 929 आहे.म्हणजेच 2011 च्या जनगणनेनुसार लिंग गुणोत्तरात तफावत दिसून येते म्हणजे दर हजारी पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण अजूनही कमी आहे. यावरून स्त्रियांविषयी त्यांच्या आरोग्याविषयी जागरूकता झाल्याचे दिसून येत नाही.

**बाल लिंग गुणोत्तर:**

देशाच्या बाल लिंग गुणोत्तराचा विचार करता भारत देशामध्ये बाल लिंग गुणोत्तर 918दिसून येते. यावरून स्त्रियांच्या जन्माच्या वेळचे प्रमाण हे भयावह कमी आहे. त्यातही महाराष्ट्र राज्याचे 894 व त्यातील बीड जिल्ह्याचे बाललिंग गुणोत्तर हे सर्वात कमी 807 आहे. यावरून स्त्रीभ्रूणहत्येचा प्रश्न दिसून येतो.

**कौटुंबिक स्थिती:**

आजही स्त्रियांचे कुटुंबातील स्थान हे महत्त्वाचे असून विविध कार्यांमध्ये स्त्रिया या भाग घेत असतात.घराच्या आर्थिक नियोजनामध्ये तसेच दैनिक कामकाजामध्ये स्त्रियांचा सहभाग आहे. ग्रामीण भागामध्ये स्त्रिया शेती व तत्सम कार्यांमध्ये गुंतलेल्या आहेत तर तृतीय क्षेत्रामध्ये व सेवा क्षेत्रांमध्ये स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत आहेत.

**महिलांसाठी योजना व कायदे:**

कौटुंबिक हिंसाचार अधिनियम 2005:

यामुळे महिलांच्या कौटुंबिक हिंसाचारातील समस्यासोडवण्यासाठी व स्त्रियांचे संरक्षण करण्यासाठी भारत सरकारने कायद्याची तरतूद केलेली आहे.

पोक्सो कायदा 2012:

पोक्सो कायद्याअंतर्गत बाल महिलांचे संरक्षण करण्यासाठी सशक्त प्रकारच्या कायद्याची योजना करण्यात आलेली आहे. या कायद्याअंतर्गत अठरा वर्षाखालील बाल महिला लैंगिक अत्याचाराला आळा घालण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

बाल हक्का अधिनियम 2005:

लिंगभाव आधारित अर्थसंकल्प:

लिंगभाव आधारित अर्थसंकल्पाची योजना 2005-06 पासून भारत सरकारने महिलांच्या सबलीकरणासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

**महिला कल्याण योजना:**

कामकाजी महिला छात्रावास. बेटी बचाओ बेटी पढ़ाओ (बीबीबीपी) · महिला शक्ति केंद्र (एमएसके) · प्रधानमंत्री मातृ वंदना योजना ,सुकन्या समृद्धि योजना. प्रधान मंत्री उज्ज्वला योजना · फ्री सिलाई मशीन योजना · फ्री आटा चक्की वितरण योजना

**भारतातील महिला सक्षमीकरण योजना:**

– महिला बचत गट (SHG) योजना:

महिला SHG योजना ही एक सरकारी योजना आहे ज्याचा उद्देश गरीब कुटुंबातील महिलांना आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे. महिला स्वयंसहाय्यता गटांची स्थापना स्थानिक स्तरावर केली जाते, आणि या योजनेचा उद्देश भारतातील महिलांना उपजीविका मिळविण्यात मदत करून सक्षम करणे आहे. महिला बचत गटांना देशाच्या विविध भागात महिला मंडळे म्हणूनही ओळखले जाते.

-महिला उद्योजकता निधी योजना: महिला उद्योजकता निधी योजना 2020 मध्ये भारत सरकारने सुरू केली होती. ज्या महिला उद्योजकांना व्यवसाय सुरू करण्याची इच्छा आहे परंतु व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक निधी नाही त्यांच्यासाठी महिला उद्योजकता निधी योजना उपयुक्त ठरू शकते. ज्या महिलांना या योजनेचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी वुमन स्टार्टअप हब पोर्टलद्वारे अर्ज करावा.

– प्रधानमंत्री मातृ वंदना योजना:

प्रधानमंत्री मातृ वंद आना योजना ही 2019 मध्ये सुरू करण्यात आलेली एक सरकारी योजना आहे. या योजनेचे उद्दिष्ट गरोदर आणि स्तनदा महिला किंवा मातांना आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे जेणेकरून ते त्यांच्या आरोग्याची आणि त्यांच्या मुलांच्या आरोग्याची काळजी घेऊ शकतील. या योजनेत गरोदर आणि स्तनदा महिलांना 6000 रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. महिलांना त्यांच्या पहिल्या मुलाच्या जन्मादरम्यान फक्त एकदाच या योजनेचा लाभ घेता येईल. ज्या महिलांनी मुलीला जन्म दिला आहे किंवा ज्या महिलांना मृत जन्म झाला आहे किंवा ज्या महिला दुसऱ्यांदा गर्भवती आहेत त्यांनाही या योजनेचा लाभ घेता येईल.

– महिला आणि बाल विकास (WCD) मंत्रालयाच्या योजना:

भारत सरकारच्या महिला आणि बाल विकास मंत्रालयाने महिला आणि बालकांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या योजनांचा उद्देश महिलांना आर्थिक सहाय्य प्रदान करणे आणि त्यांच्या मुलांना योग्य शिक्षण आणि आरोग्य सेवा देऊन त्यांना चांगले जीवन जगण्यास मदत करणे आहे.

- बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना:

बेटी बचाओ बेटी पढाओ योजना ही एक सरकारी योजना आहे जी 2015 मध्ये सुरू करण्यात आली होती. या योजनेचा उद्देश मुलींना वाचवणे आणि तिला शिक्षित करणे हा आहे. मुलीला जन्म दिलेल्या आर्थिक दुर्बल वर्गातील महिला या योजनेचा लाभ घेऊ शकतात. या योजनेसाठी महिलांनी त्यांच्या संबंधित राज्य सरकारच्या महिला आणि

बाल विकास (WCD) विभागांमार्फत अर्ज करावा. त्यांची मुलगी प्रौढ होईपर्यंत महिलांना या योजनेचा लाभ घेता येईल.

- सुकन्या समृद्धी योजना:

सुकन्या समृद्धी योजना ही एक सरकारी योजना आहे जी 2015 मध्ये सुरू करण्यात आली होती. या योजनेचा उद्देश मुलीला आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे जेणेकरून ती तिचे शिक्षण घेऊ शकेल आणि तिची स्वप्ने पूर्ण करू शकेल. ज्या महिलांना मुलगी आहे त्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. या योजनेसाठी महिलांनी त्यांच्या संबंधित राज्य सरकारच्या महिला आणि बाल विकास (WCD) विभागांमार्फत अर्ज करावा. त्यांची मुलगी २१ वर्षांची होईपर्यंत महिला या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

- इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना:

इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना ही एक सरकारी योजना आहे जी 2010 मध्ये सुरू करण्यात आली होती. या योजनेचा उद्देश समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आणि पहिल्यांदा गर्भवती असलेल्या महिलांना आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे. ज्या महिलांनी या योजनेसाठी अर्ज केला आहे ते त्यांचे मूल दोन वर्षांचे होईपर्यंत याचा लाभ घेऊ शकतात.

-महिला शक्ती केंद्र योजना :

ही योजना मार्च 2017 मध्ये रु. 500 कोटी खर्चासह सुरू करण्यात आली होती. देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये महिला सक्षमीकरण केंद्रे उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. ही केंद्रे महिलांसाठी सरकारी योजना आणि कार्यक्रमांची माहिती आणि प्रवेश, आरोग्य आणि पोषण सेवा, कायदेशीर मदत, आर्थिक समावेश सेवा, कौशल्य विकास प्रशिक्षण इत्यादींसह वन-स्टॉप सेवा प्रदान करतील.

**महिलांच्या समस्या:**

आर्थिक:

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवण्यात आलेल्या आहेत. परंतु तरीसुद्धा महिलांच्या आर्थिक विकासासंदर्भात अडचणी दिसून येतात. घरातील आर्थिक व्यवहारांमध्ये महिलांचे समावेशन त्या प्रमाणात दिसून येत नाही. कुटुंबाचा कर्ता हा पुरुष असल्यामुळे घरातील सर्व आर्थिक व्यवहारांची जबाबदारी ही पुरुषाकडे असते. तेव्हा जमिनीच्या मालकी हक्क विषयक मालक म्हणून पुरुष दिसून येतात.

राजकीय:

राजकीय क्षेत्रामध्ये विविध स्त्रियांचे वर्चस्व दिसून येते परंतु खरी सत्ता ही पुरुषाकडेच एकवटल्याचे अजूनही दिसून येते. कारण ग्रामीण स्तरावर गावाच्या प्रथम नागरिक जर या महिला असल्या तरी सरपंच या पदाची कार्य सरपंच पतीच बराच वेळा निभवताना दिसून येतात. तसेच विविध नगरपालिका, नगरपरिषदा विधानसभा, लोकसभाचे सदस्य यांचे राजकीय कार्य सुद्धा त्यांच्या पतीकडूनच प्रभावित होताना दिसून येते.

सामाजिक सांस्कृतिक क्षेत्र:

सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये स्त्रियांचा वाटा उल्लेखनीय आहे. परंतु स्त्रियांचे लैंगिक शोषणाचा प्रकार सुद्धा निदर्शनास येतो. यामधून मी टू सारख्या मोहिमेच्या माध्यमातून स्त्रियांवरील शोषणाचे चित्र निदर्शनास येते.

शैक्षणिक क्षेत्र:

शिक्षण क्षेत्रामध्ये विविध उच्च पदांवर स्त्रिया विराजमान होताना दिसून येत असल्या तरी प्राथमिक स्तरावर शिक्षण घेत असताना गळतीचे प्रमाण हे मुलींचेच मोठ्या प्रमाणावर दिसून येते. कारण ग्रामीण व दुर्गम भागामध्ये

मुलींच्या शिक्षणासंदर्भात अजूनही उदासीनता दिसून येते. बऱ्याच वेळा ग्रामीण भागातील पालक हे मुलींना घरकाम व भावंडे सांभाळणे यासाठी शिक्षणापासून वंचित ठेवताना किंवा पुरेशी लक्ष न देताना दिसून येतात.

कौटुंबिक अत्याचार:

स्त्रियांवरील अत्याचारांच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या खेरीज सुद्धा स्त्रियांवर अत्याचार होतानाच्या घटना दिसून येत आहेत. यावरूनच कायद्याची सक्षमता ही पुरेशी नाही हे दिसून येते. आरुषी तलवार हत्याकांड,निर्भय प्रकरण यावरून हिंसाचाराच्या घटना दिसून येतात.

**निष्कर्ष:**

सदर संशोधनातून हे निदर्शनास येते की विविध क्षेत्रांमध्ये स्त्रियांची प्रगती ही होत आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा या क्षेत्रांमध्ये महिलांचे सशक्तिकरण होत असून त्यांचा विकास होत आहे. तसेच महिला स्वतःचा उत्कर्ष करून घेण्यासाठी जागरूक आहेत. त्या अनुषंगाने कायदे व भारतीय राज्यघटना यामध्ये सुद्धा विशेष तरतुदी भारत सरकारने केलेल्या दिसून येतात. परंतु हे होत असताना पुरुषप्रधान संस्कृती आपल्या देशात असल्यामुळे व ग्रामीण भागातील व अशिक्षित महिला स्वतःच्या हितांविषयी जागरूक नसल्यामुळे त्यांच्या विकासास अद्यापही अडचणी येत आहेत. कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना ह्या सुशिक्षित कुटुंबांमध्ये सुद्धा दिसून येत आहेत. यावरूनच कायद्याचा फोलपणा निदर्शनास येतो. सदर संशोधनातून महिला सशक्तीकरणासाठी कायद्यांची कडक अंमलबजावणी होणे, महिलांच्या स्व विकासासाठी पुनर्जागृती करणे, त्यांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे हे दिसून येते.

**शिफारशी:**

1)महिलांच्या सशक्तीकरणासाठी महिलांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. त्या दृष्टिकोनातून विविध कार्यक्रमांची योजना करून महिलांचे प्रबोधन करणे यासाठी शासनाने कृती कार्यक्रम आखावा.

2)कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी.

3)विविध सामाजिक संस्थांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी भाग घेऊन कृती कार्यक्रम राबववा.

4)ग्रामीण भागात जाणीव जागृतीसाठी जागृतीचे कार्यक्रम राबववे.

**संदर्भ सूची:**

संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र (2000) डॉ.प्रदीप आगलावे, विद्या प्रकाशन, नागपूर
www.cencus 2011.co.in
आधुनिक भारताचा इतिहास : ग्रोव्हर अँड वेलेकर
प्राचीन भारताचा इतिहास: ycmou b.a.
भारताचा आर्थिक सर्वे 2023
योजना मासिक
www.adharsocial.com
www.wcd.nic.in
www.mha.gov.in
www.india.gov.in<acts

# महिला सक्षमीकरण : संधी आणि आव्हाने

**प्रा. यशोदा बापूराव लबडे**
ग्रंथालय प्रमुख, महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा, जि.अहमदनगर

**सारांश**

सदर लेखामध्ये महिला सक्षमीकरण, महिला सक्षमीकरणाचे राष्ट्रीय धोरण, राष्ट्रीय महिला सक्षमीकरण धोरणाची धेय्ये व उद्दीष्टे, महिलांचे कायदेशीर व न्यायालयीन सक्षमीकरण, महिलांचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सक्षमीकरण, महिला आणि कायदे, महिला सक्षमीकरण आव्हाने, महाराष्ट्र शासनाच्या महिला आणि बालकांसाठी विविध योजना यांची थोडक्यात माहिती दिलेली आहे.

संज्ञाशोध – महिला सक्षमीकरण, राष्ट्रीय धोरण, कायदे, महिला सक्षमीकरण आव्हाने, महिला आणि बालकांसाठी *विविध योजना.*

**प्रस्तावना**

भारतामध्ये पूर्वीपासूनच स्त्रियांना महत्व प्राप्त झालेले दिसते. भारताची पारंपारिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व भौगोलिक रचना पाहता भारताला "भारत माता" म्हटले जाते. युनेस्कोने इ.स.१९७५ हे वर्ष "अंतराष्ट्रीय महिला वर्ष" म्हणून जाहीर केल्याने खऱ्या अर्थाने महिलांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडले. त्यानंतर १९७५ ते १९८५ महिला सक्षमी दशक, या काळात जे परिवर्तन झाले, नवी युगसंवेदना आली, त्यातून स्त्रीजीवानाच्या कक्षा विस्तृत होत जीवनाला वेग आला. स्त्रीवाद, नवा स्त्रीवाद आणि स्त्रीमुक्ती या शब्दांना भिन्न अर्थछटा आहेत. स्त्रीयांच्या हक्काची भूमिका घेणे म्हणजे स्त्रीवाद होय, तर स्त्रीमुक्तीमध्ये स्त्रीयांच्या सम्यक स्वातंत्र्याचा विचार सूचित होतो. लोकप्रिय पातळीवर स्त्रीमुक्ती हा विचार नव्या स्त्रीवादाचा समानार्थी म्हणून वापरला जातो, ही विशिष्ट शब्द संहिता लोकशाहीवादी समाजनिर्मिती करणाऱ्या संघटनेने वापरली असे मानले जाते. ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणू साजरा केला जतो. आज एकविसाव्या शतकाच्या प्रारंभिक काळात गतिमान परिवर्तनाच्या दिशेने बदलांचे परिणाम आपल्या समोर येत आहेत. आज कोणतेही क्षेत्र असे नाही कि ज्याठिकाणी महिला नाहीत, त्या प्रत्येक क्षेत्रात अतिउच्च पदावर कार्यरत आहेत. दिवसेंदिवस महिलांच्या कामगिरीचा आलेख हा उंचावत असलेलाच आपण पाहत आलेलो आहोत.

**महिला सक्षमीकरण**

स्त्री ही सृष्टीची शक्ती मानली जाते, म्हणजेच मानव जातीचे अस्तित्व स्त्रीपासून आहे असे मानले जाते. महिला सक्षमीकरण म्हणजे निर्मितीच्या शक्तीचा विकास आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय, विचार स्वातंत्र, श्रद्धा, धर्म, आणि उपासना, संधीची समानता प्रदान करणे होय.

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना तिच्या जीवनाशी संबधित प्रत्येक निर्णय स्वत: घेऊन आणि कुटुंब आणि समाजामध्ये त्यांना त्यांचे खरे अधिकार मिळवून देणे होय.

**महिला सक्षमीकरणाचे राष्ट्रीय धोरण**

भारतीय राज्यघटनेने मुलभूत हक्क, मुलभूत कर्तव्ये व मार्गदर्शक तत्वे यांमध्ये "स्त्री –पुरुष समानता" हे तत्व व्यक्त होते. राज्यघटना केवळ महिलांना समानतेची शाश्वती देत नाही, तर राज्यसंस्थेने प्रसंगी किंमत मोजूनही महिलांच्या सार्वजनिक हितांचा विचार केला पाहिजे. यासाठी राज्यघटना राज्यसंस्थेला अधिकार देते. लोकशाही

व्यवस्थेच्या चौकटीमध्ये कायदे, विकासाची धोरणे, नियोजन आणि कार्यक्रम यामध्ये महिलांना केंद्रीभूत मानले गेले. संसदेच्या कायद्यानुसार १९९० मध्ये राष्ट्रीय महिला आयोग स्थापन करण्यात आला.

**राष्ट्रीय महिला सक्षमीकरण धोरणाची धेय्ये व उद्दीष्टे**

1. महिलांच्या संपूर्ण विकासासाठी सकारात्मक आर्थिक, सामाजिक धोरणांच्या माध्यमातून वातावरण निर्मिती करणे.
2. राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व नागरी क्षेत्रात महिलांना समान हक्क , स्वातंत्र्य दिले पाहिजे.
3. राष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनामध्ये महिलांना सहभागी होण्याची व निर्णय घेण्याची समान संधी असेल.
4. सर्वच पातळ्यांवर दर्जेदार शिक्षण, करिअर व व्यावसायिक सल्ला, नोकरी, समान वेतन, व्यावसायिक सुरक्षा, सामाजिक सुरक्षा, आरोग्याची देखभाल करण्याची समान संधी महिलांना असेल.
5. महिलांचे शोषण करणाऱ्या सर्व प्रथा-परंपरा नष्ट करणारी बळकट स्थानिक संस्था निर्माण करणे.
6. सामुहिक कृतीमध्ये महिला व पुरुष यांचा समान सहभाग वाढविणारा दृष्टीकोन विकसित करणे.
7. विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्त्रीवादी दृष्टिकोनाचा स्वीकार करणे.

**महिलांचे कायदेशीर व न्यायालयीन सक्षमीकरण -** कुटुंबाअंतर्गत महिलांच्या हिंसेला कायदेशीर व न्यायालयीन व्यवस्था जबाबदार असते. महिलांच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण करण्यासाठी नवीन कायदे तयार केले गेले पाहिजेत. तसेच अस्तित्वात असलेल्या कायद्यांमध्ये बदल घडवून आणला पाहिजे. संपत्तीच्या मालकीसंबधीच्या कायद्यामध्ये बदल करणे गरजेचे असते.

**महिलांचे आर्थिक सक्षमीकरण -** भारतातील बहुसंख्य महिला दारिद्र्यात राहतात, सामाजिक विषमता निर्मुलन, सूक्ष्म आर्थिक धोरणे आणि गरिबी निर्मूलनाचे कार्यक्रम यामधून महिलांच्या समस्या सोडविल्या पाहिजेत. गरीब महिलांना संघटीत करून त्यांना नोकरी किंवा व्यवसाय उपलब्ध करून त्यांचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावला जाईल याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. महिलांचे वेगवेगळे बचत गट तयर करून त्यांना आर्थिक लाभ किंवा कर्जे उपलब्ध करून दिले पाहिजेत.

**महिलांचे सामाजिक सक्षमीकरण -** समाजामध्ये महिला- पुरुष असा भेद न करता त्यांना सर्वच क्षेत्रात समान संधी असणे महत्वाचे आहे. कामाच्या ठिकाणी स्त्री-पुरुष्याना समान वेतन, सार्वजनिक शिक्षण यामध्ये भेदभाव न करणे. महिलांचे आरोग्य, त्यांची निवासव्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**महिलांचे शैक्षणिक सक्षमीकरण -** महिला व मुलीना शिक्षणाची समान संधी मिळणे गरजेचे आहे. लिंगभेदावर आधारलेली शिक्षण पध्यती, मुलींच्या शिक्षणामध्ये वाढ, शिक्षणाच्या दर्ज्यामध्ये सुधारणा तसेच व्यावसायिक, तांत्रिक कौशल्य महिलांमध्ये विकाशित करण्यावर भर दिला पाहिजे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यामध्ये महिलांना सभागासाठी काही कार्यक्रम आखले गेले पाहिजेत. उच्च शिक्षणामध्ये मुलीचा सहभाग वाढवा म्हणून त्यांना काही प्रमाणात शैक्षणिक व आर्थिक मदत मिळावी यासाठी प्रयत्न करावे.

**महिलांचे राजकीय सक्षमीकरण -** भारतीय संसदेने आरक्षण विधेयकाला २२ डिसेंबर १९९२ रोजी मान्यता दिली. एप्रिल १९९३ ला ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती राष्ट्रपतींच्या स्वक्षरींने अस्तित्वात आली. संपूर्ण भारतात त्रिस्तरीय पंचायत व्यवस्था, शहरी आणि ग्रामीण स्वराज्य संस्थाना अधिक अधिकार व स्वायत्तता आणि या सर्व संस्थामध्ये अनुसूचित जाती जमाती आणि स्त्रियांना आरक्षण प्राप्त झाले. यामध्ये स्त्रियांना ३३ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या. सध्याच्या सरकारने लोकसभा व राज्यसभा यामध्ये ३३ टक्के आरक्षण लागू केले आहे.

**महिला आणि कायदे**

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्रोत्तर काळात महिलांच्या कल्याणाच्या आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने अनेक कायदे केले गेले. या कायद्यांमुळे आज महिलांच्या कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात बरेच परिवर्तन झालेले आहे. हे कायदे खालीलप्रमाणे.

1. विधवा विवाह कायदा (१८५६) – भारतीय समाजामध्ये पूर्वी मुलींचे लग्ने लवकर होत होती, यामुळे मुलीना लवकरच विधवापन येत असे. तसेच पूर्वी विधवांकडे पाहण्याचा दृष्टीकोन चांगला नव्हता म्हणून महर्षी धोंडो केशव कर्वे, ईश्वरचंद विद्यासागर यांनी विधवेशी लग्न करून या कायद्यांसाठी प्रयत्न केले.

2. सतीबंदी कायदा (१८२९) - राजाराम मोहन रॉय यांच्या प्रयत्नामुळे सती प्रथा बंद होऊन सतीबंदी कायदा केला गेला.

3. बालविवाह कायदा (१९२९) – मुलींचे लग्ने लवकर होऊ नये म्हणून तसेच त्यांच्या विवाहाची वयोमर्यादा निश्चित करण्यासाठी हा कायदा करण्यात आला. यामध्ये १८ वर्षे ही वयोमर्यादा मानली गेली.

4. हिंदू विवाह कायदा (१९५६) – हिंदू धर्म मानणाऱ्या सर्व व्यक्तीस हा कायदा लागू होतो.

5. द्विभार्या प्रतिबंध कायदा (१९५५) – या कायद्यानुसार प्रथम पत्नी जिवंत असताना, एखाद्या पुरुषाने दुसरे लग्न केले तर ते लग्न म्हणून समजले जात नाही, तर इंडियन पिनल कोडखाली तो शिक्षापात्र गुन्हा ठरतो.

6. नोंदणी विवाह कायदा (१८७२)(१९५४) – हा कायदा १८७२ मध्ये पास झाला त्यामध्ये १९५४ मध्ये सुधारणा करून कायद्यानुसार विवाह नोंदले गेले पाहिजेत तसेच नोंदणी विवाह करून पुन्हा धार्मिक विधी करू शकतात. यामध्ये मुलींचे वय हे १८ वर्षे पूर्ण असावे लागते तसेच एक महिना अगोदर विवाहाची नोटीस द्यावी लागते.

7. घटस्फोटाचा कायदा (१९५५) –हिंदू विवाह कायद्याने कायदेशीर विभक्तापणा व घटस्फोट या गोष्टी मान्य केल्या.

8. पोटगी कायदा (१९४६-१९५६ ) -१९४६ मध्ये पोटगीचा कायदा करण्यात आला होता परंतु तो रद्द होऊन १९५६ चा कायदा केला गेला, यामध्ये हिंदू महिलांना विशिष्ट परीस्थितीत पोटगी मागता येते.

9. हुंडा प्रतिबंध कायदा (१९६१) – आधुनिक काळात हुंडा देणे आणि हुंडा घेणे दोन्हीही कायद्याने शिक्षेस पात्र होतात. सध्या हुंडाबळी कायद्यात कलम ४९८ अ, कलम ३०४ ब, कलम ३०६ या कलमांनुसार शिक्षा केली जाते.

10. मुलींचा अनैतिक व्यापार विरोधी कायदा (१९५६ ) – न्यूयॉर्क या देशामध्ये १९५० मध्ये व्यक्तींचा व्यापार व वेश्या व्यवसायाचा इतर लोकांकडून आपल्या नफ्यासाठी उपयोग यांना आळा घालण्याच्या उद्देशाने आंतराष्ट्रीय परिषद भरली होती, तिचा ठराव भारताने मान्य केल्याने हा कायदा पास केला.

11. दत्तक घेण्याचा हक्क (१९५६) – कोणताही पुरुष आपल्या पत्नीच्या संमतीशिवाय मुल दत्तक घेऊ शकत नाही. अविवाहित स्त्री किंवा विधवा स्त्री मुल दत्तक घेऊ शकते, दत्तक घेताना मुलगा किंवा मुलगी असा भेदभाव न करता दत्तक घेऊ शकतात.

12. वेश्याव्यवसाय प्रतिबंध कायदा (१९५६) – या कायद्यामुळे अल्पवयीन मुलींच्या या व्यवसायामध्ये येण्याला बराच आळा बसला, तसेच या व्यावसायातून एखाद्या स्त्रीला सुटका हवी असल्यास तीची त्वरित सुटका होऊन तिला आश्रय मिळवून दिला जातो.

13. गर्भपाताचा कायदा (१९७२) – या कायद्यानुसार भारतात राहणाऱ्या सर्वधर्मीय स्त्रियांना काही विशिष्ट परिस्थितीत गर्भपात करून घेण्याचा हक्क प्राप्त झाला आहे.

14. गर्भजलपरीक्षा विरोधक कायदा (१९८८) – या कायद्यानुसार गर्भजल चाचणी करून मुलगा कि मुलगी याचे निदान करणे बेकायदेशीर आहे.

15. बलात्कारासंबधीचा कायदा (१९८३) – स्त्रीच्या संमत्तीशिवाय, तिच्या इच्छेविरुद्ध एखाद्या पुरुषाने संभोग केला तर तो बलात्काराचा गुन्हा समजला जातो.

16. घरगुती हिंसा कायदा (२००५)- एखाद्या स्त्रीला घरातील व्यक्तीकडून मारहाण होत असेल तर या कायद्यामुळे तिला संरक्षण मिळते.

17. लैंगिक गुन्ह्यापासून मुलांचा बचाव (२०१२)- यामुळे वेगवेगळया लैंगिक गुह्यापासून मुलांचा बचाव होऊ शकतो.

कायदे करून स्त्रीच्या जीवनामध्ये काही परिवर्तन झाले असे म्हणता येत नाही कारण जेंव्हा स्त्री आणि पुरुष यांच्या मानसिकतेत बदल होईल तोपर्यंत हे कायदे कागदावरच राहणार आहेत.

**महिला सक्षमीकरण आव्हाने**

**महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन -** भारतीय सामाज्यामध्ये महिलांकडे "चूल आणि मुल", "उपभोग्य वस्तू", "अबला", या पाहण्याचा दृष्टीकोनामध्ये जेंव्हा फरक पडेल तेंव्हाच खऱ्या अर्थाने महिला सक्षम झाली असे म्हणता येईल. महिलांच्या बाबतीत कितीही कायदे केले, कितीही धोरणे आखली तरी जोपर्यंत सामाज्याचा दृष्टीकोन बदलत नाही तो पर्यंत महिला सक्षम होणार नाहीत.

**पितृसत्ताक पद्धती -** भारतीय समाजामध्ये पूर्वीपासून पितृसत्ताक पद्धती होती. पुरुष्याना "घरधनी", कुटुंबप्रमुख म्हणत असत. आजही समाजामध्ये मुलगा हा घराचा वंशज मानला जात आहे. त्यामुळे मुलगा किंवा मुलगी यासाठी लोक कितीही पैसे खर्च करून गर्भजल चाचणी करून घेतात, आणि मुलीचा गर्भ असल्यास तो गर्भ काढून टाकला जातो. तरीही समाजामध्ये महिलांच्या शिक्षणत वाढ झाल्याने महिला मुलगी किंवा मुलगा असा भेद करत नाहीत, असे कितीतरी कुटुंबे आहेत कि ज्या घरात एक किंवा दोन मुली आहेत.

**आर्थिक विषमता -** भारतामध्ये सध्या २९ टक्के महिला या नोकरी किंवा व्यवसाय करताना दिसतात. महिलांना नोकरी आणि व्यवसाय यामध्ये योग्य वातावरण निर्मिती करून दिली तर त्याठिकाणी महिलांची संख्या वाढेल. आजही ग्रामीण भागात परुष आणि महिला यांना समान रोजगार मिळत नाही.

**कायदेशीर रचनेतील त्रुटी-** महिला संदर्भातील कितीही कायदे असले तरी त्यामध्ये अनेक त्रुटी आढळतात. कामाच्या ठिकाणी असणाऱ्या महिलांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. महिलांना कायद्याच्या बाबतीत समाजाकडून समर्थन मिळेलच असे नसते. एखाद्या महिलेने कायद्याचा आधार घेऊन आपल्या वरिष्ठ अधिकार्याबद्दल तक्रार केल्यास बाकी व्यक्तींचे समर्थन मिळेलच असे होत नाही.

**राजकीय इच्छाशक्तीचा अभाव-** महिला या निर्णय प्रक्रियेमध्ये भाग घेऊ शकतात. आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर त्या अनेक क्षेत्रात आघाडीवर आहेत. शिक्षणातही महिला आता मागे राहिल्या नाहीत परंतु राजकीय क्षेत्रात त्यांना वरपर्यंत जाण्यात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

**शिक्षण –** शिक्षण घेत असताना मुलीना अनेक शाळा किंवा महाविद्यालयात सुविधा उपलब्ध नसतात. अनेक ठिकाणी स्वच्छतागृहे नसणे, ते स्वच्छ नसणे, येण्या-जाण्याच्या सुविधा नसणे, महाविद्यालयातील टार्गट मुलांकडून टोमणे मारणे, या अडचणीमुळे मुलींचे प्रमाण कमी होत आहे.

**महाराष्ट्र शासनाच्या महिला आणि बालकांसाठी विविध योजना**

1. बलात्कार पिडीत, लैंगिक शोषण पिडीत बालक आणि हल्ला पिडीतांकरिता मनोधैर्य योजना (महिला आणि बालक).
2. माझी कन्या भाग्यश्री योजना.
3. एकात्मिक बाल विकास सेवा योजना (आय सी डी एस).

4. बेटी बचाओ बेटी पढ़ाओ योजना.
5. बाल संगोपन संस्था (सी सी आय).
6. महिला समुपदेशन केंद्र.
7. अत्याचारग्रस्त पिडीत महिलांसाठी सावित्रीबाई फुले बहूउद्देशीय महिला केंद्र.
8. बाल सल्ला केंद्र.
9. बाल संगोपन योजना (मुलांसाठी कौटुंबिक देखभाल).
10. काम करणाऱ्या महिलांच्या मुलांकरीता राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजना.
11. इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना.
12. अनाथालय, महिला स्वीकृती केंद्रे आणि संरक्षित गृहे यामधील निराधार आणि परित्यक्ता विधवांच्या मुलींच्या विवाहाकरीता अनुदान.
13. किशोरी शक्ति योजना.
14. निराश्रित महिलां, किशोरवयीन माता, अत्याचार पिडीत महिलां यांच्यासाठी राज्य महिला गृहे (वय गट १८ ते ६० वर्षे.
15. देवदासी कल्याण योजना.
16. निराश्रित महिलांसाठी आधार गृहे.
17. किशोरवयीन मुलींसाठी योजना.
18. शुभ मंगल सामूहिक विवाह योजना.

या सर्व योजनाची सविस्तर माहिती ही महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभाग यांच्या वेबसाईट (https://womenchild.maharashtra.gov.in/contentmi/homecontent/schemes.php) वर उपलब्ध आहे.

समारोप

महिलांसाठी कितीही कायदे केले तरीही आपल्या समाजातील सर्वांनी आपला दृष्टीकोन बदलला तरच महिला सक्षम होतील. महिला आणि पुरुष यांची जडणघडणच वेगवेगळी असल्याने त्यांच्यामध्ये समानता असणे म्हणजे नेमके काय असा प्रश्न तयार होतो. आजही आपण पाहतो की एखादी महिला नोकरी करीत असेल तर तिला घरातील सर्व कामे म्हणजेच स्वयंपाक करणे, मुलांसाठी वेळ देणे, त्यांचा अभ्यास घेणे, घरातील कपडे धुणे, भांडी घासणे ही कामे करवी लागतात. तसेच महिलांना मासिक पाळी, बाळंतपण, मुलांचे संगोपन या गोष्टीनाही सामोरे जावे लागते. आज आपण पाहतो की शाळेत आणि महाविद्यालायामध्ये मुलींचे प्रमाण मुलांपेक्षा जास्त दिसते आहे. मुली शिक्षण आणि करिअर मध्ये नेहमीच वरच्या स्तरावर राहिल्या आहेत. परंतु मुलीना शिक्षण आणि करिअर करण्यासाठी वेळ लागत आहे, त्यामुळे त्यांचे वय वाढते आणि नंतर आपल्या तोलामोलाचा जोडीदार मिळण्यात अडचणी येत आहेत, परिणामी मुली एकट्या राहण्याचा निर्णय घेत आहेत. हे सर्व प्रश्न असले तरी आज कोणतेच असे क्षेत्र नाही की ज्या ठिकाणी महिला नाहीत.

**संदर्भ सूची**

1. कर्वे, स्वाती. (२००८). स्त्रीविकासाचे नवे क्षितीज, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
2. भागवत, विद्युत. (२००८). स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड प्रकाशन, पुणे.
3. कवी, माधवी. (२२०९). महिला कल्याण आणि विकास, विद्या प्रकाशन, पुणे.
4. पवार, वैशाली. (२०२१). महिलांच्या सत्ता संघर्षाचा आलेख, डायमंड प्रकाशन, पुणे.
5. जोगळेकर, मृणालिनी. (१९९२). स्त्री अस्मितेचा आविस्कार : एकोणिसावे शतक,पाप्युलर प्रकाशन, मुंबई.

6. सांगळे, शैलजा. (२००९). महाराष्ट्रातील महिला उद्योजक, डायमंड प्रकाशन, पुणे.
7. https://womenchild.maharashtra.gov.in/contentmi/homecontent/schemes.php
8. https://marathi.webdunia.com/article/womens-equality-day/women-empowerment-essay-in-marathi

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B

ISSN : 2278-9308
February 2024

# भारतातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा अभ्यास

**रोहिणी भिमराव सुर्यवंशी**

संशोधक विद्यार्थी

**डॉ.बाळू श्रावण भालेराव**

सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भडगाव जिल्हा जळगाव

**सारांश**

प्रस्तुत संशोधनात महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा अभ्यास करण्यात आलेला असून आर्थिक सक्षमीकरणासाठी ग्रामीण व शहरी भागातील नेमक्या कोणत्या अडचणी आहेत. महिलांच्या कुटुंबातील सहभाग नेमका कसा असतो. याचा देखील अभ्यास करण्यात आलेला आहे. शासन स्तरावर महिलांच्या आर्थिक सक्षम सक्षमीकरणासाठी कोणकोणत्या उपाययोजना कार्यान्वित आहे याचा देखील आढावा यात विश्लेषणात्मक दृष्टीकोनातून घेण्यात आलेला होता.

**प्रास्ताविक**

२१ व्या शतकात स्त्रियांचे शिक्षण व त्यांच्या सक्षमीकरणाच्या संदर्भात वर्तमान काळात भारतात प्रगती झाल्याचे दिसून येते. परंतु आर्थिक सबलीकरणात मात्र अद्यापही पाहिजे तशी प्रगती साध्य करता आलेली दिसून येत नाही. महिलांचे सक्षमीकरण व त्यातही आर्थिक सबलीकरण यामध्ये आज कमालीचं अंतर असून स्त्रियांनी विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा जरी उमटवला तरी आर्थिक क्षेत्रात स्त्रियांची संख्या पूर्वीपेक्षा आत्ताच्या काळात वाढलेली मात्र आपल्याला जाणवते. आर्थिक उत्पादन मिळविणे त्याचा चांगला विनयोग करणे. काटकसरीने त्याचा वापर करून परिवारासाठी गुंतवणुकीचा मार्ग उपलब्ध करून देणे. हा स्त्रियांच्या आर्थिक नियोजनातील महत्त्वपूर्ण हातखंडा मानला जातो. त्यातून त्यांच कुटुंब व्यवस्थित चालत.परंतु आर्थिक निर्णय घेण्याच्या बाबतीत आस्थापूर्वक सहभाग घेत नाहीत. याची काही कारणे आपल्या सामाजिक वातावरणात आणि मूल्यरचनेत असतीलही; परंतु काहीवेळा आवडी-निवडीमुळेदेखील त्या या विषयांच्या बाबतीत काहीशा अलिप्त राहतात. अगदी उच्चशिक्षित असलेल्या महिलादेखील 'आर्थिक साक्षर' असतीलच, असे नाही. आता हे चित्र बदलायला हवे. महिलांनी धाडस करून आर्थिक बाबी समजावून घेणे गरजेचे आहे. महिला आर्थिक सबलीकरण ही काळाची गरज आहे, परिस्थितीनुरुप सर्व क्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहे. या बदलानुसार आर्थिक, व्यावसायिक अशा विविध घटकांचा विचार केला जात आहे. विश्वातील अर्धी मानवी शक्ती स्त्री आहे, ती शक्ती देशाच्या विकासासाठी महत्वाची असल्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. खरे तर महिलांमध्ये आत्मविश्वास व साहस निर्माण करणे हा महिला सबलीकरणाचा मुख्य हेतू होय.

आजही अनेक घरांमध्ये महिला आर्थिक दृष्टिकोनातून सबल दिसून येत नाहीत आर्थिक निर्णय केवळ पुरुषांनी घ्यावा असाच विचार आज देखील ते करतात. गृहिणी आर्थिक बाबतीत पूर्णपणे पुरुषावर अवलंबून असते. दुर्दैवाने पतीचे निधन किंवा घटस्फोट झाला की ती गोंधळून जाते. मानसिक आधारही नसतो आणि आर्थिक बाबींची माहिती नसल्यामुळे विवंचना निर्माण होते. त्यामुळे वेळीच घरातील सक्षम व्यक्तीचा विमा कोणत्या स्वरूपाचा आहे, किती रकमेचा आहे, आरोग्य विमा, तसेच टर्म विमा आहे काय? याचे सखोल ज्ञान असणे महत्त्वाचे आहे. कुठे कोण ' नॉमिनी' आहे? त्याची प्रक्रिया, कुटुंबातील व्यक्तीची डिमॅट खाती, त्यातील शेअर व त्यांची किंमत यांची माहिती इतरांना नसते.

त्यामुळे महिलांनीसुद्धा अशा गोष्टींची माहिती करून घेणे, घराबाहेर जाऊन आर्थिक व्यवहार जातीने लक्ष घालून पाहणे गरजेचे आहे. जेणेकरून अडचणीच्या वेळी त्यांची धावपळ टळेल. हे ज्ञान स्वतःकडे असल्यास जवळच्या व्यक्तीकडून अज्ञानाचा गैरफायदा घेऊन होणाऱ्या फसवणुकीचा धोकाही टळू शकतो.

**संशोधन लेखाचा उद्देश :-** सदर संशोधन लेखाचा उद्देश भारतातील महिलांची स्थितीचा अभ्यास करून त्या अंतर्गत भारतातील महिलांचे आर्थिक सबलीकरण जाणून घेणे आहे.

**संशोधन पध्दती :-** प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला असुन त्यात प्रकाशित व अप्रकाशित पुस्तके तसेच संकेतस्थळे इत्यादीचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीच्या आधारे शोधनिबंधाच्या अभ्यासाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

भारतातील महिलांची स्थिती - संपूर्ण भारताचा विचार करता पुरुषांच्या तुलनेत (७५ %) तून महिला (२६.७%) कामगार संख्या बरीच कमी आहे. तसेच भारतीय बल अर्थव्यवस्थेचा कणा समजला जाणारा कृषी व्यवसाय अधिकतम ग्रामीण भागात केला जातो. या व्यवसायावर जवळ जवळ ६०% पेक्षा अधिक लोकसंख्या व्यवसायिक दृष्टीकोनातून अवलंबून आहेत. या व्यवसायात आज मोठ्या प्रमाणात आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर होत असला तरी महिलांच्या श्रमाचे महत्व कमी झालेले नाही. कृषी व्यवसायात जवळपास ५५ % महिलांचा सहभाग पहावयास मिळतो. शेतजमिनीच्या मशागतीपासून ते उत्पादन निघेपर्यंत होणाऱ्या सर्वच कामांमध्ये महिलांचा सहभाग असतो. स्त्रियांना खऱ्या अर्थाने सक्षम करण्यासाठी त्यांना आर्थिक आधिकार देऊन 'रोजगारभिमुख' बनविणे आवश्यक आहे.

महिला आर्थिक सबलीकरण :- सध्या, भारतात अंदाजे ४३२ दशलक्ष महिला कार्यरत आहेत, त्यापैकी ३४३ दशलक्ष असंघटित क्षेत्रात कार्यरत आहेत. मॅकिन्से ग्लोबल इन्स्टिट्यूटच्या अहवालात असा अंदाज आहे की महिलांना समान संधी देऊन भारत २०२५ पर्यंत आपल्या GDP मध्ये US$ ७७० अब्ज जोडू शकतो. महिला उद्योजकांनी अडथळे तोडून त्यांची स्वतःची ओळख प्रस्थापित केल्यामुळे भारतीय स्टार्टअप दृश्यात लक्षणीय परिवर्तन होत आहे. अलीकडील अहवालात असे म्हटले आहे की भारतातील सुमारे १८% युनिकॉर्न आता महिलांनी स्थापित केले आहेत. महिला सक्षमीकरण आणि आर्थिक विकास यांचा एकमेकांशी जवळचा संबंध आहे: किंवा ते एकमेकांना पूरक आहेत असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही, कारण स्वावलंबन ही सक्षमीकरणाची पहिली अट आहे. स्वावलंबी बनूनच सक्षमीकरण शक्य आहे आणि त्याचा थेट परिणाम आपल्या राहणीमानाच्या सुधारणेवर होतो. जोपर्यंत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसेल, तोपर्यंत महिला स्वावलंबी होऊ शकत नाहीत.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सुरू असलेल्या योजना -

1. इंदिरा महिला शक्ती उपक्रम प्रोत्साहन योजना
2. महिला बचत गट कार्यक्रम
3. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान बियाणे मिनीकिट
4. इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना
5. सामूहिक विमा योजना
6. बाजार पायाभूत सुविधांची निर्मिती/विकास
7. राजस्थान कृषी प्रक्रिया, कृषी व्यवसाय आणि कृषी निर्यात प्रोत्साहन योजना २०१९
8. सूक्ष्म आणि लघु उद्योग समूह विकास कार्यक्रम (MSE-CDP)
9. अमृता हाट बाजार
10. कौशल्य विकास योजना
11. नारी शक्ती पुरस्कार

12. सावित्रीबाई फुले महिला शेतकरी सक्षमीकरण योजना
13. महात्मा ज्योतिबा फुले मंडई कामगार कल्याणकारी योजना
14. धन लक्ष्मी महिला समृद्धी केंद्र
15. सुकन्या समृद्धी योजना
16. प्रधान मंत्री उज्ज्वला योजना
17. सुरक्षित मातृत्व हमी सुमन योजना
18. मोफत शिलाई मशीन योजना

आर्थिक विकास आणि महिला - सतत वाढत चाललेली आर्थिक विषमता हा भारताच्या आर्थिक विकासातील मोठा अडथळा आहे. भारतातील एकूण लघुउद्योगापैकी फक्त १९ टक्के महिला लघु उद्योग चालवितात. महिलांचा पगारही पुरुषांच्या पगाराच्या ६५ टक्के आहे. रोजगारातील आर्थिक सुधारणांमध्ये महिलांचा आर्थिक विकास हा मुख्य घटक आहे. एका अहवालानुसार, जर भारतातील महिलांना रोजगारामध्ये पुरुषांइतकेच लक्ष दिले गेले, तर अर्थव्यवस्थेत कोणताही बदल न होताही जीडीपी सात अब्ज अमेरिकन डॉलरने वाढू शकतो. महिलांचा आर्थिक विकास तेव्हाच होईल जेव्हा प्रत्येक महिला रोजगार हे आपले ध्येय बनवेल.

**भारतातील महिला सक्षमीकरणाची गरज -** भारतात महिला सक्षमीकरणाची अनेक कारणे आहेत. प्राचीन काळाच्या तुलनेत मध्ययुगीन काळात भारतीय महिलांच्या सन्मानाची पातळी लक्षणीयरीत्या कमी झाली. त्यांना प्राचीन काळी जो आदर दिला जात होता, मध्ययुगीन काळात तो आदर कमी होऊ लागला.

1. आधुनिक युगात, अनेक भारतीय महिला अनेक महत्त्वाच्या राजकीय आणि प्रशासकीय पदांवर तैनात आहेत, तरीही सामान्य ग्रामीण महिलांना अजूनही त्यांच्या घरात राहण्यास भाग पाडले जाते आणि त्यांच्याकडे सामान्य आरोग्य सुविधा आणि शिक्षण यासारख्या सुविधा नाहीत.

2. शिक्षणाच्या बाबतीतही भारतातील महिला पुरुषांपेक्षा खूप मागे आहेत. भारतातील पुरुषांचे शिक्षण दर ८१.३ टक्के आहे, तर महिलांचे शिक्षण दर फक्त ६०.६ टक्के आहे.

3. भारतातील शहरी भागातील महिला ग्रामीण भागातील महिलांपेक्षा अधिक रोजगारक्षम आहेत, आकडेवारीनुसार, भारतातील शहरांमध्ये सुमारे ३० टक्के महिला सॉफ्टवेअर उद्योगात काम करतात, तर ग्रामीण भागातील सुमारे ९० टक्के स्त्रिया प्रामुख्याने रोजंदारी, शेती आणि संबंधित कामांमध्ये गुंतलेल्या आहेत.

4. भारतातील महिला सक्षमीकरणाच्या गरजेचे आणखी एक मुख्य कारण म्हणजे वेतनामधील असमानता. भारतातील महिलांना समान अनुभव आणि पात्रता असूनही पुरुषांपेक्षा २० टक्के कमी पगार दिला जातो.

5. आपला देश खूप वेगाने आणि उत्साहाने प्रगती करत आहे, परंतु आपण ती तेव्हाच टिकवून ठेवू शकतो जेव्हा आपण लैंगिक असमानता दूर करू शकतो आणि पुरुषांप्रमाणे स्त्रियांना समान शिक्षण, प्रगती आणि मोबदला सुनिश्चित करू शकतो.

6. भारताच्या लोकसंख्येपैकी सुमारे ५० टक्के लोकसंख्या फक्त महिला आहे, याचा अर्थ, या अर्ध्या लोकसंख्येची संपूर्ण देशाच्या विकासासाठी गरज आहे, जी अजूनही सक्षम झालेली नाही आणि अनेक सामाजिक बंधनांनी बांधलेली आहे. अशा स्थितीत आपली अर्धी लोकसंख्या बळकट केल्याशिवाय आपला देश भविष्यात विकसित होऊ शकेल असे आपण म्हणू शकत नाही.

7. महिला सक्षमीकरणाची गरज निर्माण झाली कारण भारतामध्ये लैंगिक असमानता होती आणि प्राचीन काळापासून हा पुरुष प्रधान समाज होता. महिलांना त्यांच्याच कुटुंबाकडून आणि समाजाकडून अनेक कारणांनी दडपण्यात आले

आणि कुटुंबात आणि समाजात त्यांच्यावर अनेक प्रकारच्या हिंसाचार आणि भेदभावाला सामोरे जावे लागले, हे केवळ भारतातच नाही तर इतर देशांमध्येही दिसून येते.

8. भारतीय समाजात महिलांना सन्मान देण्यासाठी आई, बहीण, मुलगी, पत्नी या रूपात महिला देवतांची पूजा करण्याची परंपरा आहे, परंतु आज ती केवळ दिखावाच राहिली आहे.

9. गेल्या काही वर्षांत, लैंगिक असमानता आणि महिलांवरील वाईट प्रथा दूर करण्यासाठी सरकारने अनेक संवैधानिक आणि कायदेशीर अधिकार तयार केले आणि लागू केले आहेत. मात्र, एवढा मोठा प्रश्न सोडवण्यासाठी महिलांसह सर्वांच्या सततच्या सहकार्याची गरज आहे.

10. आधुनिक समाज महिलांच्या हक्कांबाबत अधिक जागरूक आहे, परिणामी अनेक बचत गट आणि स्वयंसेवी संस्था या दिशेने काम करत आहेत.

**भारतीय अर्थव्यवस्थेत महिलांचे योगदान**

1. भारतातील श्रमशक्तीच्या २९ टक्के महिलांचे प्रतिनिधित्व आहे.

2. जागतिक बँकेच्या मते, अरब जगाचा काही भाग वगळता औपचारिक अर्थव्यवस्थेत भारतीय महिलांचा सहभाग जगातील सर्वात कमी आहे.

3. शेती: जरी ते सुमारे ४० टक्के शेतमजूर आहेत, तरीही ते भारतातील केवळ ९ टक्के जमिनीवर नियंत्रण ठेवतात.

4. जीडीपीमध्ये योगदान: भारतातील महिलांचे जीडीपीमध्ये केवळ १८ टक्के योगदान आहे, जे जागतिक सरासरी ३७ टक्क्यांपेक्षा खूपच कमी आहे.

5. भारतातील महिलांनी केलेले निम्म्याहून अधिक काम हे बिनपगारी आहे आणि जवळपास सर्वच अनौपचारिक आणि असुरक्षित आहेत.

6. व्यावसायिक नेत्यांसह बहुतेक क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधित्व चांगले नाही.

7. औपचारिक आर्थिक व्यवस्थेतूनही महिलांना वगळण्यात आले आहे. भारतातील जवळपास निम्म्या महिलांकडे स्वतःच्या वापरासाठी बँक किंवा बचत खाती नाहीत आणि ६० टक्के महिलांकडे त्यांच्या नावावर कोणतीही मौल्यवान मालमत्ता नाही.

8. भारतातील महिलांची शारीरिक क्षमताही उत्तम आहे.

यशवंतराव होळकर यांच्या मृत्यूनंतर (२८ ऑक्टो. १८११) तुळसाबाईंनी आपली सवत केसरबाई किंवा कृष्णाबाई हिचा अल्पवयीन पुत्रास, मल्हारराव दुसरा यास गादीवर बसवित त्याची संरक्षिका बनून यशस्वीरित्या राज्यकारभार सांभाळला. याचकाळात होळकर दरबारात कटकारस्थानांना ऊत आला होता. दौलतराव शिंदे याने होळकर घराण्यातील इतर स्त्रियांच्या साथीने तुळसाबाई व मल्हारराव दुसरा यांना ठार मारण्याचा रचलेला कट तुळसाबाईने अयशस्वी ठरविला. शिंदे तसेच बाजीराव दुसरा यांपासून होळकर राज्य वाचविण्यासाठी कूटपणे इंग्रजांची मदत त्यांनी घेतली. (सरदेसाई गो.स., खंड ८, (२०१०), पृ. ४८९) असे असले तरी पेशवा संकटात असतांना तुळसाबाईने इंग्रजांविरूध्द हालचाली रचल्यात. तेव्हा इंग्रजांनी 'फोडा व राज्य करा' नीती अवलंब केला. होळकरांचे असंतुष्ट, महत्त्वाकांक्षी सरदार फोडत तुळसाबाई, मल्हारराव दुसरा इ.ना ठार मारण्याचा कट इंग्रजांनी रचला. (सरदेसाई गो.स., खंड ८, (२०१०), पृ. ४८९) व त्यांना प्रथम कैद केले. (भागवत (१९२४), पृ. १५९) परंतु त्यातून सुटका करवून घेण्यात तुळसाबाईंना यश आले. तद्नंतर तिने सैन्याचे पूर्नसंघटन केले. राज्य वाचविण्यासाठी 'साम-दाम-दंड-भेद' नीतीचा अवलंब केला. परंतु इंग्रजांनी कूटनीतीचा अवलंब करीत इ.स. १८१७ मध्ये तुळसाबाईचा खून करविला. त्यावेळी तिचे वय फक्त ३० वर्षे होते.

अत्यंत विपरीत परिस्थितीमध्ये होळकर राज्य सतत सात वर्षे सांभाळत आपल्या कर्तबगारीची मोहोर उमटविणाऱ्या या दुर्देवी स्त्रीचा असा करूणामय अंत झाला. (गर्गे रामसेवक, शर्मा हिरालाल (संपा.), (१९७६), पुष्प ६, पृ. ४३)

एक अत्यंत धाडसी, तडपदार परंतु सत्तापिपासू अशा स्त्रीला ती लग्नाची स्त्री नसल्यामुळे होळकर घराण्यात सन्मान नव्हता. असे असले तरी ती एक चतुर राजकारणी व संघर्षशील महिला होती. यशवंतराव होळकरांच्या

मृत्यूनंतर वारस नेमून होळकरांचे राज्य १० वर्षे टिकविण्याचे व प्रशासन सांभाळण्याचे महत कार्य तुळसाबाईने यशस्वीपणे पार पाडले.

• **समालोचन-**

मध्ययुगीन कालखंडातील स्त्री ही आपल्या सीमा न ओलांडता चतुराई, धैर्य, मुत्सद्देगिरीने आपला कार्यभाग साधून घेत असल्याचे स्पष्ट होते. म्हणजेच तुलनात्मक दृष्ट्या चतुराई व कर्तृत्व लक्षात घेता त्या आजच्या स्त्रीच्या तोडीस तोड होत्या.

होळकर घराण्यातील स्त्रियांची कर्तबगारी विचारात घेता, कर्तृत्ववान महिला शासक म्हणून अहिल्याबाईचे नाव सर्वज्ञात आहे. इतिहासातील काही पाने त्यांसाठी असलेली दिसून येतात. परंतु, त्यांच्या तोडीस तोड, विपरित स्थितीत राजकारण, प्रशासन, धर्मकारण इ. क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या गौतमाबाई, हरकूबाई, रखमाबाई, तुळसाबाई यांसारख्या स्त्रियांचे कार्यकर्तृत्व इतिहासपटलावर नोंदविले गेल्याचे आढळत नाही. अशा या कर्तृत्ववान परंतु दुर्लक्षित स्त्रियांचे कार्य जगासमोर आणण्यासाठी इतिहासाची सबअल्टर्न पध्दतीने मांडणी करणे अगत्याचे ठरते.

• **संदर्भ ग्रंथसूची-**

• गुजर डॉ. यादव (१९९१)- *मल्हारराव होळकर आणि त्यांचा काळ,* गांधीबाग, नागपूर, श्रीराम प्रिंटर्स.
• गुर्जर गोविंद जर्नादन (१९३०)- *जवानमर्द मराठे गडी, विरशिरोरत्न जनकोजी शिंदे,* मुंबई, वैभव छापखाना.
• पारसनीस द.बा (१९१०)- *महेश्वर दरबाराची बातमीपत्रे, भाग १,* मुंबई, निर्णयसागर छापखाना.
• भागवत अ.ना. (संपा.) (१९२४)- *होळकरशाहीच्या इतिहासाची साधने, खंड १,* होळकर सरकार पुस्तकमाला.
• सरदेसाई गो.स. (संपा.) (१९३७)- *ऐतिहासिक घराण्याच्या वंशावळी,* मुंबई, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस.
• सरदेसाई गो.स. (संपा.) (१९३७)- *महादजी शिंदे यांची कागदपत्रे, भाग १,* ग्वाल्हेर, अलिजा बहादूर प्रेस.
• सरदेसाई गो.स. (२०१०)- *मराठी रियासत, खंड २,* (उत्तर विभाग १७८४ ते १७९५) पुर्नमुद्रण, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन.
• सरदेसाई गो.स. (२०१०)- *मराठी रियासत, खंड ३,* (पुण्यश्लोक शाहू, पेशवा बाळाजी विश्वनाथ, पेशवा बाजीराव), पुर्नमुद्रण, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन.
• सरदेसाई गो.स.(२०१०)- *मराठी रियासत, खंड ७,* पुर्नमुद्रण, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन.
• सरदेसाई गो.स. (२०१०)- *मराठी रियासत, खंड ८,* पुर्नमुद्रण, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन.
• ठाकूर वा.वा. (संपा.) (१९४४)- *होळकरशाहीच्या इतिहासाची साधने खंड १,* इंदूर, होळकर गव्हर्नमेंट प्रेस.

**स्मरणिका-**

• गर्गे रामसेवक, शर्मा हिरालाल (संपा.) (१९७० ते १९८०)- *अहिल्या स्मरणिका,* इंदौर, अहिल्याबाई चॅरिटेबल ट्रस्ट.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B
ISSN : 2278-9308
February 2024

# भारतातील स्वातंत्रता पूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांचे कार्य - स्त्री सबलीकरणवादी दृष्टीकोन

**प्रा. डॉ. अस्मिता धनवंत सरवैया**
सहायक प्राध्यापक, पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय,
अमळनेर ता. अमळनेर, जि. जळगाव,Mob- 9545240849, asmitads01@gmail.com

**प्रस्तावना**

स्वातंत्रता पूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील काळ हा स्त्रियांच्या आणि समाजाच्या स्वतंत्रता, समानतेविषयी केलेल्या सक्रीय आणि संघर्षमय सहभागाचा सुवर्णकाळ आहे. ह्या काळात सुरु असलेल्या चळवळीमध्ये लाखो शिक्षित, आडाणी, गृहिणी, गरीब, कष्टकरी, मजूर, शोषित, पिडीत महिला जोडल्या गेल्या. या महिलांनी ज्या उत्साहाने आणि उर्जेने या चळवळीमध्ये सहभाग नोंदवीला तो खरच कौतुकास्पद आणि प्रेरणादायक असा आहे. महिलांच्या कार्यावर या संशोधन लेखाद्वारे एक दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे. स्वातंत्र्य पूर्व कालखंडात गेली कित्येक वर्ष महिला सामाजिक पुरुषत्वाच्या वर्चस्वाच्या बळी पडून दुय्यम दर्जाचे जीवन व्यतीत करत होता. महिलांवर समाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय, क्षेत्रात अनेक बंधने लादली होती. थोडक्यात या समाजव्यवस्थेने समाजातील महिलांना माणूस म्हणून जगणे नाकारले होते. देशात स्त्रियांची स्थिती मागासलेली, स्त्रियांना या चातुर्वर्ण्य व्यवस्थेत कुठेही स्थान नव्हते. स्त्रिया या अन्याय, अत्याचाराच्या बळी ठरत होत्या. महिला अशा परिस्थितीत या अन्याय-अत्याचाराविरुद्ध बंड करणे तर दूरच, पण साधे वर मान करून बोलणे सुद्धा अवघड समजले जात होते. परंतु जस जसा काळ लोटत गेला तस तशी परिस्थिती बदलत गेली. भारतात ब्रिटीशांच्या अंत होऊन भारतात समाजसुधारणेचे पर्व सुरु झाले. भारतात राजाराम मोहनरॉय, ईश्वरचंद विद्यासागर, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा फुले, सावित्रीमाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, यांसारखे थोर समाजसुधारकांनी अस्पृश्य समाज, महिला , बालके यांच्या साठी कार्य सुरु केले. या कार्यात महिलांना देखील सहभागी करण्याचे प्रयत्न सुरु केले. या महिलांमध्ये समाजातील शिक्षित, आडाणी, गृहिणी, गरीब, कष्टकरी, मजूर, शोषित, पिडीत अशा महिलांचा समावेश होता. अशाच काही सक्रीय महिलांच्या कार्याचा खालील प्रमाणे आढावा घेतला आहे.

स्त्रिया केवळ उर्वरित तीन वर्णाच्या दासी, उपभोगाच्या वस्तु मात्र झाल्या होत्या. अशा परिस्थितीत या अन्याय-अत्याचाराविरुद्ध बंड करणे तर लांबच साधे वर मान करून बोलणे सुद्धा अवघड बाब परंतु जस जसा काळ लोटत गेला तस तशी परिस्थिती बदलत गेली. भारतात पेशवाईचा अंत होऊन ब्रिटीशांच्या वसाहतींचा काळ आला.आणि भारतात समाजसुधारणेचे पर्व सुरु झाले. भारतात महात्मा फुले, सावित्रीमाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, यांसारखे थोर समाजसुधारकांनी अस्पृश्य समाजातील लोकांसाठी कार्य सुरु केले. महिला समाजाच्या उद्धारासाठी पुढे येऊ लागल्या. सभा, संम्मेलने, आंदोलने, मोर्चे इत्यादी मध्ये सहभागी होऊ लागल्या.

**राधाबाई वराळे आणि मनोरमाबाई धोत्रे :-** पुणे करारात गांधीनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे अस्पृश्य समाजाला हिंदु समाजाची वागणूक नव्हती म्हणून पुणे करार रद्द करावा यासाठी अखिल भारतीय शेड्युल कास्ट फेडरेशन मार्फत १९४६ साली विधान मंडळासमोर सत्याग्रह करण्याचे ठरवण्यात आले. या सत्याग्रहात अनेक स्त्री-पुरुषांनी

मुलाबाळांसह सहभाग घेतला या सत्याग्रहात राधाबाई वराळे आणि मनोरमाबाई धोत्रे यां १५ दिवस तुरुंगात गेल्या होत्या.

**सौ. यशोदाबाई मोहिते :-** ११ ऑगस्ट १९४६ रोजी बि.डी.डी.चाळ यथे पुणे करारा विरोधात तुरुंगात जाऊन आलेल्या महिलांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी यशोदाबाई मोहिते यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी यशोदाबाईंनी तुरुंगातील अनुभव सांगत म्हणाल्या बाबासाहेबांसोबत सत्याग्रह,आंदोलने इत्यादीत सहभाग घेणे सर्व दलित स्त्रियांचे कर्तव्यच आहे.

**देविकाबाई दामोदर कांबळे :-** २ एप्रिल १९४८ साली सिद्धार्थ कॉलेज, मुंबई येथे महिला संघटना स्थापन करण्यासाठी सभा भरवण्यात आली त्या सभेच्या अध्यक्षस्थानी देविकाबाई कांबळे या होत्या. ठिकठिकाणी महिलांची मंडळे स्थापन व्हावी आणि रमाबाई आंबेडकर यांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या विद्यार्थी आश्रमास महिलांनी वर्गणी द्यावी असा ठराव करून दलित मुलींच्या शिक्षणासाठी जागरूकता दाखवली.

**तानुबाई :-** पुणे येथे १९२९ साली तानुबाई यांच्या नेतृत्वात दलित महिलांद्वारे पार्वती मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह करण्यात आला.त्यात बहुसंख्य दलित स्त्रियांनी सहभाग घेतला होता. या मंदिर प्रवेशावेळी सवर्णांनी या दलित महिलांवर लाठ्या चालवल्या त्यात अनेक दलित महिला जखमी झाल्या परंतु त्यांनी तीव्र स्वरुपात हा लढा दिला.

**राधाबाई बडाळे :-** नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहामध्ये राधाबाई यांनी आपल्या भाषणात प्रखरपणे सवर्णांना सांगितले कि, आम्हाला मंदिरात प्रवेशाचा,पाणवठ्यांवर पाणी भरण्याचा अधिकार मिळाला पाहिजे तो आमचा सामाजिक अधिकार आहे.तसेच आम्हाला शासन करण्याचा राजकीय अधिकार देखील मिळाला पाहिजे.आम्हाला कठोर शिक्षेची भीती नाही आम्ही देशभरातील कारागृह भरून देऊ. वेळ आली तर गोळया-काठ्या खाऊ पण आम्हाला आमचा हक्क मिळायलाच हवा,आम्ही एक वेळ प्राण देऊ पण आमचा हक्क मिळवूनच राहू.

**समुद्राबाई :-** मुंबई बोरगाव येथे १९३४ 'अस्पृश्य परिषद' संपन्न झाली या परिषदेचे अध्यक्षपद सौ.समुद्राबाई यांनी भूषवले या परिषदेत दलित मुलींच्या शिक्षणासंबधी आणि बालविवाह या विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच दलित मुलांसाठी रात्रशाळा,मुलामुलींसाठी एकत्र वाचनालय शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी छात्रवृत्ती इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात आली.

**भागीरथीबाई आणि कुमारी रमाबाई गायकवाड :-** पुरंदरे हॉल मुंबई मध्ये १९३६ साली आयोजित महार परिषदेत भागीरथीबाई आणि कुमारी रमाबाई यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या धर्मांतराच्या घोषणेचे मनपूर्वक स्वागत केले.भागीरथीबाई यांनी म्हटले कि नवीन धर्मात स्त्रियांच्या मुक्तीचा पुरस्कार असावा.जो धर्म आम्हाला बंधूभाव आणि समाजात स्वतंत्रपणे संचार करण्याचा परवानगी देतो तो धर्म आम्हाला स्वीकार आहे. तर कुमारी रमाबाई गायकवाड यांनी म्हटले कि, बाबासाहेबांनी अस्पृश्यांना त्यांचे हक्क मिळवुन देण्यासाठी अतिशय कठीण असा संघर्ष करत आहेत त्यामुळे आम्ही सर्व दलित महिला बाबासाहेबांसोबत आहोत आणि आम्ही धर्मांतर करणार.

**अनुसया बाई रंगाल :-** १९३६ मध्येच मध्यप्रांतात आयोजित दलित महिला परिषदेच्या अध्यक्ष अनुसयाबाई रंगाल या होत्या या परिषदेत दलित स्त्रियांची सामाजिक,आर्थिक,राजकीय आणि शैक्षणिक स्थिती मजबूत करण्यासाठी अनेक प्रस्ताव सादर करण्यात आले.तसेच दलित महिलांच्या प्रगतीसाठी करण्यात आलेल्या कार्याचाही आढावा घेण्यात आला. या परिषदेत अनेक दलित महिला वक्त्या होत्या त्यांनी या परिषदेत महिलांच्या सामाजिक आणि राजकीय हक्कांची मागणी केली.या परिषदेत दलित महिला वक्त्यांनी सांगितले कि,त्यांनी नागपुर मध्ये वस्त्या वस्त्यांत फिरून दलित मुलींचे गट तयार करून त्यांना शारीरिक शिक्षणासोबत काठी चालवणे तसेच आरोग्यासंबधी प्रशिक्षण दिले.आणि दलित मुलींमध्ये नवचेतना जागृत करण्याचे कार्य केले.

**सौ.मुक्ता सर्वगौड :-** १९४५ च्या मुंबई अधिवेशनात दलित स्त्रियांसंबधित वेगवेगळया प्रकारचे ठराव मंजूर करण्यात आले. या ठरावांवर बोलतांना सौ.मुक्ता सर्वगौड आपल्या भाषणात म्हणतात कि, दलित स्त्रियांचा विकास आणि समाजकारण हे सर्वस्वी राजकारणावर अवलंबून आहे आणि राजकारण ताब्यात घेण्यासाठी आपण शिक्षण घेतले पाहिजे ज्यामुळे आपणास विद्वत्ता प्राप्त होईल आणि आपण आपल्या विकासासठी इतर कोणावरही अवलंबून न राहता बाबासाहेबांनी सांगितलेल्या मार्गाचां अवलंब करून स्वताचा विकास केला पाहिजे.

**जाईमाई चौधरी :-** जाईमाई चौधरी या दलित समाजातील उच्चशिक्षित महिला होत्या. जाईमाई चौधरी यांनी अतिशय कठीण परिस्थितीत शिक्षण घेतले होते. त्यांनी दलित मुलींसाठी संत चोखामेळा कन्या शाळा स्थापन केली. जाईमाई चौधरी या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित होऊन बाबासाहेबांच्या पक्क्या अनुयायी बनल्या होत्या. जाईमाई चौधरी यांनी स्त्री शिक्षणाला अधिक महत्वपूर्ण मानले आणि सर्वप्रथम स्त्री शिक्षणावर भर दिला.नंतर त्या सशक्त दलित महिला नेता म्हणून परिचित झाल्या.

**रमाबाई आंबेडकर :-** माता रमाई यांचे सपूर्ण जीवनच एक आदर्शरूप आहे रमाई अतिशय खडतर अशा परिस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहून बाबासाहेबांची सावली झाल्या आणि सपूर्ण दलितांच्या रमाई झाल्यात. १९२८ साली मुंबई मध्ये 'महिला मंडळाची' स्थापना करण्यात आली.आणि या महिला मंडळाच्या प्रथम अध्यक्ष रमाई आंबेडकर यांना करण्यात आले. हे महिला मंडळ स्थापन करण्यामागचा उद्देश हा दलित महिलांच्या सामाजिक,आर्थिक,राजकीय स्थिती सुधारणे आणि दलित महिलांची प्रगती करणे असा होता या मंडळाची सपूर्ण जबाबदारी रमाई यांच्यावर होती आणि त्यांनी हि जबाबदारी त्यांनी अतिशय काळजीपूर्वक सांभाळली.

**बारुबाई बांबर्डे :-** मुंबईच्या अखिल भारतीय अस्पृश्य महीला परिषदेने १९४२ च्या नागपूर परिषदेच्या ठरावांचे समर्थन करत अस्पृश्य मुलींकरिता वसतिगृहे आणि अस्पृश्य निराधार महिलांसाठी उद्योगधंदे या प्रमुख मागण्या सरकारकडे करण्यात आल्या. तसेच या परिषदांच्या माध्यमातून स्त्रिया राजकारणात सहभाग आणि महिला सैनिक पथकांच्या मागण्या करू लागल्या अशा प्रकारचे ठराव पास झाले. शेड्युल कास्ट फेडरेशन च्या महिला परिषदेने भंडारा येथील कुर्डी या गावी दंगलीत अस्पृश्य तरुणांना त्यांचा काही अपराध नसतांना त्यांना फसवले गेले परंतु या तरुणांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे या परिषदेत ठरवण्यात आले.या परिषदेच्या सेक्रेटरी बारुबाई बांबर्डे होत्या.

**डॉ. अनिता अवचट- (1942-1997)**

अनिता अवचट या व्यसनमुक्ती तज्ञ डॉक्टर होत्या. अनिता सोहोनी यांचा जन्म घोलवडमध्ये झाला आणि ती ठाण्यात वाढली. तिचे कुटुंबीय तिला सुनंदा म्हणत. तिची आई शिवणकाम शिकवायची आणि तिचे वडील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह चालवायचे. तिने फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. तिथे असताना तिची भेट तिचा भावी पती अनिल अवचट यांच्याशी झाली. त्या दोघांनी बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकशास्त्राचे शिक्षण घेतले, जिथे तिने अनिलसह इतर सहकारी विद्यार्थ्यांना खाजगी शिकवणी देऊन स्वतःचा आधार घेतला. तिने ठाणे मेंटल एसायलममध्येही काम केले. त्या वेळी तिच्या लक्षात आले की अंमली पदार्थांच्या व्यसनाधीनांना आश्रयस्थानात सामावून घेतलेल्यांसाठी कोणतीही विशेष सुविधा नाही, जिथे त्यांचे पुनर्वसन करण्याचे कोणतेही साधन नाही. त्यांनी 1986 मध्ये मुक्तांगण पुनर्वसन केंद्राची स्थापना केली. दोन वर्षांनी त्यांना सरकारी निधी मिळाला. 1989 मध्ये अनिताला स्तनाचा कर्करोग झाल्याचे निदान झाले. 1991 मध्ये मेटास्टेसेस आढळून आले तरीही ती लढत राहिली. ती काही काळापासून बरी झालेली दिसली, त्यानंतर 1995 मध्ये कर्करोगाची पुनरावृत्ती झाली. 1997 मध्ये ती मुक्तांगणसाठी शेवटपर्यंत काम करत राहिली. 10 फेब्रुवारी 1997 रोजी गेल्या डॉ अनिता अवचट यांनी शेवटचा श्वास घेतला. जायच्या दहा दिवसआधी पर्यंत त्या 'मुक्तांगण'मध्ये येत होत्या, काम करत होत्या. मुक्तांगण आता आपल्या प्रकारातील सर्वोत्कृष्ट संस्थांपैकी एक आहे, ज्यामध्ये अनेक बरे झालेले माजी रुग्ण, 'मुक्तांगण-पदवीधर' आहेत. त्यांची

मुलगी मुक्ता पुणतांबेकर आता केंद्र चालवते. मुक्ता, आईने तिला दिलेली शिकवण आत्मसात करून ती गेली दहा वर्षं व्यसनमुक्ती केंद्राचं काम बघते आहे. मुक्ता ने क्लिनिकल सायकॉलॉजीत तिने एम. ए. केले आहे. त्या गेल्यावर विश्वस्त मंडळाने बैठक घेऊन पुढची दिशा ठरवली व रोजच्या जबाबदाऱ्या मुक्ताच्या खांद्यावर टाकायचा निर्णय घेतला. केंद्रात कुणी वडीलधारं असावं म्हणून मुक्ताचे बाबा डॉ. अनिल अवचट लक्ष घालतील, 'मुक्तांगण'च्या ज्येष्ठ सहकाऱ्यांनी तिला स्वीकारलं, हा त्यांचा मोठेपणा असं ती मानते. मुक्ता म्हणते "व्यसनमुक्त होण्याची इच्छा धरणाऱ्यांना मदत करण्यासाठी व्यापक पातळीवर काम होण्याची गरज आहे. मात्र त्यासाठी 'मुक्तांगण'च्या शाखा आम्ही काढणार नाही. बाहेरगावी इतर संस्थांमार्फत सुरू झालेल्या व होणाऱ्या केंद्रांना मार्गदर्शन, प्रशिक्षण तसंच देखरेखीच्या कामात आम्ही मदत करू. सध्या पाच राज्यांमधल्या ९३ व्यसनमुक्ती केंद्रांसाठी अशा प्रकारे काम चाललेलं आहे.

**डॉ. राणी बंग-**

17 सप्टेंबर 1951 रोजी जन्मलेल्या डॉक्टर राणी बंग यांनी MBBS चे शिक्षण नागपूर विद्यापीठातून पूर्ण केले. 1978 डॉक्टर राणी बंग यांनी 1980-90 च्या दशकात स्त्री आरोग्य नीतिच्या जागतिक पातळीवरील प्रवक्त्या होत्या जागतिक आरोग्य संघटनेच्या वर्ल्ड हेल्थ असेम्ब्ली ला संबोधित करण्यासाठी त्यांना आमंत्रित करण्यात आले होते, दारू व बालमृत्यू या संदर्भात त्यांनी केलेले कार्य महत्त्वाचे ठरले असून, **सर्च** च्या माध्यमातून बालमृत्यू कमी करण्यासाठी त्यांनी शासनाला उपाय सुचविलेले आहेत. डॉक्टर बंग यांनी बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वतःचे मॉडेल म्हणून मान्यता मिळवलेली आहे. डॉक्टर राणी बंग यांना यापूर्वी महाराष्ट्र भूषण तसेच टाइम्स साप्ताहिकाचा ग्लोबल हेल्थ हिरोज या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. 25 वर्षे सातत्यपूर्ण संशोधन करत 'तारुण्यभान' चा कंटेंट स्त्रीरोग-तज्ज्ञ डॉ. राणी बंग (पद्मश्री) आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत काळजीपूर्वक तयार केला आहे. या उपक्रमातून प्रस्तुत होणारी माहिती आता पुस्तक रूपात देखील उपलब्ध आहे. डॉ. राणी बंग आणि करुणा गोखले लिखित 'तारुण्यभान' हे लैंगिकता या विषयाच्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकणारे पुस्तक सुद्धा उपलब्ध आहे. वैद्यकीय क्षेत्रात भरीव कार्य केल्या बद्दल त्यांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरचे अनेक पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.

**मेधा पाटकर-**

मुंबई येथे जन्मलेल्या मेधा पाटकर यांचे पालक सामाजिक व राजकीयदृष्ट्या जागरूक होते. त्यांच्या वडिलांनी भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात सहभाग घेतला होता. मेधा पाटकर या एक प्रसिद्ध भारतीय सामाजिक कार्यकर्त्या आहेत, ज्या शेतकरी, दलित, आदिवासी, मजूर आणि महिलांच्या वतीने विविध राजकीय आणि आर्थिक समस्यांवर काम करतात. लहानपणापासूनच, त्यांनी आपले जीवन सामाजिक कल्याणासाठी समर्पित केले, भूसंपादनाचा सामना करण्यासाठी विविध राष्ट्रीय कार्यक्रम सुरू केले आणि गेल्या ३२ वर्षांपासून असंघटित सार्वजनिक क्षेत्रातील कामगारांची संघटना असलेल्या नर्मदा बचाव आंदोलनासाठी काम केले. नर्मदा नदीवर धरण बांधण्याची योजना आखणाऱ्या सरदार सरोवर धरण प्रकल्पामुळे बाधित झालेले लोकांच्या हक्कांसाठी लढत आहेत. त्यांनी आणि इतर कार्यकर्त्यांनी नॅशनल अलायन्स ऑफ पीपल्स मूव्हमेंट (NAPM) ची स्थापना केली आणि हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन, आदर्श सोसायटी आणि हिरानंदानी यांसारख्या खाजगी रिअल इस्टेट डेव्हलपर्सविरुद्ध सार्वजनिक हिताचे खटले दाखल केले. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या माजी विद्यार्थिनी मेधा पाटकर या एक धाडसी सामाजिक कार्यकर्त्या आहेत.

**साधनाताई आमटे**

साधनाताई आमटे यांचा जन्म 05 मे, 1927 रोजी नागपूरच्या महालातील वैदिक परंपरा असलेल्या घुले घराण्यात साधना आमट्यांचा जन्म झाला. त्यांचे जन्मनाव इंदू असे होते. इंटरपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. मुरलीधर

देवीदास आमटे, अर्थात बाबा आमटे, यांच्याशी त्यांचे प्रेम जुळले व त्यातून 08 डिसेंबर, इ.स. 1946 रोजी दोघे विवाहबद्ध झाले. या मराठी समाजसेविका होत्या. कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनाचे कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातल्या आनंदवन आश्रमाच्या उभारणीत व व्यवस्थापनात पती मुरलीधर देवीदास आमटे यांच्यासह त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनाचे कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातल्या आनंदवन आश्रमाच्या उभारणीत व व्यवस्थापनात पती मुरलीधर देवीदास आमटे यांच्यासह त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. साधना आमटे 'समिधा' या नावाचे आत्मचरित्र प्रकाशित झाले असून त्यात, त्यांच्या व बाबा आमटे यांच्या सहजीवनाची वाटचाल कथन केली आहे. हे पुस्तक अतिशय प्रेरणादायी आहे.

**सिंधुताई सपकाळ**

प्रेमाला पोरक्या झालेल्या असंख्य निराधारांना आपल्या मायेच्या स्पर्शाने प्रेमाने आपलसं करणा-या सिंधुताई सपकाळ या मातेची कहाणी कुणालाही थक्क करणारी आहे. सिंधुताई सपकाळ अनाथांच्या आई म्हणून सर्व त्यांना ओळखतात. सिंधुताईनां लोक प्रेमाने माई म्हणत. माई मुळच्या विदर्भातल्या, वर्धा जिल्ह्यातील नवरगाव ही त्यांची जन्मभूमी. सिंधुताई ही त्यांची सर्वात मोठी मुलगी, सिंधुताईंना एक भाऊ आणि एक बहिण आहे. मुलीनं शिकावे अशी त्यांच्या वडिलांची खूप इच्छा होती पण आईचा मात्र सक्त विरोध होता म्हणुन माईंना गुर राखायला पाठवत असे, मात्र इकडे माई शाळेत जाऊन बसत. माई मुळच्या बुद्धिमान पण जेमतेम मराठीच शिकता आले. अठराव्या वर्षापर्यंत माईची तीन बाळंतपण झाली. त्या चौथ्या वेळी गर्भवती असताना त्यांनी त्यांच्या जीवनातील पहिला संघर्ष केला. तेव्हा गुरे वाळणे हा त्यांचा व्यवसाय होता. गुर ही शेकड्याने असायची, त्यांचे शेण काढता काढता कंबर मोडायचे. स्त्रिया शेण काढून अर्धमेल्या होऊन जात. पण त्या बद्दल त्यांना कोणतीही मजुरी मिळायची नाही, म्हणून माईंनी बंड पुकारले. माई हा लढा जिंकल्या पण या लढ्याची किमत त्यांना चुकवावी लागली. पतीने घराबाहेर काढल्या नंतर गावक-यांनीही त्यांना हाकलून दिले. एकदा जळगाव जिल्ह्यातील पिंपराळा स्टेशनवर त्यांनी आत्महत्येचा प्रयत्नही केला. पण 'लहान मुलीचा जीव घेतला तर पाप लागेल' म्हणून मागे फिरल्या. मग पुन्हा भीक मागत पोट भरणे सुरू झाले. सिंधुताई दिवसभर भीक मागायच्या आणि रात्री स्टेशनवरच झोपायच्या. पण तिथे त्यांनी कधी एकटे खाल्ले नाही. स्टेशनवरच्या सगळ्या भिकाऱ्यांना बोलावून त्या मिळालेल्या अन्नाचा काला करायच्या आणि मग सर्व भिकारी एकत्र बसून जेवायचे. त्यांनीच २१ वर्षांच्या ताईंना संरक्षण दिले. भारतातील अनाथ मुलांचे संगोपन करण्याच्या कार्यासाठी ओळखल्या जातात. ममता बाल सदन च्या माध्यमातून अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी सिंधुताई यांनी ममता बाल सदन संस्थेची स्थापना केली. 1994 साली पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावात ही संस्था सुरू झाली. आपली कन्या ममता हिला दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी सेवासदन येथे दाखल केले आणि त्यांनी इतर अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला. येथे लहान मुलांना सर्व शिक्षण दिले जाते. त्यांच्या भोजन, कपडे अन्य सुविधा यांची उपलब्धता संस्थेकडून केली जाते. शिक्षण पूर्ण झाल्यावर येथील मुले आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील यासाठीही त्यांना मार्गदर्शन दिले जाते. आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्यावर या युवक युवतींना योग्य जोडीदार शोधून देणे आणि त्यांच्या विवाहाचे आयोजन करणे हे कार्यही संस्थेकडूनच केले जाते. अशी सुमारे १०५० मुले या संस्थेत राहिलेली आहेत. सिंधुताई यांनी अन्य समकक्ष संस्थाही स्थापन केलेल्या आहेत त्या याप्रमाणे- बाल निकेतन हडपसर, पुणे. सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, चिखलदरा. अभिमान बाल भवन, वर्धा. गोपिका गाईरक्षण केंद्र, वर्धा ( गोपालन). ममता बाल सदन, सासवड. सप्तसिंधु महिला आधार बालसंगोपन व शिक्षणसंस्था, पुणे. आंतरराष्ट्रीय पातळीवर सिंधुताई यांनी आपल्या संस्थेच्या प्रचारासाठी आणि कार्यासाठी निधी संकलन करण्याच्या हेतूने प्रदेश दौरे केले आहेत आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्यांनी आपल्या बोलण्याने

आणि काव्याने समाजाला प्रभावित केले आहे. परदेशी अनुदान मिळणे सोपे जावे या हेतूने त्यांनी मदर ग्लोबल फाउंडेशन संस्थेची स्थापना केली आहे.

**निलिमा मिश्रा -**

अत्यंत प्रतिष्ठेचा रेमन मॅगसेसे अॅवॉर्ड यंदा निलिमा मिश्रा आणि हरीश हांडे या दोन भारतीयांना मिळाला. विशेष म्हणजे निलिमा मूळच्या उत्तर प्रदेशातील असल्या तरी महाराष्ट्रात त्यांच्या सात पिढ्या वास्तव्यास आहेत. त्यामुळे साहजिकच तमाम महाराष्ट्राला अत्यंत गौरवास्पद अशी ही घटना आहे. यांना ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी केलेल्या सामाजिक कार्यासाठी रेमन मॅगसेसे पुरस्कार मिळाला आहे. नीलिमा जळगाव जिल्ह्यातील बहादरपूर गावच्या रहिवासी आहेत. ग्रामीण भागात समाजकार्याला वाहून घेण्यासाठीच निलिमाने अविवाहित राहण्याचा निर्धार केला. मानसशास्त्राची पदवी घेतल्यानंतर पुण्याजवळील विज्ञानग्राम या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून सलग आठ वर्षे संपूर्ण भारतभर फिरली आहे. यादरम्यानच लोकांचे जीवनमान पाहून तिने त्यांच्या उन्नतीसाठीच वाहून घेण्याचा निर्धार केला. तिच्या जवळचे अनेक मित्र-मैत्रिणी बड्या उद्योजक घराण्यातील, राजकीय परिवारातील आहेत. त्यांनाही निलिमाच्या कार्याचे कौतुक आहे. ते तिला आवर्जून मदत करतात. लोकांना अर्थसाहाय्य करून परावलंबी करण्यापेक्षा, स्वावलंबी बनव आणि जीवनाशी झगडण्याचे बळ मिळवून दे, असा सल्लाही देतात. तिच्या कार्याने ते सिद्ध करून दाखवले आहे. त्यांना अतिशय मानाचा पुरस्कार मॅगसेसे पुरस्कार 2011 साली प्रधान करण्यात आला.

**डॉ नसीमा हुरजूक -**

नसीमा हुजरूक यांनी 1984 साली आपल्या समविचारी मित्र-मैत्रिणीच्या सोबतीने अपंगांना साहाय्यभूत ठरेल अशी 'हेल्पर्स ऑफ दि हॅन्डिकॅप्ड, कोल्हापूर' नावाची संस्था काढली.त्यानंतर 3 डिसेंबर, 2020 रोजी जागतिक अपंगदिनाचे औचित्य साधून "साहस डिसॅबिलीटी रिसर्च आणि केअर फौंडेशन, कोल्हापूर" या नव्या संस्थेची स्थापना केली. या नवीन संस्थेमार्फत पूर्वीपेक्षाही आधिक व्यापक प्रमाणात संपूर्ण महाराष्ट्र व शेजारील राज्यांच्या ग्रामीण भागातील समाजात दुर्लक्षित घटक राहीलेल्या अपंगाना मूलभूत सहाय्य पूरविले जाते तसेच त्यांना विविध कौशल्य प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनण्यास मदत केली जाते. हेल्पर्स ऑफ दि हँडिकॅप्ड- अपंगांना आवश्यक ती वैद्यकीय मदत मिळवून देता यावी, तसेच त्यांना स्वबळावर स्वावलंबी आयुष्य जगता यावे हे या संस्थेचे कार्यक्षेत्र आहे. 1993 साली व्यवसाय प्रशिक्षण केंद्र स्थापले, 1996 साली 'घरोंदा' वसतिगृहाची व पुनर्वसन केंद्राची स्थापना केली. 2001 साली कुडाळ येथे काजू प्रक्रिया प्रकल्प व वसतिगृह अस्लेल्या 'स्वप्ननगरी प्रकल्पा'ची स्थापना करून अनेकांना रोजगार मिळवून दिला.

**श्रीमती उल्का महाजन-**

एमएसडब्ल्यू पदवी घेतल्यानंतर उल्का महाजन यांनी रायगड जिल्ह्यातील आदिवासी भागातील लोकांसाठी १९८९ साली काम सुरू केले. त्या जिल्ह्यातील कातकरी आदिवासींचा पिढ्या न पिढ्या कसत आलेल्या जमिनीवरही हक्क नाही. या जमिनींच्या कागदपत्रावर त्यांचे नावच नाही. कात पाडण्याचा त्यांचा पारंपरिक व्यवसाय, परंतु जंगलतोडीमुळे ते काम बंद झाले आणि या आदिवासींवर उपासमारीची वेळ आली. पोटासाठी दुसऱ्याच्या जमिनीवर वेठबिगारी करून वर्षानुवर्षे ते शोषणाचे बळी ठरू लागले. पंधरा हजार कुटुंबे आणि सुमारे पंचाहत्तर हजार लोकांसाठी उल्का महाजन या सुमारे दोन दशके लढे करत आहेत. शेतकऱ्यांना जमिनीचे हक्क मिळवून देणे, त्यांचे पुनर्वसन करणे, शेतमजुरांना संघटित करणे, वीटभट्ट्यांवरील कामगार आणि स्थलांतरित मजुरांची संघटना बांधणे, आदिवासी महिलांना आधार देणे, रायगड जिल्ह्यातील दलितांना पाण्याचा समान हक्क मिळवून देणे अशा विविध लढ्यांबरोबरच रायगडमधील एसईझेड (स्पेशल इकाॅनॅमिक झोन) आणि दिल्ली - मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरविरोधातील लढ्यातही

त्या सतत अग्रेसर राहिल्या. श्रीमती उल्का महाजन यांनी लिहिलेली कार्य आणि कार्यकर्ते (आत्मकथन), कोसळता गावगाडा 2015 या पुस्तकांची निर्मिती केली आहे.

उपरोक्त वर्णनानुसार महिला चळवळी या पाण्याचा हक्क, अन्याया विरुद्ध बंड, वर्णव्यवस्थेचा विरोध, मानवी हक्कांची मागणी, समानता, गरिबीतून मुक्तता, अस्पृश्यतेपासून, पुरुषांच्या गुलामीतून मुक्तता, शोषणा विरुद्ध लढा, शिक्षण, सामाजिक, राजकीय, आर्थिक हक्क इत्यादी मुद्द्यांना अधीन राहून कार्य केले आहे. भारतात वेगवेगळ्या ठिकाणी चालणाऱ्या या चळवळीमध्ये हजारो महिला जोडल्या गेल्या. या चळवळीत अनेक महिला सत्याग्रहात तुरुंगात गेल्या, रात्रंदिवस उपाशीपोटी सत्याग्रहात बसल्या, वेळ प्रसंगी लाठ्या-काठ्या खाल्ल्या, परंतु शौर्याने, धिराने,आणि हिमतीने आपल्या अधिकारांसाठी समाजासाठी खचून न जाता खंबीरपणे तग धरून उभ्या राहिल्या. महिला चळवळी ह्या अस्पृश्यता,लिंग भेदभाव,असमानता हे सर्व संपवण्यासाठी शिक्षणाचे हत्यार उपसत होत्या.

**सारांक्ष-**

महिलांच्या अंगी जन्मजात क्षमता विकसित असतात, त्यांना त्यांच्या स्वप्नातील विधायक कार्य करण्यासाठी सहकार्य करणे गरजेचे असते, महिला वर्गाला सन्मान प्राप्त करून देण्यासाठी कौटुंबिक, सामाजिक प्रयत्न व सकारात्मक हस्तक्षेप महत्वाचा आहे. महिलांच्या विकासासाठी केवळ स्वयंसेवी संस्थानी प्रयत्न करून चालणार नाही, तर शासनाने, समाजातील प्रत्येक जबाबदार घटकाने विशेषतः पुरुष गटाने, त्यांच्या सर्वांगीण कृतीचा सन्मान केला पाहीजे. समाजातील घटकांपर्यंत पोहचवून, लाभार्थी मिळण्यासाठी, समाजकार्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांनी, संस्थानी व सामाजिक कार्यात योगदान देणाऱ्या व्यक्तींनी, वंचित असणाऱ्या महिलांचा व लाभार्थांचा शोध घेऊन त्यांना विकास प्रक्रियेत आणण्यासाठी प्रयत्न करावेत. महिलांचे कार्य खरोखरच समाजासाठीचे कार्य खरच वंदनीय, असाधारण,आणि अतुलनीय आणि प्रेरणादायी असे आहे. वरील व्यक्तींनी संघर्षातून निर्माण केलेल्या कार्याची ओळख संस्थात्मक पातळीवर कायम टिकून राहील व त्यांनी उभारलेले विधायक कार्य देशाला समर्पित राहील.

**संदर्भ सूची-**

1. खरेखुरे आयडॉल्स (लेखसंग्रह), प्रकाशक युनिक फीचर्स, संपादक सुहास कुलकर्णी, (2006) 'नसिमा हुरजूक', लेखक शिल्पा दातार-जोशी, पाने 72 ते 79.
2. कविता फाले-बोरीकर, जिल्हा माहिती कार्यालय, नागपूर स्त्रोत : महान्यूज
3. बोधनकर सुधीर,(2003) सामाजिक संशोधन पध्यती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
4. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री स्वातंत्र्य,प्रा.गौतम निकम, विमलकीर्ती प्रकाशन,चाळीसगाव.
5. दलित स्त्रियांच्या मुक्तीचा प्रश्न, प्रा. संजयकुमार कांबळे,डायमंड पब्लिकेशन,पुणे.
6. आधुनिक भारतातील दलित ( दृष्टीकोन आणि मुल्ये ) एस.एम.मायकेल.मराठी अनुवाद.विद्या भाके, डायमंड पब्लिकेशन,पुणे.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B
ISSN : 2278-9308
February 2024

# महिला उद्योजकता विकासासाठी शासन पुरस्कृत योजनांचा अभ्यास

**प्रा. मंगल लक्ष्मण बैनाडे.**
संशोधक वाणिज्य विभाग प्रो. रामकृष्ण मोर, आर्ट्स,कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आकुडी, पुणे
E- mail – mangal.bainade@gmail.com ,Contact No- 8983315575

**प्रस्तावना -**

आधुनिक समाज व्यवस्थेमध्ये महिलांची भूमिका गतिमान झाल्यामुळे महिला उद्योजक ही संकल्पना पुढे आली आहे. जागतिक स्तरावर १९८० मध्ये कोपनहेगण ( डेन्मार्क )येथे 'संयुक्त राष्ट्राचे दशक' यावर जागतिक परिषद घेण्यात आली होती. त्यामध्ये महिलांच्या स्वयंरोजगाराच्या संधी व त्याबाबतच्या जबाबदाऱ्या, अपारंपरिक उद्योग क्षेत्रातील महिलांना असणाऱ्या संधी, व्यवस्थापन पातळीवर महिलांची भूमिका इत्यादि विषयावर चर्चा होऊन महिलांसाठी एक कृती कार्यक्रम तयार करण्यात आला. नोव्हेंबर १९८१ मध्ये दिल्ली येथे महिला उद्योजकांचे पहिले राष्ट्रीय संमेलन आयोजित करण्यात आले. या संमेलनात व्यवसायाच्या दृष्टीने सर्व प्रकारच्या सुविधा महिला उद्योजकांना देण्याचे ठरवण्यात आले. १९९० च्या दरम्यान स्त्रिया विविध क्षेत्रातील उच्च शिक्षण, धाडस, आत्मविश्वास, महत्वाकांक्षा यामुळे मोठ्या उद्योगातील धोकेही पत्कारू लागल्या. २१ व्या शतकात महिला आज टेलिकॉम, माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रात कुशल होताना दिसून येत आहेत.

महिला उद्योजकतेला चालना व प्रोत्साहन मिळावे या साठी राज्य मंत्रिमंडळाने १४ डिसेंबर २०१७ रोजी "महिला उद्योजकांसाठी औद्योगिक धोरण" मंजूर केले. महिला उद्योजकांसाठी धोरण असणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होते. या धोरणानुसार महिला उद्योजकांची व्याख्या अशी आहे की " महिला उद्योजकांचा एक गट ज्याने या प्रकल्पासाठी १००% अर्थसहाय्य दिले आहे आणि किमान ५०% महिला कर्मचारी सेवेत घेतले आहेत" त्यांना महिला उद्योजक म्हणून मानले जाईल. या धोरणात महिला उद्योजकांना प्रकल्पाच्या भांडवल गुंतवणुकीच्या १५%-३५% च्या प्रमाणात ५% पर्यंतच्या व्याजदराने १५ लाख ते १ कोटी रुपया पर्यन्तची आर्थिक मदत मिळते त्याच बरोबर प्रकल्पांना कमी दराने वीज पुरवठा देखील केला जातो.

**मूळ शब्द** – महिला, महिला उद्योजक, अर्थसाहाय्य, भांडवल योजना, उद्योजक्ता विकास इत्यादि.

**अध्ययनाचा उद्देश –**

1. महिला उद्योजकांना उपलब्ध असलेल्या योजनांचा अभ्यास करणे.
2. उद्योजकता विकास समजून घेणे.

**अध्ययन पद्धती** – हा शोध निबंध पूर्णपणे दुय्यम माहितीच्या आधारे लिहिण्यात आलेला आहे.

**गृहितके -**

1. महिला उद्योजकांसाठी असणाऱ्या भांडवल विषयक योजना समजून घेणे.
2. महिला सशक्तीकारणासाठी असणाऱ्या विविध योजना समजून घेणे.
3. कर्जविषयक योजनांची पात्रता अभ्यासणे.

राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या महिला उद्योजकांना प्रोत्साहन करण्यासाठी पुढील योजना राबवण्यात येतात –

**१ ) अन्नपूर्णा योजना** – या योजनेअंतर्गत अन्न आणि केटरिंग उद्योगासाठी महिला उद्योजकांना लघुउद्योग स्थापन करण्यासाठी हे कर्ज दिले जाते. उपकरणे व भांडी खरेदी करणे, ट्रक उभारणे इत्यादि साठी भांडवल उपलब्ध करून दिले

जाते. या योजने अंतर्गत महिला पॅक खाद्य पदार्थ आणि स्नॅक्सची विक्री करू शकतात यासाठी रुपये ५०,०००/- पर्यन्त अर्थसाहाय्य दिले जाते.

२ ) **मुद्रा योजना** – या योजनेचा मुख्य उद्देश व्यावसायिक कर्ज देऊन देशातील महिलांची स्थिति सुधारणे आणि त्यांचे समर्थन करणे जेणे करून त्या आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आणि स्वावलंबी राहू शकतील. कर्जाची मंजूरी घेतल्यानंतर त्यांना मुद्रा कार्ड दिले जाते. जी कर्जाच्या १०% रक्कम काढण्याच्या मर्यादेसह क्रेडिट कार्ड प्रमाणे काम करतात. या योजनेमध्ये व्यवसायाचा प्रकार, विस्ताराची पातळी आणि कर्जाच्या उद्दिष्टानुसार विविध प्रकारच्या योजना आहेत. या योजनेअंतर्गत कर्जाची मर्यादा १० लाख रुपये आहे.

३ ) **प्रधानमंत्री युवा रोजगार योजना** – ही योजना पी एम आर वाय (PMRY) म्हणूनही ओळखली जाते ही योजना महिला उद्योजकांसाठी सामाजिक आणि आर्थिक दोन्ही दृष्टीने एक उत्तम योजना आहे. या योजनेचे उद्दिष्टय महिला उद्योजकांच्या माध्यमातून कौशल्य आधारित स्वयंरोजगार निर्माण करणे आणि आर्थिक स्वातंत्र्यासाठी वापरल्या जाणाऱ्या स्मार्ट माइंडसवर लक्ष्य केंद्रित करून त्यांना स्वावलंबी करणे ही आहे. या योजनेत शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागांचा समावेश आहे. या योजने अंतर्गत कर्ज मर्यादा सेवा क्षेत्रास २ लाख रुपये तर उद्योगासाठी ५ लाख रुपये आहे.

४ ) **उद्योगिनी योजना** - ही योजना नवोदित महिला उद्योजकांना कर्ज देण्याचे आणि खाजगी क्षेत्राच्या व्याजदरापेक्षा कमी व्याजदराने कर्जपुरवठा करणे हा उद्देश आहे. ज्यांचे कौटुंबिक उत्पन्न प्रतिवर्ष रुपये ४०,०००/- पेक्षा कमी आहे केवळ त्यांच्यासाठी ही योजना वैध आहे. या कार्यक्रमाद्वारे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना स्वावलंबी होण्यास प्रोत्साहित केले जाते. या योजनेअंतर्गत १ लाख रुपया पर्यन्त कर्जपुरवठा केला जातो.

५ ) **पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम ( PMEGP )** – खादी व ग्रामोद्योग आयोग ही राष्ट्रीय स्तरावरील नोडल एजन्सि म्हणून कार्यरत आहे. राज्यस्तरावर ही योजना राज्य के व्ही आय सी संचालनालय, राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळे ( के व्ही बी ) जिल्हा उद्योग केंद्रे ( डी आय सी ) आणि बँकांच्या माध्यमातून राबविली जाते. अशा परिस्थितीत के व्ही आय सी लाभार्थी / उद्योजकांना थेट त्यांच्या बँक खात्यात सरकारी अनुदान पाठवले जाते. अर्थ सहाय्यकहे स्वरूप उत्पादन क्षेत्राला मान्यताप्राप्त उत्पादन प्रकल्पासाठी प्रकल्प यूनिटची कमाल किंमत २५ लाख आणि सेवा क्षेत्रासाठी टी रक्कम १० लाख आहे

पी एम ई जी पी अंतर्गत केवळ नवीन प्रकल्प मंजुरीसाठी विचारात घेतले जातात. बचत गट बी पी एल सदस्यांसह ज्यांनी इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नाही, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था, उत्पादन सहकारी संस्था आणि धर्मादाय विश्वस्त संस्था देखील या योजनेस पात्र ठरतात

६ ) **मायक्रो आणि स्मॉल एंटरप्राइजेस ( सी जी टी एस एम ई ) स्कीम क्रेडिट गॅरेनटी ट्रस्ट फंड-** सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आणि लघु उद्योग विकास बँक मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने मायक्रो आणि स्मॉल एंटरप्राइजेस साठी क्रेडिट गॅरेनटी योजना लागू करण्यासाठी क्रेडिट गॅरेनटी फंड ट्रस्ट फॉर मायक्रो आणि स्मॉल एंटरप्रायजेस (SGTMSE) नावाने एक ट्रस्ट स्थापन केलेला आहे. बँक देत असलेल्या कर्जाच्या ७५% रककमेची हमी या ट्रस्ट फंड द्वारे दिली जाते. www.dcmsme.gov.in/schemes/sccrguarn.htm या संकेत स्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे.

७ ) **व्याज अनुदान पात्रता प्रमाणपत्र ( ISCE )** – खादी संस्थांनी हाती घेतलेल्या खादी कार्यक्रमासाठी व्याज अनुदान पात्रता प्रमाणपत्र ही महत्वाची योजना आहे. कार्यशील भांडवलासाठी प्रतिवर्ष ४% सवळतीच्या दराने पतपुरवठा केला जातो. वास्तविक कर्जदर आणि व्याजदर यातील फरक केंद्र सरकारकडून कर्ज देणाऱ्या बँकांना के व्ही आय सी मार्फत दिली जाते. राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळांमध्ये नोंदणीकृत संस्था या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

८ ) **स्टार्ट अप इंडिया स्टँड अप इंडिया** – स्टँड अप इंडिया योजनेचे उद्दिष्ट म्हणजे ग्रीनफील्ड स्थापित करण्यासाठी किमान एक अनुसूचित जाती किंवा जमाती कर्जदाराला किमान १० लाख ते १ कोटी दरम्यान बँक कर्ज उपलब्ध करून

देते. प्रत्येक बँकेच्या शाखेत किमान १ महिला कर्जदार उपक्रम राबवणे हा या योजनेचा उद्देश आहे. नवनवीन कल्पना घेऊन उद्योजक होण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणांसाठी ही योजना खूप फायदेशीर ठरत आहे. या योजनेतील लाभार्थीयांची संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसून येत आहे. हा उपक्रम उत्पादन, सेवा, कृषि संबंधी कार्या किंवा व्यापार क्षेत्रात असू शकतो. वैयक्तिक नसलेल्या उद्योगांच्या बाबतीत किमान ५१% भागभणदवळ नियंत्रित करणे. याच बरोबर केंद्र आणि राजजय सरकारच्या महिला उद्योजकांसाठीच्या विशेष योजनांना अनुसरून अनेक बँका वित्तापूरवठ्यासाठी खास उपक्रम राबावतात.

**९) क्वॉयर इंडस्ट्री साठी योजना –** क्वॉयर विकास योजना,क्वॉयर इंडस्ट्री टेक्नॉलजी अपग्रेडेशन स्कीम, क्वॉयर साठी विज्ञान आणि तंत्रज्ञान विकसित करून कौशल्य सुधार करून महिलांना या योजनेचा लाभ घेता येतो तसेच महिलांना घरगुती बाजार जाहिरात केली जाते. व्यापार आणि उद्योग संबंधित पायाभूत सुविधा पुरवल्या जातात.

**१० ) तंत्रज्ञान श्रेणी सुधारणा आणि गुणवत्ता प्रमाणपत्र –**

**अ ) झेड ई डी प्रमाणपत्र योजनेतील एम एस एम ई ना आर्थिक सहाय्य –** या योजनेच्या उद्दिष्टा मध्ये उत्पादन प्रक्रियेत शून्य दोष आणि शून्य परिणाम पद्धती समाविष्ट करणे. निरंतर सुधार सुनिश्चित करणे आणि मेक इन इंडिया उपक्रमास पाठिंबा देणे हा या योजनेचा उद्देश आहे.

**ब ) नावीन्य ग्रामीण उदयोग आणि उद्योजकता जाहिरात करणारी योजना ( ASPIRE ) –** या योजनेदवारे नवीन रोजगार निर्माण करणे आणि बेरोजगारी कमी करणे. भारतातील उद्योजकता संस्कृतीला चालना देणे, सामाजिक गरजा पूर्ण करण्यासाठी नावीन्यपूर्ण व्यवसाय आणि नविण्यास प्रोत्साहन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. https;//aspiremsme.gov.in/aspire/ahome.aspx या संकेत स्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे.

**क ) लायव्लीहुड बिझनेस इनकयूबेटर (Livelihood Business Incubator) –** या योजनेचे मुख्य उदिष्टय ही देशातील उद्योजकता विकासासाठी अनुकूल परिसंस्था निर्माण करून स्थानिक पातळीवर रोजगार निर्माण करणे आणि बेरोजगारी कमी करणे हा आहे. या योजनेअंतर्गत स्थापन झालेल्या केंद्रांच्यासाठी जमीन व पायाभूत सुविधांव्यतीरिक्त यंत्रासमग्रि व कारखाण्यासाठी १००% किमतीचे अथवा १००लाख रुपये एकवेळ अनुदान या पैकी जे रक्कम कमी आहे ते प्रदान करण्यात येईल. इनकयूबेटर सेंटर साठी जमीन व पायाभूत सुविधा व्यतिरिक्त यंत्रासमग्री व कारखण्यासाठी ५०% किमतीचे अथवा ५० लाख रुपये एक वेळ अनुदान या पैकी जे कमी आहे ते प्रदान करण्यात येते. अशी एकूण १५० केंद्रे सुरू करण्याचे लक्ष्य आहे या साठी १३५ कोटी रुपये खर्चाची तरतूद आहे.

**ड ) खरेदी विपणन समर्थन योजना ( पी अँड एमएस ) –**

संबंधित योजना खरेदी व विपणन समर्थन योजना वर्णन व खरेदी व विपणन समर्थन योजनेत सूक्ष्म व लघु उद्योगांना देशांतर्गत बाजारपेठ विकसित करण्यासाठी आणि नवीन बाजार प्रवेश उपक्रमांना प्रोत्साहित करते. एम एस ई २०१२ च्या सार्वजनिक खरेदी धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बाजारपेठ जोडणी सुलभ करते. व्यापार मेळे, नविन बाजारतंत्र अशा विषयांवर जागरूकता निर्माण करणे.

**महिला उद्योजकता विकासासाठी उपाययोजना –**

१ ) महिला उद्योजकता विकासासाठी विविध योजना तयार करण्यात येतात परंतु या योजना फक्त ठराविक गटा पर्यन्त पोहचतात परंतु गरजू घटकांना याचा लाभ व्हावा यासाठी परिणामकारक यंत्रणा तयार केली पाहिजे.

२ ) महिला उद्योजकांना सवळतीच्या दराने कर्ज पुरवठा करून त्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी सहाय्य करावे.

३ ) महिलांना उद्योग संचालनासाठी प्रशिक्षण देण्याची गरज असते त्यामुळे त्यांना योग्य प्रशिक्षण व्यवस्था निर्माण करून दिली पाहिजे.

ISSN : 2278-9308
February 2024

४ ) सूक्ष्म आणि लागहुउद्योगांचे काही समूह सध्या कार्यरत आहेत. प्रत्येक जिल्ह्यातीलअग्रणी बँकांनी असे समूह शोधून त्यांना वित्तपूरवठा करणे.

५ ) उद्योजकता विकासासाठी सरकारद्वारे घोषणा केल्याजातात परंतु जाचक अटी असल्यामुळे त्याची परिनामकरक्त कमी होते त्यामुळे अटी शिथिल करण्यात याव्या.

**संदर्भ साहित्य -**


1. जोशी.सी.जे आणि जोशी. एस (१९९८ ) उद्योजकतेची मूलतत्वे, कोल्हापूर, फडके प्रकाशन.
2. Wasanthagopal and santhas (2010), women entrepreneurs in india, New Delhi, new century publishing House Page No.14.
3. Dr. Ajay sharma, MS. Sapna Dua, Mr. Vinod Hatwa (2012) Micro enterprises development and rural women enterprises; way for economic empowerment economics and management
4. Datta R and Sundaram(2016 ) Indian economy, S.Chand And co.
5. Vasant Desai (2014) Small-Scale industries and Entrepreneurship Himalaya Publication
6. www.msme.com
7. https;//aspiremsme.gov.in/aspire/ahome.aspx
8. www.dcmsme.gov.in/schemes/sccrguarn.htm
9. योजना मासिक

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B
ISSN : 2278-9308
February 2024

# महिला सक्षमीकरण संकल्पना व सद्यस्थिती

डॉ. अलका अनिल मानकर
अर्थशास्त्र विभाग प्रमुख श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा रेल्वे जी. बुलढाणा

यत्र नार्यस्तू पुज्यंते, रमनते तत्र देवता

जिथे स्त्रियांचा मानसन्मान आदर केला जातो तिथे देवता वास करते असे म्हणणाऱ्या आमच्या भारतीय समाजात जगातील कोणत्याही संस्कृतीत स्त्रियांची महानता स्पष्ट झालेली दिसते. निसर्गत स्त्री व पुरुष यांच्यात जैविक फरक आहेत. देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून स्त्री पुरुष प्रमाण अत्यंत महत्त्वाचे ठरते. 50% स्त्रि वर्गाला अंध: करात ठेवून कुठल्याही समाज प्रगती करू शकत नाही. असे जरी असले तरी भारतीय समाजात आजही हुंडा पद्धती, मुलींच्या शिक्षणाबाबत दुर्लक्ष, स्त्रियांचे कुटुंबातील स्थान, बलात्कार, यासारखे प्रश्न पुर्णत सुटलेले दिसत नाही. स्त्री कुटुंब व्यवस्थेचा कणा मानली जाते. कारण स्त्रि कुटुंबाची जबाबदारी योग्य रीतीने सांभाळून मुलांना घडविण्याचे काम करते परिणामी उद्याचा समाज घडविण्याचे कार्य करते.

आज स्त्रिया सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करताना आढळतात स्त्रि राष्ट्रपती पदापासून, उद्योजक, अंतराळयान, संशोधनाचे क्षेत्र, वैमानिक अश्या प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहे. स्त्रि ही वात्सल्याची मूर्ती आहे. ती शारीरिक मानसिक दृष्ट्या सुदृढ आहे. असे असले तरी भारतीय स्त्रियांना निम्न दर्जा जन्मापासून मृत्यूपर्यंत असल्याचे दिसते. महिलांचे सक्षमीकरण ही संकल्पना महिलांच्या विकासा संदर्भात रूढ झाली आहे.

कुटुंबाच्या देशाच्या विकासाकरिता संसररुपी गाडा सांभाळणाऱ्या रथाची स्त्रि पुरूष दोनही चाके महत्वाची ठरतात महिलांना समान हक्क व संधी देणे हे महत्वाचे आहे. कायदे आणि कल्याण कार्यक्रमाद्वारे सामाजिक शैक्षणिक आर्थिक व राजकीय अश्या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना विविध हक्क प्रदान करून त्यांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा प्रदान करणे, विकासाची संधी उपलब्ध करून देणे त्यायोगे स्त्री पुरुष असमनता कमी करणे, या प्रक्रियेला महिला सबलीकरण म्हणतात

सबलीकरण ही नियंत्रण संपादन करण्याची प्रक्रिया आहे. नियंत्रण स्वत: वरील असू शकते विचार स्तरावरील असू शकते आणि सत्ता प्रदान करणाऱ्या साधन सामग्री बाबत असू शकते. अश्या नियंत्रणासाठी व अधिकारासाठी सबलीकरण असे म्हणता येऊ शकेल.

सिंधू संस्कृतीचा काळापासून तर मध्ययुगीन काळापर्यंत स्त्रियांना अनेक जाचक रूढी, परंपराचा सामना करावा लागला. ब्रिटिशांनी येथे स्थिरस्थावर शिक्षणाचा प्रसार केला त्यामुळे पाश्चात्य भाषा, ज्ञान, विचार यांनी येथील समाजात जागृती आली राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नाला यश येऊन ब्रिटिशांनी सती प्रथा बंदी कायदा पास केला. बालविवाह नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. परंतु त्याची कठोरपणे अंबलाबजावनी न केल्याने या प्रथा पूर्णपणे नष्ट झाल्या नाहीत १९व्य शतकात पाश्चात्य देशात स्त्री स्वातंत्र्याची चलवळ सुरू होती त्याचवेळी भारतामध्ये स्त्री स्वातंत्र्य व स्त्री शिक्षणाचे बीजारोपण महात्मा फुले व सावित्रीबाई फुले या दांपत्यांनी केले महात्मा फुले यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना करून शोषितावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याची कार्य केले. समाजात स्त्रियांविषयी असणाऱ्या बुरसटलेल्या विचारांना आळा घालणाऱ्या प्रयत्न केला. पुरुष सत्ता जाती व्यवस्था व धर्म संस्था यांच्याकडून स्त्रियांचे शोषण कसे होते हे सत्यशोधक चळवळीने मांडले शिवाय या समाजाने व्यक्तीचे क्षेष्ठत्व जन्मावरून नाही तर गुणाने ठरते यावर भर दिला. बंधुभाव, सदाचार, भूतदया, यावर भर देवून एकेश्वरवादी, बुद्धिप्रामाण्य, मानवतावाद

या मानवी मूल्यांची जोपासना केली आज आपण ज्या व्यवस्थेला पुरुष प्रधान व्यवस्था म्हणतो, त्यावर सत्यशोधक दृष्टीने पहिला हल्ला चढविण्याचे श्रेय ताराबाईंना दिले पाहिजे स्त्रियांवरील अन्याय अत्याचार दूर करण्याकरिता अनेक नियम कायदे करण्यात आले. एवढे स्त्री संदर्भात कार्य होऊन सुद्धा देशातील स्त्रियांच्या परिस्थितीत म्हणावा तसा फरक पडला नाही. कारण धार्मिक रूढी, परंपरा ने समाज बरबटलेला दिसतो.

स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून स्त्रियांना स्वतंत्रेचा दर्जा प्राप्त करून देवून एक स्त्री पुरुष समानतेचे स्थान प्राप्त करू दिले. राज्य घटनेतील कलम १५ नुसार लिंगभेदाच्या आधारावर स्त्री पुरुष असा भेद करता येणार नाही. दोघांनाही सामान दर्जा आहे. शेकडो वर्षाच्या कालखंडानंतर भारतीय स घटनेने स्त्री पुरुषांना सामान दर्जा देवून समाजाच्या देशाच्या प्रगतीच्या वाट स्त्रियांना मोकळया करून दिल्या. घटनेने दिलेल्या सामान दर्जामुळेच आज स्त्रियांच्या पंखांना बळ मिळून स्त्रिया प्रगतीची उंच भरारी प्रत्येक क्षेत्रात घेत आहेत.

"सावित्रीच्या मुली आम्ही......
आम्ही इवल्या नाती....
परंपरेच्या जात्यावरती.....
नाकारून ओवी
सायबर युगात गाऊ
आता नवीन ग्लोबल गाणी "

आज प्रत्येक मुलगी याच विचाराची असणार आहे. आणि ती सुद्धा माझा हक्क मी मिळवणारच असे तत्त्व ठेवणारी असेल. आज आपण २१व्य व्या शतकात पोहोचलो अनेक शैक्षणिक बदल झाले स्त्री हि आपल्या स्वतः च्या कर्तुत्वाची स्वामींनी असे विचार तयार झाले, स्त्री बद्दल काव्य रचली व्याखाने झाली कागदोपत्री आरक्षण उभे राहिले पण ? खरंच स्त्री जन्माला स्वातंत्र्य मिळालं का? हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. समाजाने पुरुषाइतका स्त्री दर्जा मान्य केला आहे? " जिच्या हाताने नवजीवन फुलते, जिच्या हाताने घरकुल सजते, जिच्या कुशीत जन्म होते तरी पण स्त्रीच्या जीवनाची अधोगती का? स्त्री एक स्त्रीच आहे म्हणून" ?

आज प्रत्येक स्त्रीच्या कार्याची सुरुवात तिच्या घरापासूनच होते स्त्री म्हणजे खऱ्या अर्थाने घराची व्यवस्थापक, होम मिनिस्टर, अलीकडे स्त्रिया अर्थार्जनाकरिता नोकरी, उद्योग, व्यवसाय, शेतकरी, शेतमजूर, स्त्री राजकीय क्षेत्र प्रत्येक क्षेत्रात काम करते तेव्हा तिला दुहेरी भूमिका सांभाळाव्या लागतात. घरातील कामे अर्थार्जनकरिता विविध कामे, मुलांचे संगोपन जे अत्यंत आवश्यक ज्यामुळे घडणार असे त्याला संस्कार द्यावे लागते. स्त्रीला पुरुषाप्रमाणे एक कार्य दूर करून सुद्धा जावू शकत नाही.

**भारतीय समाजातील स्त्रियांची सद्यस्थिती :**स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मानवी व घटनात्मक मूल्यांच्या परिणाम नवीन पिढीवर होऊ लागला. मुलांप्रमाणेच मुलींनी शिकून नोकरी करावी स्त्री पुरुष भेदभाव न करणे या गोष्टींना महत्व प्राप्त झाले. आजची स्त्री चूल व व मूल न सांभाळता नोकरी करू लागली. प्राचीन काळात असणारी स्त्रिया बद्दलच्या परंपरा व रूढी आज बदलेल्या दिसत आहेत. त्यामुळे स्त्रियांच्या पारंपरिक भूमिकेत बदल होत आहेत. पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून किंबहुना त्या पुढील क्षेत्रांत स्त्रिया आपले कार्य करीत आहेत. ज्या प्रमाणे आपली मुलगी उच्च शिकून नोकरी करावी अशी इच्छा पालकांची आहे. त्याचप्रमाणे आपल्याला पत्नी म्हणून मिळणारी मुलगी नोकरी करणारी किंवा कमावती असावी ज्यामुळे कौटुंबिक आर्थिक सुबत्ता वाढेल अशी भावना नवऱ्या मुलांची वाढलेली आहे.

आज भारतातील महिला राजकारण, अर्थ शैक्षणिक व सामाजिक कार्यात पुरुषांच्या बरोबरीने आहेत. स्त्रीविषयक अभ्यासक्रम आज अनेक विद्यापीठातून शिकविले जाऊ लागले आहेत. कौटुंबिक हिंसाचार कायदा लैगिंक

छळ प्रतिबंधक कायदा, जन्म पूर्व लिंग चाचणी प्रतिबंधक कायदा या सारख्या कायद्यामुळे स्त्रियांचे समाजातील स्थान उंचावले आहे. स्त्रीचे अंगी कर्तृत्व असेल तर कायद्याचे आधारे संघर्ष करून स्त्री आपले ध्येय साध्य करून घेत असलेले दिसत आहे. राजकारणात स्त्रियांना ३३ टक्के राखीव जागा असल्यामुळे अनेक पदे भूषवित आहेत. राजकारणाप्रमाणेच संस्कृती, साहित्य, न्याय, सिनेमा व समाजकारण या क्षेत्रामध्ये कार्य करीत आहेत.

ग्रामीण भागामध्ये मात्र अशिक्षित व दारित्र्य रेषेखालील कुटूंबातील स्त्रियांची परिस्थिती वाईट आहे. आर्थिक परिस्थितीमुळे मुली शिक्षण घेऊ शकत नाही त्यामुळे एकीकडे स्त्रीला देवी, पतिव्रता तर दुसरीकडे वेश्या, कुलटा याचप्रकारचे भोग भोगावे लागतात. त्यामुळे स्त्रिया आजही वटपौर्णिमेला वडाचे पूजन करून सात जन्म हाच पती मिळावा असे मागणे मागतात. विधवेचे मुख सकाळी पाहणे अशुभ मानतात. मंगळसूत्र, कुंकू यासारख्या गोष्टींना मंगलसूचक मानतात या सारख्या पारंपरिक गोष्टी करतांना व त्या प्रमाणे वागतांना स्त्रिया दिसून येतात. पारंपरिक पितृसत्ताक पद्धितीनुसार स्त्री हि भावनिक आर्थिक शारीरिक व मानसिक दृष्ट्या पुरुषावर अवलंबून आहे. आपण दुर्लक्षित किंवा उपेक्षित राहू नये यासाठी ती प्रत्यत्न करीत असते. त्यामुळे आपल्या वागणुकीने पुरुषांना खुश करणे हीच तिची आवड राहिली आहे. भारतीय राज्यघटनेतील स्वातंत्र्य, समता बंधुता, न्याय यावरच स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा पाया अवलंबून आहे हे कित्येक स्त्रियांना आजही माहिती नाही यासाठी पुरुषानी पुढाकार घेऊन स्त्री पुरुष समानता ह्यावर भर दिला तर स्त्री हि नैसर्गिक रित्या मनासारखे वागेल.

**स्त्रीचा दर्जा वाढविण्यासाठी उपाय :-**

१. स्त्रियांच्या विकासाकरिता आज अनेक प्रकारचे कायदे केले जात आहेत परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

२. स्त्रीकडे पाहण्याची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

३. विविध माध्यमाव्दारे, चर्चासत्राद्वारे स्त्रियांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे. कारण स्त्रिया कायद्याबद्दल अनभिज्ञ असतात.

४. महिला आरोग्यावर होणारे परिणाम केवळ स्वतः पुरते राहत नाहीत तर त्याचा परिणाम कुटूंब, मुले व समाजावर होतो. त्यामुळे महिला आरोग्य हा गंभीर आणि जटिल विषय आहे. महिलांचे केवळ शारीरिक नव्हे तर मानसिक व भावनिक व सामाजिक आरोग्य जपणे काळाची गरज आहे.

५. आजही ग्रामीण भागात महिलांसाठी १००% प्रसाधनगृहे नाहीत हा प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

६. समाजातील हुंडा पद्धतीची पाळेमुळे नष्ट करणे आवश्यक आहे.

वरील उपायांची अंबलबजावणी केल्यास निश्चितच महिला सक्षमीकरांला गती मिळेल. आजही पूर्णपणे महिला सक्षमीकरण झाले असे म्हणता येणार नाही तर महिला सक्षमीकरणात अनेक समस्या, अनेक आव्हाने आहेत. त्यावर मत करणे गरजेचे आहे. आज तिला संरक्षणाची गरज आहे. आज दामिनी पथकासारखे आणखी काही पथक, सार्वजनिक ठिकाणी cctv कॅमेरे लावणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील महिलांना आजही पुरेशी संधी अर्थार्जनाबात दिली जात नाही. त्याकरिता गावातील पुरुषांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. महिला सक्षमीकरणात आजही समस्या आहेत. पण त्यावर विविध शासकीय योजना व हरयाद्या परिवर्तन मानसिकता या द्वारे बदल करणे शक्य आहे त्या करीत गरज आहे. सामूहिक प्रयत्नांची असलेल्या कायद्याच्या कठोर व काटेकोर अंबालबजावणीची

**संदर्भ सूची :**

१. डॉ. प्रदीप आगलावे :- " भारतीय समाज प्रश्न आणि समस्या" श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर जुलै २००९

२. डॉ. अश्विनी घोगडें :- "स्त्री वादी समीक्षा, स्वरूप, आणि उपाययोजना" दिलीप राज प्रकाशन पुंणे १९९३

ISSN : 2278-9308
February 2024

३. साळुंखे आ. ह :- "हिंदू संस्कृती आणि लोकवाङ्मय गृह मुंबई

४. डॉ. एस. एन. कुलकर्णी, डॉ. सतीश श्रीवास्तव योजना मासिके

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B
ISSN : 2278-9308
February 2024

# महिला सबलीकरण : संधी आणि आव्हाने

**श्री. जगदिश विनायक आगळे**
संशोधक विद्यार्थी
माध्यमिक विद्यालय, भोंगरा ता.शहादा
जि.नंदुरबार

**मा. प्रा.डॉ. प्रशांत रामदास बोबडे**
मार्गदर्शक
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
तळोदा जि. नंदुरबार

**प्रस्तावना**

प्राचीन भारतीय समाज व्यवस्थेत सर्वांना समान संधी होत्या. त्यात आपल्याला असे आढळते की, सुरुवातीला मातृसत्ताक व्यवस्था रूढ होती असे दिसते. परंतु कालांतराने भारतीय समाज व्यवस्थेत पितृसत्ताक व्यवस्था रूढ झाली आणि स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले ते बऱ्याच प्रमाणात आजही आपल्याला बघायला मिळते.

विकसित भारताचे स्वप्न पहायचे असेल तर लोकसंख्येच्या निम्मे असलेल्या संख्या ज्या महिला आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. भारताने कल्याणकारी शासन व्यवस्थेच्या स्वीकार केल्याने तर आणखीच प्रत्येक घटकाकडे बारकाईने लक्ष देणे गरजेचे झाले आहे. भारताचा 1901 च्या जनगणनेनुसार विचार केला तर एकूण लोकसंखेच्या 5.35% लोकसंख्या साक्षर होती. त्यात 0.6% स्त्रिया साक्षर होत्या. त्यानंतर भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1951 मध्ये जनगणना झाली, त्यावेळेस 16.67% साक्षर लोकसंख्येच्या प्रमाणात 9.45% स्त्रिया साक्षर होत्या. यावरून असे दिसते की, स्त्रियांना पूर्वी फक्त ' चूल आणि मूल ' या पलीकडे जाऊन त्यांच्या ज्ञानाचा, कौशल्याचा फायदा घ्यावा असे झाले नाही. ब्रिटिश सरकार सत्तेत असताना अनेक समाजसुधारकांच्या प्रयत्नाने स्त्रियांबद्दल असलेल्या खुळचट रूढी व परंपरा चालत आलेल्या होत्या, त्या कायदेशीर बंद करण्याचा प्रयत्न झाला. आणि समाज प्रबोधन होणे ही तेवढेच गरजेचे होते. त्यात स्त्रिया ह्या शिकल्या नाहीत तर समाज परिवर्तनाचे स्वप्न आपण कसे पाहू शकतो ? म्हणून महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाला प्राधान्य देऊन परिवार , समाज यांच्या रोष ओढवून स्त्री शिक्षणाची सुरुवात केली. त्यांच्या बरोबर सावित्रीबाई फुले, फातिमा शेख यांच्या सहकार्याने भारतामध्ये मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. आणि समाजात स्त्री शिक्षणाबद्दल अमुलाग्र बदल घडून येण्यास सुरुवात झाली. त्याबरोबरच महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाची स्थापना करून मुलींना महाविद्यालयीन शिक्षणाचे दरवाजे उघडे केले. स्त्री शिक्षणाचा पाया रचला गेल्यानंतर स्वतंत्र भारतात निश्चितच त्याचे फलित चांगल्या प्रकारे आपणास दिसणार होते. या सर्वांचा परिपाक म्हणून 2011 च्या जनगणनेत 74.04% या एकूण साक्षर लोकसंख्येच्या तुलनेत 65.46% महिला साक्षर होत्या. तसेच वेगवेगळया क्षेत्रात महिलांनी घेतलेली भरारी हे सुद्धा अधोरेखित होणे गरजेचे आहे.

**महिला सबलीकरण**

महिला सबलीकरण म्हणजेच त्यांच्यामधील दुर्बलता नष्ट करणे, कमी करणे असा शब्दशः अर्थ काढता येईल. महिला सबलीकरण संदर्भात सविस्तर पुढील प्रमाणे सांगता येईल.

**अनिल देशमुख** यांनी महिला सबलीकरण म्हणजे त्यांना स्वावलंबी बनविणे असा ढोबळ मानाने अर्थ काढता येईल. महिला सबळीकरण या शब्दाची फोड केल्यास महिलांना सबल करणारी म्हणजेच दुर्बलता नष्ट करणारे तिच्या शरीर, मन, बुद्धीत स्वतःची जाणीव व स्वतःबद्दल जागृत निर्माण करून त्या दृष्टीने स्वयं विकासासाठी प्रयत्न करणे होय.

**विलास आढाव** यांनी भारतीय संदर्भात असे म्हटले आहे की, आर्थिक, सामाजिक दृष्ट्या केल्या जाणाऱ्या सुधारणांमधून स्त्री-पुरुषांमध्ये परिवर्तन होणे ही सबलीकरणाची अट आहे. स्त्री नावाचा भारतीय समाजातील जो घटक आहे, त्याला आपल्याला जीवनात सर्व क्षेत्रात आपल्या सुप्त क्षमता प्रत्यक्ष वापरता येतील असा समाज निर्माण करणे, म्हणजे सबलीकरण अशी व्याख्या करता येईल.

**ॲड यशोमती ठाकूर** मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या मते, महिलांचे सक्षमीकरण म्हणजे केवळ आर्थिक सक्षमीकरण नसून त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक सक्षमीकरण झाले पाहिजे. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. यशस्वी होत आहेत हा सक्षमीकरणाचा मोठा टप्पा आहे.

**रत्नाकर लक्षटे** यांच्यानुसार भारतातील महिला सबलीकरणाची प्रक्रिया पश्चिमेकडील व पूर्वेकडील इतर राष्ट्रांच्या महिला सबलीकरण प्रक्रियेपासून पूर्णतः वेगळी आहे. पश्चिमेकडील देशांचे महिला सबलीकरणाचे प्रश्न व संघर्ष मताधिकारापर्यंतच मर्यादित आहे. तर भारतातील महिला सबलीकरणाचा संघर्ष पितृसत्ताक व सामाजिक वाईट रूढी परंपरेच्या मुक्तीचा संघर्ष आहे.

**माधुरी झाडे** यांच्यानुसार अंधश्रद्धांमुळे मोठ्या प्रमाणात समाजामध्ये स्त्रियांना मिळालेले दुय्यमत्व विषमता पूर्ण वागणूक यामध्ये सुधारणा करायची असेल तर समाजामध्ये असलेल्या या सर्व अंधश्रद्धांना ओळखून त्या दूर करण्यासाठी स्त्री आणि पुरुष या दोघांनी एकत्र येऊन सातत्याने चिकाटीने प्रयत्न करावयास हवा.

अशाप्रकारे विविध अभ्यासकांचा विचार केला तर महिला सबलीकरण ही प्रक्रिया एकांगी नसून एक सामाजिक प्रक्रिया आहे. खास करून भारतीय समाज व्यवस्थेमध्ये पुरुषी मानसिकता असल्याने, हुकूमत गाजवणे हे येते. म्हणूनच महिला सबलीकरण करणे यात पुरुषांचा सुद्धा पुढाकार असणे ही तेवढेच अपेक्षित आहे. महिलांसाठी देशात वेगवेगळ्या योजना आखण्यात आल्या त्या पुढील प्रमाणे:

**बेटी बचाव बेटी पढाव योजना**

ही भारत सरकारची योजना आहे. या योजनेद्वारे मुलींचे जगणे , सुरक्षितता आणि शिक्षणाची खात्री केली जाईल. या योजनेच्या माध्यमातून लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठीही प्रयत्न केले जातील. व या योजनेंतर्गत भृणहत्या ही थांबवण्यात येणार आहे.

**महिला हेल्पलाइन योजना**

या योजनेअंतर्गत महिलांना 24 तास आपत्कालीन सहाय्यक सेवा पुरवली जाते. यात हिंसाचाराची किंवा गुन्हाची तक्रार करू शकतात. भारत देशात 181 क्रमांकावर डायल करून महिला आपल्या तक्रारी नोंदवू शकतात.

**महिलांविषयी भारतीय कायदे**

---हुंडा प्रतिबंधक कायदा 1961

---कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, 2005

------विशाखा गाईड लाईन्स

--देवदासी प्रतिबंधक कायदा

--लिंग निदान प्रतिबंधक कायदा

--बालविवाह प्रतिबंधक कायदा

--स्त्रियांचे संविधानिक अधिकार ( भारतीय राज्यघटनेनुसार असलेले अधिकार )

--मानवी हक्क संरक्षण कायदा 1993

--हिंदू विवाह कायदा 1955,

---हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा 1856

-----आनंद विवाह कायदा 1909

--आर्य विवाह विधिवत कायदा 1937

-------मुस्लिम विवाह कायदा

--मुस्लिम स्त्री ( घटस्फोट हक्क संरक्षण कायदा) 1986

-भारतीय ख्रिस्ती विवाह कायदा 872

-------पारसी विवाह व घटस्फोट कायदा 1936

--विशेष विवाह कायदा 1954

--विदेश विवाह कायदा 1969

--धर्मांतरित व्यक्ती विवाह विच्छेद कायदा 1866

--भारतीय घटस्फोट कायदा 1869

--हिंदू दत्तक व निर्वाह कायदा 1956

--हिंदू उत्तराधिकार कायदा 1956

--विवाहित स्त्रियांचा संपत्तीचा कायदा 1959

------मुस्लिम स्त्रियांचा मालमत्ता व वारसा हक्काचा कायदा

--ख्रिश्चन स्त्रियांचे मालमत्ता व वारसा हक्क

-----पारसी स्त्रियांचे मालमत्ता व वारसा हक्क

--फौजदारी कायदे

--भारतीय दंड विधान कायद्यातील स्त्रियांसंबंधीत महत्त्वाची कलमे

--स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंधक कायदा 1986

--अनैतिक देह व्यापार प्रतिबंधक कायदा 1956

--वैद्यकीय गर्भपात कायदा 1929

--सती प्रथा प्रतिबंध कायदा 1987

--मातृत्व लाभासंबंधीचा कायदा 1961

--कारखाने कायदा 1948 , खाण कायदा 1952, करार मजूर (नियोजन व निर्मूलन कायदा) 1970

--किमान वेतन कायदा 1948, वेतन प्रदान कायदा 1936, समान वेतन कायदा 1976 --राज्य कामगार विमा कायदा 1948

--शेती मळा लागवड कामगार कायदा 1951

--नागरी अधिकारांच्या संरक्षणासंबंधीचा कायदा 1955

--कुटुंब न्यायालय कायदा 1984

--हिंदू अज्ञानत्व व पालकत्व कायदा 1956

--राष्ट्रीय महिला आयोग कायदा 1990

--राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा 2006

-----विधी सेवा प्राधिकरण कायदा 1987

--अर्भकासाठीचे कृत्रिम दूध व अन्य अन्नपदार्थ ( निर्मिती, वाटप आणि पुरवठा नियमन ) कायदा 1992

--अनाथालये व धर्मदाय गृहांसाठीचा ( देखरेख व नियमन ) कायदा 1960

**महिलांसाठीच्या संधी**

भारतीय समाज व्यवस्थेतला कणा समजला जाणारा घटक म्हणजे स्त्री होय. आपण स्त्रीला आपल्या परिवाराचा आधारस्तंभ म्हटले तरी वावगे ठरणार नाही. पूर्वी 'चूल आणि मूल' पर्यंत मर्यादित ठेवल्याने देश मागासलेला राहिला. पुढे जाऊन 'मुलापेक्षा मुलगी बरी, प्रकाश देते दोन्ही घरी' या उक्तीपर्यंत आलो. आता तर आपण आपल्या परिवारासोबतच देशाचा सन्मान म्हणून मुलींकडे बघतो आहोत.सुधारणावादी चळवळीपासून तर आता पर्यंत सामाजिक तथा शासकीय, प्रशासकीय पातळीवर खूप मोठ्या प्रमाणात महिलांना प्रोत्साहन दिले जात आहे. महिलांसाठी वेगवेगळे कायदे केले, वेगवेगळ्या योजना आखल्या यामुळे महिलांना वेगवेगळ्या क्षेत्रात भरपूर अशा संधी उपलब्ध आहेत.

**महिला बचत गटांना प्रोत्साहन**, महिला बचत गट चळवळीमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला. स्वतः उद्योग, व्यवसाय करू लागल्या परिवाराची स्थिती बदलण्यास कारणीभूत ठरू लागल्या, परिणामी त्यांच्या मताला मान सन्मान मिळू लागला. हे सर्व महिला आर्थिक विकास महामंडळ उमेद इयर एन आर एल एम एम एस आर एल एम सारख्या योजना आखून स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी व आर्थिक उन्नती साठी ही प्रयत्न करण्यात आले.

**ज्योती ठाकरे**, अध्यक्ष, महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी माविम ची उद्दिष्टे सांगताना ग्रामीण भागातील महिलांचे संघटन करणे, महिलांच्या क्षमता विकसित करणे, महिलांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, उद्योजकीय विकास घडवून आणणे, रोजगाराच्या संधी व बाजारपेठ यांची सांगड घालणे, महिलांच्या शिक्षण संपत्ती व सत्तेत सहभाग वाढवणे, स्थायी विकासासाठी स्वयंसहाय्य बचत गटांना संस्थात्मक स्वरूप देऊन बळकट करणे, चिरंतर विकास प्रक्रियेतून महिलांसाठी सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय प्रस्थापित करणे, इ उद्दिष्टे सांगितली आहेत.

**महिला आर्थिक विकास महामंडळ मार्फत चालवलेले उपक्रम,** नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प, तेजश्री फायनान्शियल सर्व्हिसेस, अल्पसंख्यांक महिला सक्षमीकरण कार्यक्रम, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, एम एस आर एल एम, कापडी पिशव्या शिलाई उपक्रम.

**महिलांना प्रशासकीय सेवेत संधी**, महिलांना सर्व क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध आहेत परंतु प्रशासकीय सेवेत संधी सुद्धा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. त्यातच काही महिला प्रशासकीय अधिकारी यांचे अनुभव पुढीलप्रमाणे

**वल्सा नायर सिंह**, प्रधान सचिव, पर्यटन विभाग यांच्या मते ध्येय निश्चित असल्याने आणि त्याच दिशेने प्रयत्न केल्याने हमखास यश मिळाले आणि 1991 मध्ये मी उत्तर प्रदेश केडर मधून प्रशासकीय सेवेत आले. मला आनंद आहे की, माझ्या पहिल्या पोस्टिंग मध्ये एकही गुन्हा न घडता गाझियाबादच्या विधानसभा निवडणूक पार पडल्या जे राज्यात त्यापूर्वी कधीच घडले नव्हते.

**आय ए कुंदन**, प्रधान सचिव, महिला व बालविकास यांच्यामते, प्रशासनात काम करताना प्रशासन व जनता यामध्ये संवाद असणे आवश्यक आहे. त्यामुळे सामान्य माणसांसाठी काम करण्याची संधी मिळते आपण कुठल्याही विभागात काम करताना जनतेचे हित लक्षात घेऊन नियोजनबद्ध काम केले तर निश्चितच सकारात्मक बदल घडवता येतात. सर्वसामान्यांसाठी काम केल्याचे मला समाधान आहे.

**रुबल अग्रवाल,** आयुक्त, एकात्मिक बालविकास प्रकल्प यांनी सांगितले की, राजस्थानमध्ये मुलगी शिकली की तातडीने तिचे लग्न लावण्याची तयारी केली जाते. मी या प्रथेला कुठेतरी मी छेद देण्याचा प्रयत्न करत होते. माझ्या प्रस्तावावर काही दिवस चर्चा झाली. माझी आई, वहिनी या भक्कमपणे माझ्या पाठीशी उभ्या राहिल्या. दोन वर्षे परीक्षा द्यायची, पास झाले तर ठीक नाहीतर लग्न करायचे. या अटीवर मला परवानगी देण्यात आली. मी स्पर्धा परीक्षेसाठी अर्जही केला त्यासाठी दिल्लीमध्ये क्लासेस जॉईन केले. पहिल्या प्रयत्नाच्या अपयशानंतर दुसऱ्या प्रयत्नात मला यश मिळाले.

अशाप्रकारे उद्योग, व्यवसाय व प्रशासकीय क्षेत्रातल्या महिलांचे विचार जाणून घेतल्यानंतर आपल्याला

असे दिसते की, या क्षेत्रात भरपूर अश्या संधी महिलांना उपलब्ध आहेतच. सोबत त्या संधीचे सोने करण्याची ताकद ही महिलांमध्ये आहे, हे सिद्ध होते.त्याचबरोबर कलाक्षेत्र, साहित्य, आय टी आणि अशी वेगवेगळी क्षेत्रे व आता तर स्थानिक स्वराज्य संस्थेत 50 टक्के महिलांना आरक्षण असल्याने राजकीय क्षेत्रात ही भरपूर अशा संधी महिलांना निर्माण झालेल्या आहेत.

**महीलांपुढील आव्हाने**

आज आपण 21 व्या शतकात पदार्पण केले असले तरी महिलांबद्दल अजूनही आपल्याला खूप मोठा पल्ला गाठायचा बाकी आहे. आपण साक्षरता दराचा जरी विचार केला तरी अजूनही 35 टक्के महिला निरक्षर आहेत. त्यांना साक्षर करणे हे फार मोठे आव्हान आपल्यासमोर आहे.

भारतीय संस्कृतीत संस्काराच्या नावाखाली आजही महिलांची गडचेपी आपल्याला पाहायला मिळते. अनेक महिलांसाठी अनेक कायदे केले असले तरी भारतीय समाजव्यवस्था पुरुषसत्ताक असल्याने महिलांना पाहिजे तेवढी मोकळीक आजही दिली जात नाही. याबरोबरच महिलांचे सक्षमीकरण व्हावे यासाठी शिक्षण, आरोग्य व सुरक्षा यांसारखी खूप मोठमोठी आव्हाने आपल्यासमोर आहेत.

**समारोप**

महिला सबलीकरण तसेच त्यांच्यासाठी असलेल्या संधी व आव्हाने हे सगळे बघितल्यावर असे वाटते की, आपण महिलांना दर्जेदार शिक्षण दिले पाहिजे. त्यांना रोजगार उपलब्ध करून दिले पाहिजेत. त्यांच्या मधली कौशल्य विकसित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तसेच समाजामध्ये स्त्री पुरुष समानता आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. महिलांच्या सुरक्षेचे खूप मोठे आव्हान आहे, त्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत .महिलांचे आरोग्य सांभाळणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. हे आणि अशा प्रकारचे अनेक प्रश्न आपल्यासमोर आजही उभे असले तरी आपण महिलांना एक स्वतंत्र नागरिक म्हणून त्यांच्या दृष्टिकोन विकसित व्हावा यासाठी सुद्धा आपण काम केले पाहिजे.

**संदर्भ:**

1.महिला सबलीकरण: संकल्पना व स्वरूप - प्रा .डॉ.अनिल दत्तू देशमुख 2.महिला सबलीकरण- विलास आढाव निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे

3.लोकराज्य - मार्च व एप्रिल 2022

A. सक्षमीकरणास प्राधान्य - ॲड.यशोमती ठाकूर, महिला आणि बालविकास मंत्री

B. माविम:एक सक्षम व्यवस्था-ज्योती ठाकरे, अध्यक्षा,महिलाआर्थिक विकास महामंडळ

C. आवडीचं करिअर निवडावं - वल्सा नायर सिंह, प्रधान सचिव , पर्यटन विभाग

D. कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख - आय.ए. कुंदन प्रधान सचिव, महिला व बालविकास

E. ' ती ' ला सक्षम बनवू या - रुबल अग्रवाल, आयुक्त, एकात्मिक बालविकास प्रकल्प

4.विद्यावार्ता - जानेवारी ते मार्च 2017- भारतीय लोकशाही व महिला सबलीकरण- प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव

5.अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका- ऑगस्ट 2022- माधुरी झाडे अंधश्रद्धा आणि विषमता यांचे बदलते संदर्भ 6. Website - https://mr.m.wikipedia.org

# महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण

**प्रा. डॉ. हर्षवर्धन दामोदर जाधव**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, प्रताप महाविद्यालय अमळनेर जि. जळगावमो. नं.- 8668688355
**श्री सुनील रमेश सपकाळे**
संशोधक विद्यार्थी, प्रताप महाविद्यालय अमळनेर जि. जळगाव ,मो. नं.- 9545883387

**Abstract :-**

समाजात महिला सक्षमीकरण अजूनही पूर्णत्वास आलेले दिसून येत नाही महिला कुटुंबात आणि समाजात महत्त्वाची भूमिका बजावतात परंतु शिक्षण, व्यवसाय, राजकारणातील महत्त्वाची पदे, उत्पन्न, जोडीदाराची निवड, वारसा कायदा, मालमत्ता अधिकार, निर्णय घेण्याची प्रक्रिया याबाबतीत जीवनातील सर्वच आवश्यक क्षेत्रांमध्ये महिलांसोबत भेदभाव झालेला दिसून येतो. अशाप्रकारे या कठोर सामाजिक व आर्थिक परिस्थितीतून महिला सक्षमीकरणाची गरज निर्माण झालेली आहे महिला सबलीकरण ही जागरूकता आणि क्षमता निर्माण करण्याची प्रक्रिया आहे महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांचे आर्थिक सामाजिक आणि कायदेशीर सामर्थ्य वाढवणे होय कोणत्याही देशाची आर्थिक व सामाजिक प्रगती ही त्या देशातील महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीशी निगडित असते मानवी विकासाच्या क्षेत्रात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे म्हणूनच भारत सरकारने अलीकडच्या काळात महिला सक्षमीकरणाला लक्षणीय असे महत्व दिलेले आहे.

**प्रस्तावना :-**

21व्या शतकातही महिलांवरील भेदभाव जगभर सर्रासपणे सुरू आहे. बहुतेक देशांतील पितृसत्ताक समाज महिलांचे शोषण तसेच अत्याचार करण्यात पटाईत आहेत. जरी जगाच्या लोकसंख्येच्या सुमारे 50% महिला आहेत, परंतु दुर्दैवाने त्यापैकी बहुतेकांना शिक्षण, भाषण स्वातंत्र्य, मतदानाची शक्ती आणि अगदी स्वतंत्र ओळख यांसारखे मूलभूत अधिकार देखील नाकारले जातात. सर्वच प्रगत देशांमध्ये महिला सक्षमीकरणाच्या स्वीकृतीबाबत अजूनही प्रश्न आहेत, तर विकसनशील राष्ट्रे आणि राजकीय दबावाखाली असलेली राष्ट्रे महिला सक्षमीकरण बाबत इच्छित दर्जा प्राप्त करण्यापासून दूर आहेत. भारतात, सैद्धांतिकदृष्ट्या स्त्रियांना घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदींनुसार पुरुषांसोबत समानतेचा दर्जा आहे. आपल्या देशाने जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिलांचा समावेश आणि सक्षमीकरणाच्या दिशेने अनेक पावले उचलली असली तरी हुंडाबळी, स्त्री भ्रूणहत्या आणि घरगुती हिंसाचार यांसारख्या बातम्या आजही वर्तमानपत्रात येतात. आज खरा विकास आणि वाढ केवळ लैंगिक भेदभावाच्या खोलवर रुजलेल्या विचारसरणी आणि महिलांना खाजगी घरगुती क्षेत्रात बंदिस्त करणे, निर्बंध किंवा त्यांची हालचाल, आरोग्य सेवा, पोषण, शिक्षण यासारख्या भेदभाव दूर करण्यासाठी यशस्वी पावले उचलूनच साध्य होऊ शकते.

"महिला सबलीकरण" या शब्दाचा अर्थ असा आहे की महिलांमध्ये सामाजिक, राजकीय आणि आर्थिक दृष्टीने त्यांचे दैनंदिन जीवन नियंत्रित करण्याची शक्ती किंवा क्षमता आहे. सशक्तीकरण ही एक सक्रिय आणि बहुआयामी प्रक्रिया आहे, जी महिलांना जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये त्यांची ओळख आणि शक्ती ओळखण्यास सक्षम करते.

**संशोधन पद्धती :-**

सदर लेख हा दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे.दुय्यम साधनसामग्री म्हणजे विविध एजन्सीद्वारे वेगवेगळया उद्देशासाठी गोळा केलेली माहिती आणि ही माहिती विविध प्रकाशनांमधून आणि इतर अभ्यासपूर्ण कारणांसाठी गोळा

केलेली आहे ज्यात सरकारी आणि गैर-सरकारी, प्रकाशने आणि अहवाल, शैक्षणिक जर्नल्स, वर्तमानपत्र आणि विविध वेबसाइट्स इत्यादींचा समावेश आहे.

**उद्दिष्टे :-**

1)देशाच्या सर्वांगीण विकासात महिला सक्षमीकरणाच्या भूमिकेचे मूल्यमापन करणे.

2)महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणावर होणाऱ्या परिणामाचे मूल्यांकन करणे.

3)समाजातील महिलांच्या सद्यस्थितीचे मूल्यमापन करणे.

4)महिलांच्या सक्षमीकरणासाठी सरकारी आणि गैर सरकारी या संस्थांनी स्वीकारलेल्या धोरणांचे आणि प्रयत्नांचे विश्लेषण करणे.

5) महिला सक्षमीकरणातील आव्हाने आणि अडचणींचा आढावा घेणे.

**विषय विवेचन :-**

महिला जागतिक लोकसंख्येच्या जवळपास निम्म्याचे प्रतिनिधित्व करतात, परंतु जागतिक उत्पन्नाच्या 20 टक्क्यांहून कमी मिळवतात आणि त्यांच्याकडे एकूण जागतिक मालमत्तेच्या दोन टक्क्यांपेक्षा कमी आहे, 2011 च्या जनगणनेनुसार, भारताच्या लोकसंख्येच्या 48.5 टक्के महिला आहेत. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणामुळे सामाजिक-आर्थिक, संधी, मालमत्ता अधिकार, राजकीय प्रतिनिधित्व, सामाजिक समानता, वैयक्तिक हक्क, कौटुंबिक विकास, समुदाय विकास आणि शेवटी राष्ट्राचा विकास अशा अनेक पैलूंमध्ये महिलांचे सक्षमीकरण झाले. त्यामुळे अलीकडच्या काळात महिलांचे सक्षमीकरण हा एक महत्त्वाचा मुद्दा बनला आहे. महिला सक्षमीकरणाच्या प्रमुख धोरणांमध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरण यांचा समावेश होतो.

**I)महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठीच्या योजना :-**

महिला आणि बाल विकास मंत्रालयाने, महिलांचे कल्याण, विकास आणि सक्षमीकरणाशी संबंधित सर्व बाबींसाठी नोडल एजन्सी म्हणून,विविध योजना आणि कार्यक्रम विकसित केले आहेत. या योजना महिलांना निवारा, सुरक्षा, सुरक्षितता, कायदेशीर मदत, न्याय, माहिती, माता आरोग्य, अन्न, पोषण तसेच कौशल्य विकास, शिक्षण आणि आर्थिक उदरनिर्वाहाची गरज यासारख्या व्यापक स्वरूपात पसरलेल्या आहेत.

**1) प्रधानमंत्री मातृ वंदना योजना :-**

भारतातील दारिद्र्य रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील अनेक गर्भवती महिलांना गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत शारीरीक क्षमता नसतानाही मजूरीसाठी काम करावे लागते. यामुळे देशातील गभर्वती माता व बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन माता व बालमृत्यू दरात वाढ झाल्याने ते नियंत्रित करण्यासाठी दि.१ जानेवारी २०१७ पासून प्रधानमंत्री मातृ वंदना योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

**2)एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) :-**

IRDP हा एक लाभार्थी उन्मुख कार्यक्रम आहे ज्याचा उद्देश वार्षिक 11000 रुपये उत्पन्न पातळीच्या खाली असलेल्या कुटुंबांना मदत करणे आहे आणि यात 30% लाभ हा केवळ महिलांसाठी असेल अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**3)स्वयंसिद्धा**

ही फेब्रुवारी 2001 मध्ये सुरू करण्यात आलेल्या स्वयं- सहायता गटांच्या निर्मितीद्वारे महिला सक्षमीकरणासाठीची एकात्मिक योजना होती. या कार्यक्रमाचे दीर्घकालीन उद्दिष्ट महिलांचे सर्वांगीण सक्षमीकरण करणे होते.

**4)स्वधार**

ही योजना 2001-02 मध्ये प्रतिकूल परिस्थितीत महिलांना मदत आणि पुनर्वसन प्रदान करण्यासाठी सुरू करण्यात आली होती. या योजनेची मुख्य उद्दिष्टे म्हणजे दुर्गम परिस्थितीत असलेल्या उपेक्षित महिला व मुलींना निवारा, कपडे आणि काळजी या प्राथमिक गरजा पुरवणे आणि महिलांना भावनिक आधार आणि समुपदेशन प्रदान करणे हा होता.

**5)ग्रामीण युवक स्वयं-रोजगार प्रशिक्षण (TRYSEM)**

हा कार्यक्रम 18 ते 35 वर्षे वयोगटातील ग्रामीण युवकांना स्वयं रोजगाराच्या तरतूदीसाठी प्रशिक्षित करण्यासाठी होता आणि या योजनेंतर्गत वाटप केलेल्या निधीपैकी 40% महिलांसाठी आहे.

**6)ग्रामीण भागातील महिला आणि मुलांचा विकास (DWCRA)**

ही योजना IRDP ची उप योजना म्हणून 1983-84 मध्ये सुरू करण्यात आली. हा कार्यक्रम ग्रामीण भागातील महिला आणि बालकांच्या विकासासाठी आहे ज्यामध्ये गरीब गटातील १०-१५ महिलांच्या गटाला २५०००/- रुपयांचा फिरता निधी उपलब्ध करून दिला जातो आणि यात आर्थिक क्रियाकलाप,पोषण, आरोग्य, प्रौढ शिक्षण यासारख्या पूरक सेवांचा समावेश होतो.

**7) स्वावलंबन कार्यक्रम**

हा कार्यक्रम नॉर्वेजियन एजन्सी फॉर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NORAD) च्या सहाय्याने 1982-83 मध्ये सुरू करण्यात आला. महिलांना शाश्वत आधारावर रोजगार किंवा स्वयंरोजगार मिळावा यासाठी त्यांना प्रशिक्षण आणि कौशल्ये प्रदान करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या योजनेंतर्गत समाजातीलगरीब आणि गरजू महिला, दुर्बल घटकातील महिला जसे एससी/एसटी इ. ना प्राधान्य दिले जाते.

**8)स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (SGSY)**

SGSY IRDP आणि संबंधित कार्यक्रमांची पुनर्रचना केल्यानंतर एप्रिल 1999 मध्ये सुरू करण्यात आली. ग्रामीण भागातील गरिबांसाठी सध्या राबविण्यात येत असलेला हा एकमेव स्वयंरोजगार कार्यक्रम आहे. SGSY चे उद्दिष्ट सहाय्यक स्वरोजगार धारकांना बँकांच्या पत आणि सरकारी अनुदानाद्वारे उत्पन्न देणारी मालमत्ता प्रदान करून दारिद्र्यरेषेच्या वर आणणे आहे.

**9)प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमाला समर्थन (STEP)**

हा कार्यक्रम पारंपारिक क्षेत्रातील गरीब आणि संपत्ती नसलेल्या महिलांना कौशल्ये आणि नवीन ज्ञान प्रदान करण्याचा प्रयत्न करतो. या प्रकल्पांतर्गत, महिला लाभार्थींना एकत्रित गट किंवा सहकारी संस्थांमध्ये संघटित केले जाते. क्रेडिट,आरोग्य सेवा, प्राथमिक शिक्षण, मार्केट लिंकेज इत्यादी सेवांचे सर्वसमावेशक पॅकेज दिले जाते.

**10)महिला समृद्धी योजना (MSY)**

ही योजना केंद्र पुरस्कृत योजना होती आणि या योजनेद्वारे 18 वर्षे व त्यावरील प्रत्येक ग्रामीण महिला MSY खाते उघडू शकतात. सरकार बचतीच्या 25% प्रोत्साहनपर रकमेचे योगदान देते. या कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सर्व स्तरावरील स्वयंसेवी संस्थांचा सहभाग होय. NGOS खेड्यात जागरूकता निर्माण शिबिरे आयोजित करतात ज्याद्वारे ते महिलांना बचत करण्यासाठी एकत्रित करू शकतात.

**II)संस्थात्मक सेवा**

**1) राज्य गृहे**

सुधारात्मक संस्थांमधून बाहेर पडलेल्या आणि प्रतिकूल सामाजिक शक्तींपासून स्वतःचे रक्षण करू न शकलेल्या महिलांसाठी तसेच स्वेच्छेने आश्रय शोधणाऱ्या महिलांसाठी राज्य गृहांची स्थापना केली जाते. त्यांना मोफत निवास व राहण्याची सोय केली जाते.

**2)सेवा गृहे**

ही घरे 18-35 वयोगटातील निराधार महिला, असहाय विधवा आणि निर्जन पत्नींसाठी आहेत. पाच वर्षांखालील मुलांसोबत राहताना त्यांना मोफत अन्न, निवारा,कपडे आणि वैद्यकीय मदत दिली जाते.

**3)कामगार महिला वसतिगृहे**

ही वसतिगृहे शासनाने विहित शुल्क भरून त्यांच्या कुटुंबापासून दूर असलेल्या नोकरदार महिलांना अन्न, निवारा आणि सुरक्षिततेसह इतर सुविधा देण्यासाठी स्थापन केली आहेत.

**4)हस्तकला प्रशिक्षण केंद्रे**

या केंद्रांमध्ये अल्प उत्पन्न गटातील महिलांना लाभदायक रोजगारासाठी स्थानिक हस्तकलेचे प्रशिक्षण दिले जाते.

**5)व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रे**

व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रे महिलांना टाईप राइटिंग आणि शॉर्ट हँड यासारख्या अभ्यासक्रमांमध्ये रोजगाराभिमुख तांत्रिक प्रशिक्षण देतात.

**III)महिलांसाठी विशेष कायदे**

- मातृत्व लाभ कायदा, 1961
- हुंडा प्रतिबंध कायदा, 1961
- समान मोबदला अधिनियम, 1976
- महिलांचे असभ्य प्रतिनिधित्व (प्रतिबंध) कायदा,1986
- सती आयोग (प्रतिबंध) कायदा 1987
- गर्भधारणापूर्व आणि प्री-नॅटल डायग्नोस्टिक तंत्र कायदा, 1994
- घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, 2005
- बालविवाह प्रतिबंध अधिनियम 2006
- (POCSO) कायदा, 2012

**IV) सक्षमीकरणाची साधने**

सामाजिक सक्षमीकरण

आर्थिक सक्षमीकरण

1)आर्थिक सक्षमीकरण

हे महिलांचे सक्षमीकरण करण्याचे एक साधन आहे. दारिद्र्यरेषेखालील 65 दशलक्ष भारतीय कुटुंबांचे कल्याण करण्याकरिता महिलांची आर्थिक उत्पादकता वाढवणे हे एक महत्त्वाचे धोरण आहे. आर्थिक, राजकीय, सामाजिक स्थितीत महिलांचे अस्तित्व नसणे हे आर्थिक विकासातील एक मोठा अडथळा म्हणून ओळखले जाते. म्हणून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाकरिता महिलांमध्ये वित्तीय जागृती निर्माण होणे गरजेचे आहे.

**2)महिलांचे सामाजिक सक्षमीकरण**

महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणाअंतर्गत महिलांच्या आरोग्याची स्थिती सुधारण्यासाठी, मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी विशेषत: ज्यांना चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी पावले उचलण्याची गरज आहे. आजारांबाबत जनजागृती कार्यक्रम सुरू करणे आवश्यक आहे. महिलांना कुपोषणाचा उच्च धोका असतो त्यामुळे त्यांच्या जीवनचक्राच्या सर्व टप्प्यांवर महिलांच्या पोषणविषयक गरजा पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. वैवाहिक हिंसाचाराला बळी पडलेल्या, निर्जन असलेल्या आणि लैंगिक संरक्षणात गुंतलेल्या महिलांना मदत करण्यासाठी योजना आणण्याची गरज आहे, मुलींशी कोणताही भेदभाव होणार नाही आणि तिचे हक्क सुरक्षित आहेत याची खात्री करण्यासाठी सरकारने जागरुक राहणे आवश्यक आहे.

**3)महिला सक्षमीकरणामध्ये आंतरराष्ट्रीय संस्थांची भूमिका**

स्त्री पुरुष समानतेला प्रोत्साहन देणे आणि महिलांचे सक्षमीकरण हे संयुक्त राष्ट्रांच्या कार्याचे केंद्रस्थान आहे. U.N. महिलांच्या मानवी हक्कांना सक्रियपणे प्रोत्साहन देते आणि महिलांवरील हिंसाचाराचे निर्मूलन करण्यासाठी कार्य करते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध U.N. एजन्सी कार्यरत आहेत जसे की महिला आयोग, महिलांवरील भेदभाव निर्मूलन समिती, महिलांच्या प्रगतीसाठी, युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट फंड फॉर वुमन, आणि अलीकडेच U.N. महिला संघटना कार्यरत आहेत.

**4)महिला सक्षमीकरणात स्वयंसेवी संस्थांची भूमिका**

सरकारी संस्था या महिलांच्या सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या औपचारिक संस्था आहेत. परंतु या कामासाठी बहुआयामी दृष्टीकोन आवश्यक आहे आणि म्हणूनच तळागाळापासून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत मोठ्या संख्येने स्वयंसेवी संस्थानी या क्षेत्रात लक्ष वेधले आहे. त्यांची भूमिका खूप प्रभावी आहे
स्वयंसेवी संस्थांची कार्यशैली खुली, पारदर्शक आणि वैयक्तिक आहे. जनसामान्यांच्या प्रबोधनासाठी महिलांचे हक्क आणि भेदभाव निर्मूलन या विषयावर परिसंवाद परिषदा आणि कार्यशाळा आयोजित करतात.

**5)स्वयं-सहायता गटांची भूमिका SHG**

ही सामान्य हितसंबंध असलेल्या व्यक्तींची एक स्वयंसेवी संघटना आहे, जी कोणत्याही राजकीय संलग्नतेशिवाय लोकशाही पद्धतीने स्थापन आणि व्यवस्थापित केली जाते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी SHG ही प्रमुख धोरणे म्हणून उदयास आली आहेत आणि भारत सरकारच्या विविध योजनांनी हे दाखवून दिले आहे की सशक्त महिला गट सेवा आणि उपक्रमांच्या विकास आणि अभिसरणासाठी महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. देशभरातील विविध राज्यांतील विविध गटांना कौशल्य विकास आणि जागरुकता निर्माण करणे, आर्थिक विकासाला चालना देणे, गरीब महिलांमधील पत व्यवस्थापन क्रियाकलापांसह उत्पन्न वाढवणाऱ्या उपक्रमांद्वारे आर्थिक विकासाला चालना देणे आवश्यक आहे.

**V) महिला सक्षमीकरणावर परिणाम करणारे घटक**

- आर्थिक स्वातंत्र्य.
- स्वतःची ओळख प्रस्थापित करणे.
- उत्कृष्टता प्राप्त करणे.
- आत्मविश्वास निर्माण करणे.
- जोखीम घेण्याची क्षमता विकसित करणे.
- सामाजिक समानता
- अंतरवैयक्तिक विश्वस्तता
- सहाय्यक नेतृत्व

● नेतृत्व प्रेरणा

**VI) महिला सक्षमीकरणातील अडथळे**

सदरील अभ्यासातून हे स्पष्ट झाले आहे की महिला विशेषत: ग्रामीण महिलांना सक्षमीकरणात काही प्रमुख अडथळयांना सामोरे जावे लागत आहे जे खालीलप्रमाणे आहेत-

● कामाच्या ठिकाणी छळवणूक
● निर्णय घेण्याच्या स्वातंत्र्याचा अभाव.
● ज्ञान आणि कौशल्याचा अभाव.
● शिक्षणाचा अभाव.
● ज्ञान आणि कौशल्याचा अभाव.
● सामाजिक गतिशीलतेचा अभाव.
● दुहेरी जबाबदाऱ्यांचे ओझे
● योग्य प्रशिक्षणाचा अभाव.
● अपुरी कर्जे.
● गावातील जातिव्यवस्था.
● कौटुंबिक बंधने.
● महिलांच्या क्षमतांबाबत शंका.
● सरकारी अधिकाऱ्यांचा पक्षपातीपणा.

**निष्कर्ष व उपाययोजना**

1) महिला सक्षमीकरणाकरिता सरकार व गैर सरकारी संस्था यांनी विविध कार्यक्रम आणि प्रकल्प हाती घेतले असले तरी त्यांची ग्रामीण भागात प्रभावी अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही याकरिता ग्रामीण भागात महिला सक्षमीकरणा विषयी जनजागृती व प्रसार प्रचार होणे गरजेचे आहे.
2) महिलांमध्ये आत्मसन्मान व आत्मविश्वास वाढविणे गरजेचे आहे.
3) शिक्षण आरोग्य आणि रोजगार यासारख्या क्षेत्रात महिलांना अधिक सक्षम करणे.
4) आर्थिक स्वातंत्र्यासाठी माहिती ज्ञान आणि कौशल्य प्रदान करणे आवश्यक आहे.
5) महिलांचा विकास प्रक्रियेत समान सहभाग निश्चित करणे आवश्यक आहे. त्याकरिता सरकारने योग्य ती पावले उचलावी जेणेकरून देशाच्या सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.

**समारोप**

महिला सक्षमीकरण हा सध्या राष्ट्राच्या धोरणकर्त्यांच्या मनात एक ज्वलंत मुद्दा आहे. महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि कायदेशीरदृष्ट्या सक्षम करणे अत्यंत कठीण काम असणार आहे. स्त्रिया हीन, परावलंबी आणि निराधार आहेत ही खोलवर रुजलेली समज बदलणे सोपे होणार नाही. परंतु याचा अर्थ असा नाही की बदल अकल्पनीय आहे. समज नष्ट करणे ही काळाची गरज आहे. पण योग्य दिशेकडे झेपावल्यामुळे आणि खूप मेहनत घेऊन, हे कार्य कदाचित साध्य होऊ शकेल. आपल्याला फक्त सरकार आणि देशाच्या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून योग्य दिशेने लक्ष केंद्रित करणाऱ्या संघटित दृष्टीकोनाची आवश्यकता आहे जी केवळ महिलांना सर्व प्रकारच्या अडचणीतून मुक्त करेल. कारण भारताने खऱ्या अर्थाने महिलांना सक्षम केले तरच ते एक शक्तिशाली राष्ट्र बनू शकेल.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. डॉ. शुभांगी गोटे, महिला सबलीकरण स्वरूप व समस्या

2. प्राचार्य डॉक्टर संभाजी देसाई- महिला सबलीकरण

3. प्राध्यापक एम यु मुलानी- महिला स्वयंसहायता बचत गट

4. पाटील वा.भा. (2010) 'संशोधन पद्धती' प्रशांत पब्लिकेशन जळगाव

5. गजभरे एस. बी. (2007) 'राष्ट्र विकासासाठी स्त्री सबलीकरण' योजना

6. बालेश्वर प्रसाद (2018),' भारतातील महिला सबलीकरण: सामाजिक आणि आर्थिक उन्नती' International Journal of Creative Research Thoughts पृष्ठ क्र. 288 ते 301

7. https://womenchild.maharashtra.gov.in
8.https://wcd.nic.in
9.https://censusindia.gov.in
10.Women Sub-Paln 1997-98

# "इको-टूरिझम विकास आणि उष्ण झर्या◌ाच्या पाण्याची औषधी गुणवत्ता: उनपदेव (जळगाव) चा भौगोलिक अभ्यास"

डॉ. संजय भैसे * डॉ. देवेंद्र मस्की** मोहनदास महाजन***

प्रोफेसर (Geography) व विभाग प्रमुख सौ. र. ना. देशमुख कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय भडगाव

** सहयोगी प्राध्यापक (Geog. Department) सौ. र. ना. देशमुख कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय भडगाव

*** संशोधक विद्यार्थी (भूगोल) व सहायक प्राध्यापक (भूगोल विभाग)सौ. र. ना. देशमुख कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय भडगाव

**गोषवारा:**

हा शोधनिबंध महाराष्ट्र राज्यातील जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यात असलेल्या उंनपदेव गरम पाण्याच्या झऱ्याच्या भौगोलिक आणि पर्यटन पैलूंवर भर देत आहे. अभ्यास क्षेत्र हा ज्वालामुखीच्या निर्मितीमुळे निर्माण झालेल्या जिल्ह्यांच्या पठारी प्रदेशातील सातपुडा पर्वतांचा एक भाग आहे. त्याचे स्थान तापी नदीच्या खोऱ्यात आहे. हा झरा त्याच्या धार्मिक आणि औषधी उपयुक्ततेसाठी प्रसिद्ध आहे.

**मुख्य शब्द:**तापमान, औषधी, भूविज्ञान वसंत ऋतु, मापदंड.

**प्रस्तावना:-**

कोमट पाण्याचा झरा, ज्याचे तापमान सामान्यतः मानवी शरीरापेक्षा जास्त असते, त्याला गरम पाण्याचा झरा म्हणतात. गरम पाण्याचे झरे हे नैसर्गिक झरे पाणी म्हणून परिभाषित केले जाऊ शकते ज्यामध्ये पाण्याचे तापमान परिसरापेक्षा थोडे जास्त असते. पृथ्वीच्या अंतर्भागात असलेल्या उष्णतेमुळे गरम पाण्याच्या झऱ्याचे पाणी गरम झाल्याचे म्हटले जाते. या घटनेला भूतापीय घटना म्हणून ओळखले जाते. मुळात पृथ्वीच्या अंतर्भागातील खडकांचे तापमान वाढत्या खोलीबरोबर वाढते. अशा खडकांच्या संपर्कात येणारे पाणी गरम होते आणि त्यामुळे गरम पाण्याच्या झरे निर्माण होतात. अशा उष्ण झऱ्यांच्या पाण्यात औषधी गुणधर्म असल्याचे सांगितले जाते. सामान्य पाण्यापेक्षा अतिरिक्त खनिज सामग्रीसह हे गरम पाण्याचे झरे उपचारात्मक वापरासाठी वापरले जातात. शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार, वज्रेश्वरी गरम पाण्याच्या झऱ्यांमधील पाणी या भागात पूर्वीच्या ज्वालामुखीच्या उद्रेकाशी एकरूप झाल्यामुळे गरम आहे.

ऊनपदेव तेथील गरम पाण्याचे झरे गंधकाने समृद्ध असल्याचे म्हटले जाते; जे ते औषधी वापरासाठी आदर्श समजले जातात. त्यामुळे जळगाव जिल्हायातील, व महाराष्टतील अनेक भागातून लोक या पाण्याच्या झऱ्यात आंघोळ करण्यासाठी या ठिकाणी येतात. असे मानले जाते की हे गरम पाण्याचे झरे त्वचेचे सर्व आजार बरे करतात. या गरम पाण्याच्या झऱ्यांचे तापमान सुमारे ४३°C ते ४९°C असते. एका गाय मुखातून हे उष्ण पाणी एका कुंडात पडते. आमच्या अहवालानुसार, "पाणी" हा जीवनाचा अत्यावश्यक भाग आहे आणि म्हणून मी हा हॉट स्प्रिंग विषय अभ्यासासाठी घेतला.

उनपदेव हे सातपुडा डोंगररांगेच्या पायथ्याशी वसलेले आहे आणि हे जिल्ह्यातील एक दुर्गम पवित्र ठिकाण आहे. गरम पाण्याचे झरे हे या मंदिराचे प्रमुख आकर्षण आहे. सातपुडा टेकड्यांवरील इतर गरम पाण्याचे कारंजे म्हणजे सनपदेव आणि निझरदेव. या तिन्ही ठिकाणांचा उल्लेख रामायणाच्या महाकाव्यात आढळतो. गाईच्या मुखातून गरम पाणी वर्षभर वाहत असल्याचे दिसून येते, ज्यामुळे पर्यटकांच्या आकर्षणात आणखी एक भर पडते. गरम पाण्यात त्वचेचे आजार बरे करण्याची ताकद असते असे म्हणतात. हे पवित्र स्थळ रस्त्यांनी जोडलेले आहे. जाण्यासाठी जवळचे रेल्वे स्टेशन जळगाव रेल्वे स्टेशन आहे

मुळात भूविज्ञान हे विज्ञानाचे कार्य आणि "गरम पाण्याच्या औषधी" ची मुख्य यंत्रणा आहे. भूगर्भ शास्त्रीय प्रक्रिया सामान्यत: गुंतागुंतीच्या असतात आणि हवामान, भूविज्ञान, माती आणि वनस्पती यांसारख्या परिवर्तनीयांमध्ये परस्परसंबंध दर्शवतात. भूगर्भातील पाण्याची घटना आणि हालचाल भौतिकशास्त्र, निचरा, भूगर्भशास्त्र रचना आणि जलविज्ञान यांसारख्या अनेक घटकांवर अवलंबून असते.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

१) गरम पाण्याच्या झऱ्याच्या भूवैज्ञानिक रचनेचा अभ्यास करणे.

२) गरम पाण्याच्या पाण्याच्या औषधी वापराचा अभ्यास करणे.

३) गरम पाण्याच्या झऱ्याच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

४) अभ्यास क्षेत्राच्या इको-टूरिझमचे महत्त्व अभ्यासणे

५) अभ्यास क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे

**गृहीतक:**

गरम पाण्याचे झरे आणि पूर्णपणे औषधी गुणवत्तेमुळे ऊनपदेव हे पर्यटन केंद्रव एक धार्मिक स्थळ म्हणून विकसित झाले आहे.

**अभ्यास क्षेत्राचे भौगोलिक स्थान:**

सध्याच्या अभ्यासासाठी निवडलेले क्षेत्र ऊनपदेवच्या आजूबाजूचा परिसर म्हणजे डोंगराळ भागासारख्या वेगळ्या भूरूपी एककाचे प्रतिनिधित्व करते आणि तापी नदीच्या खोऱ्यात प्रशासकीयदृष्ट्या हे क्षेत्र जळगाव जिल्ह्यातील चोपडा तहसीलमध्ये आहे. ऊनपदेव हे अडावद गावाच्या उत्तर दिशेला ६ किमी अंतरावर आहे. हे २१°, २६', ५६" उत्तर अक्षांश आणि ७५°, ४३', १७"पूर्व रेखांशावर स्थित आहे.

उनपदेव हे सातपुडा डोंगररांगेच्या पायथ्याशी वसलेले आहे आणि हे जिल्ह्यातील एक दुर्गम पवित्र ठिकाण आहे. गरम पाण्याचे कारंजे हे या मंदिराचे प्रमुख आकर्षण आहे. सातपुडा टेकड्यांवरील इतर गरम पाण्याचे कारंजे म्हणजे सनपदेव आणि निझरदेव. या तिन्ही ठिकाणांचा उल्लेख रामायणाच्या महाकाव्यात आढळतो आणि अयोध्येतून चौदा वर्षांच्या हद्दपारीच्या काळात रामाचा स्पर्श होता. गाईच्या मुखातून गरम पाणी वर्षभर वाहत असल्याचे दिसून येते, ज्यामुळे पर्यटकांच्या आकर्षणात आणखी एक भर पडते. गरम पाण्यात त्वचेचे आजार बरे करण्याची ताकद असते असे म्हणतात. हे पवित्र स्थळ रस्त्यांनी जोडलेले आहे. जाण्यासाठी जवळचे रेल्वे स्टेशन जळगाव रेल्वे स्टेशन आहे.

जळगाव जिल्हयातील ऊनपदेव चे स्थान




**भूपृष्ठ रचना :**

अभ्यास क्षेत्र हा जळगाव जिल्ह्याच्या उत्तर पश्चिमेकडील सातपुडा डोंगररांगांचा एक भाग आहे. हे क्षेत्र डोंगराळ प्रदेशाने वैशिष्ट्यीकृत आहे आणि भुरचनेच्या दृष्टीने विशेष निसर्ग दर्शवते. हे मध्यम ते उच्च भुरचना दर्शविते. अभ्यास क्षेत्राचा उत्तर-दक्षिण आहे..

**भूविज्ञान:**

गरम पाण्याचा झरा हा एक झरा आहे जो पृथ्वीच्या कवचातून भू-औष्णिकरित्या गरम झालेल्या भूजलाच्या उदयाने तयार होतो. दख्खन पठाराचा हा भाग आहे संपूर्ण जळगाव जिल्हा या पठारावर आहे आणि दख्खन पठाराचा

संपूर्ण भाग ज्वालामुखीच्या निर्मितीचा आहे. ज्वालामुखीच्या भागामध्ये संक्षिप्त, स्तरीकृत बेसाल्ट आणि माती असते. त्यांच्या पाण्यात सल्फरचे प्रमाण जास्त असते ज्यामध्ये उपचारात्मक गुणधर्म असतात. ज्यांच्या पाण्याचा शरीरावर आणि आत्म्यावर सुखदायक प्रभाव पडतो अशा झऱ्यांमध्ये आपण शनिवार व रविवार आरामात घालवू शकतो. निसर्ग सौंदर्याने नटलेले हे ठिकाण आहे.

**संशोधन पद्धत:**

सर्वात प्रथम सर्वेक्षणाद्वारे माहिती आणि डेटा गोळा केला. उनपदेव हॉट स्प्रिंग्स प्रोफाइलमधून झऱ्याच्या पाण्याचे नमुने गोळा केले आहेत, ज्याचे निर्देश भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षणाने दिले आहेत. "जलविज्ञान प्रकल्प जल गुणवत्ता प्रयोगशाळा जळगाव " येथे झऱ्याच्या पाण्याच्या नमुन्याची चाचणी घेण्यात आली. झऱ्यांच्या पाण्याच्या गुणवत्तेच्या चाचणीसाठी प्रयोगशाळेच्या चाचणीमध्ये एकूण पॅरामीटर्सचे विश्लेषण केले आहे.

हे गरम पाणी औषधी का आहे? कारण.....

**तक्ता: स्प्रिंग वॉटरचे रासायनिक विश्लेषण**

| अ न | पॅरामीटर्स | ऊनपदेव | इष्ट मर्यादा | परवानगी योग्य मर्यादा | युनिट्स |
|---|---|---|---|---|---|
| 1 | रंग | स्वच्छ | रंगहीन | - | - |
| 2 | दुर्गंधी | गंधविरहित | आक्षेपार्ह | - | - |
| 3 | तापमान | ४७.३ | - | - | ० से. ग्रे. |
| 4 | सामू | ७.५९ | ६.५ | ८.५ | - |
| 5 | विद्युत वाहकता | ३४०० | - | - | |
| 6 | निलंबित घन पदार्थ | १०० | - | - | मी.ग्रा./लि. |
| 7 | विरघळलेले घन पदार्थ | २९६० | ५०० | २००० | मी.ग्रा./लि. |
| 8 | एकूण घन पदार्थ | ३०६० | - | - | मी.ग्रा./लि. |
| 9 | गढूळपणा | ३.१ | ५ | १० | N.T.U. |
| 10 | क्षारता | २० | २०० | ६०० | मी.ग्रा./लि. |
| 11 | कार्बोनेट CaCO3 | ० | - | - | मी.ग्रा./लि. |
| 12 | बायकार्बोनेट्स CaCO3 | २४.४ | - | - | मी.ग्रा./लि. |
| 13 | क्लोराईड (Cl म्हणून) | ११३१.४ | २५० | १००० | मी.ग्रा./लि. |
| 14 | सल्फेट्स (SO4 म्हणून) | ४६.७ | २०० | ४०० | मी.ग्रा./लि. |
| 15 | फ्लोराइड (F म्हणून) | ०.९८ | १ | १.५ | मी.ग्रा./लि. |
| 16 | कॅल्शियम (Ca म्हणून) | ३६०.७२ | ७५ | २०० | मी.ग्रा./लि. |
| 17 | एकूण जडपणा (Ca CO3 म्हणून) | ८१० | ३०० | ६०० | मी.ग्रा./लि. |
| 18 | सोडियम (Na म्हणून) | ६५०.२ | - | - | मी.ग्रा./लि. |
| 19 | पोटॅशियम (K म्हणून) | ५३.१ | - | - | मी.ग्रा./लि. |
| 20 | नायट्रेट (NO2-N म्हणून) | ०.०४१ | - | - | मी.ग्रा./लि. |
| 21 | नायट्रेट (NO3-K म्हणून) | ६.१३९ | ४५ | १०० | मी.ग्रा./लि. |
| 22 | अमोनिया (NH3-N म्हणून) | ०.१३३ | ०.००१ | ०.००२ | मी.ग्रा./लि. |
| 23 | नायट्रोजन (N म्हणून) | ३.८१२ | - | - | मी.ग्रा./लि. |
| 24 | ऑर्थोफॉस्फरस (O-PO4 प्रमाणे P) | ०.०५६ | - | - | मी.ग्रा./लि. |
| 25 | एकूण फॉस्फरस (P-TOT म्हणून) | ०.६ | - | - | मी.ग्रा./लि. |
| 26 | क्लोरोफिल - A | ० | - | - | मी.ग्रा./लि. |
| 27 | जैवरासायनिक ऑक्सिजनची Demand (3 days at 27 C) | ६.८ | - | - | मी.ग्रा./लि. |
| 28 | रासायनिक ऑक्सिजनची Demand | ४०.४ | - | - | मी.ग्रा./लि. |
| 29 | विरघळलेला ऑक्सिजन | ०.७ | - | - | मी.ग्रा./लि. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 30 | बोरॉन (B म्हणून) | ०.६ | १ | ५ | मी.ग्रा./लि. |
| 31 | ॲल्युमिनियम (as Al) | N.D. | ०.०३ | ०.२ | मी.ग्रा./लि. |
| 32 | लोह (Fe म्हणून) | ०.०१ | ०.३ | १ | मी.ग्रा./लि. |
| 33 | मँगनीज (Mn म्हणून) | ०.२३ | ०.१ | ०.३ | मी.ग्रा./लि. |
| 34 | सिलिका (Sio2 म्हणून) | २.५ | - | - | मी.ग्रा./लि. |
| 35 | एकूण कोली फॉर्म (M.P.N.) | ३०० | १० | ० | MPN/100 ml |
| 36 | एकूण कोली फॉर्म (M.P.N.) | २७ | ० | ० | MPN/100 ml |
| 37 | एकूण कोली फॉर्म (M.P.N.) (Mem ) | २९० | १० | ० | TCC/100 ml |
| 38 | एकूण कोली फॉर्म (Mem ) | २५ | ० | ० | FCC/100 ml |

**स्रोत:- जलविज्ञान प्रकल्प पाणी गुणवत्ता प्रयोगशाळा जळगाव**

**निष्कर्ष:**

1. अभ्यास क्षेत्रातील गरम पाण्याचे झरे सल्फर सामग्रीने समृद्ध असल्याचे म्हटले जाते; जे ते औषधी वापरासाठी आदर्श बनवते.
2. या गरम पाण्याच्या झऱ्यांचे तापमान 43°C ते 49°C पर्यंत असते.
3. या वसंत ऋतूमध्ये पर्यटकांना स्नान केले जाते.
4. अभ्यागतांना आध्यात्मिक हेतूने या पवित्र स्थानाला भेट दिली जाते.
5. वाहतूक सुलभतेची उपलब्धता.
6. पर्यटकांमुळे वसंत ऋतूतील पाण्याचे प्रदूषण वाढणार आहे.

**सूचना:**

1. पर्यटन केंद्राची देखभाल करण्यासाठी नियोजन करणे.
2. झऱ्याच्या पाण्याचे प्रदूषण थांबवण्यासाठी,
3. गरम पाण्याच्या झऱ्यांची माहिती देण्यासाठी वैज्ञानिक समुपदेशन केंद्र स्थापन करणे.
4. भूऔष्णिक विद्युत केंद्राची स्थापना करणे.
5. अभ्यास क्षेत्रापर्यंत पोहोचण्यासाठी वाहतूक नेटवर्क विकसित करणे.
6. निवासाची समस्या सोडवणे.

**संदर्भ:**

1. सॅनली मिलर, "केस स्टडी: मॅपिंग स्प्रिंग्स" युनायटेड स्टेट्समधील न्यूयोर्क 2001 या नवीन प्रेसद्वारे प्रकाशित.

4. हुसिन एन. अकमार, आय. अस्मा, बी. वेणुगोपाल, एल. योग लता आणि एस. ससिधारा (2011) गरम पाण्याच्या झऱ्यापासून नवीन थर्मोफिलिक बॅक्टेरिया वेगळे करण्यासाठी योग्य नमुना आणि संस्कृती पद्धतीची ओळख -आफ्रिकन जर्नल ऑफ मायक्रोबायोलॉजी रिसर्च खंड. 5(3) pp. 217-221

5. सुदीप कुमार सेन, सुधीर कुमार महापात्रा, सौम्या सत्पथी आणि गोपाला राव T.V (2010) गरम पाण्याच्या झऱ्याच्या स्त्रोताचे वेगळे क्लोन जीवाणू आणि त्यांची औद्योगिक उपयोगिता- इंटरनॅशनल जर्नल ऑफ केमिकल रिसर्च, ISSN: 0975-3699, खंड 2. 1, 2010, pp-01-07

8. www.indianhotsprings.com
9. www.thefreedictionary.com

# भारतातील महिला उद्योजिकांचे आर्थिक व सामाजिक विकासातील योगदानातून झालेले महिला सक्षमीकरण

प्रा.डॉ. सुनिता प्रमोद चौधरी,
सहयोगी प्राध्यापक लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय,जळगांव.

- **प्रस्तावना :**

आज आपण स्त्री पुरूष समानतेविषयी आज आपण सजगतेने आपली मते मांडतो परंतु काही अपवाद वगळता आज ही सद्यस्थिती म्हणावी तशी बदललेली दिसत नाही विविध क्षेत्रात महिला आज आघाडीवर आहेत नवनवीन क्षेत्रात महिलांचा टक्का वाढतोय ही सुखावह गोष्ट नक्कीच आहे. त्याचबरोबर आज ही काही क्षेत्रात पुरूषी वर्चस्व मोठया प्रमाणात आढळते अशी संमिश्र स्थिती आज आपल्या देशात पाहायला मिळते महिला आणि उद्योग याचा विचार केला तर आज आपल्या देशात महिलांचे उदयोजकतेकडे वळण्याचे प्रमाण वाढू लागले आहे.

जागतिक महिला उद्योग विकासाचा विचार केला तर भारत इतर देशांच्या तुलनेत पिछाडीवर आहे. भारतात यापुर्वी महिला उद्योजकतेला योग्य ती चालना मिळाली नाही. आपल्या देशात खुप मोठया प्रमाणात समता असलेले मनुष्यबळ आहे. यातील महिलांचा ही तेवढाच मोठा आहे. आपल्या देशात महिलांना अनेक गोष्टीसाठी संघर्ष करावा लागला आहे आणि आज ही करावा लागतोय परंतु आजच्या काळातील स्त्री ही शिक्षणाने सक्षम झालीय स्वता:च्या पायावर सक्षम उभी राहतेय. जागतिक पातळीवर 126 मिलीयनहून अधिक महिलांनी उदयोग सुरू केलेत अथवा करतायत केवळ भारताचा विचार केला तर 8 मिलीयनहून अधिक महिला उदयोगात सक्रीय आहेत. काही वर्षापुर्वी महिलांचे उदयोग म्हणजे स्वयंरोजगार किंवा गृहोउदयोग अशी परिस्थिती आपल्याकडे होती घरसंसार सांभाळून जे करायला जमेल ते करणे परंतु हळू-हळू याबदल होत गेला मोठी झेप घ्यावी, कंपनी स्थापन करावी, एक स्वंतत्र्य उदयोजिका म्हणुन स्वत:ला प्रस्थापित कराव यासाठी आज महिला सक्षम झाल्या आहेत.

आज महिलांचा उदयोजकाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललाय तिचे माहितीचे स्त्रोत वाढलेत. समाजातुनही महिलांच्या उदयोगांना स्विकार्हता मिळतेय उत्तम पायाभुत सुविधा, तंत्रज्ञानाचे ज्ञान आज त्यांना उपलब्ध होतच. याच शिवाय वित्तीय पाठींबा आणि उदयोग विश्वात वाढत असलेले आदर्श याही काही जमेच्या बाजू आज आपल्याला पहायला मिळतात.

याशिवाय महिलांकडे अपजतच काही गुण असतात जसे की उत्तम व्यवस्थापन, संगठण कौशल्य, चोख व्यवहार इ. याचा जीला तिच्या उदयोगाच्या वाढीसाठी फायदा होतो. त्याचा फायदा घेवुन ही उदयोग उभ्या करण्याचा महिलांचा टक्का मात्र आपल्या देशात आज ही कमी आहे. आपण प्रगत राष्ट्रांचा विचार केला तर स्त्रीला स्वतंत्र्यपणे स्वत:चे वेगळे मोठे आस्थापना उभे करण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. ते म्हणजे आत्मविश्वासांची कमी, व्यावसायिक धोके, सामाजिक, सांस्कृतिक, पारंपारिक विचार पाळणारी संस्कृती अशा अनेक गोष्टींशी भारतीय स्त्री सतत संघर्ष करीत आहे.

तरीपण महिला उदयोजकांचा विचार केला तर घर आणि समाज यांच्या विकासाला पोषक वातावरण देण्याकडे त्यांचा जास्त कल असतो असे दिसुन येते.

व्यवसाय करणाऱ्या महिला या आर्थिक दृष्टया सक्षम होतात हे महत्वाचे आहे. इंटेरिअर डिझायनर, गार्मेट, फॅशन डिझाइनर, ब्युटी इंडस्ट्री अशा अनेक क्षेत्रात आज महिला उदयोजगे आघाडीवर दिसतात. या महिला

उदयोजकांची भुमिका समजण्यात सर्वात महत्वाची आहे. त्यांची सक्रीय भुमिका एका समाजाच्या विकासात महत्वाची आहे. समाजात अशा चांगल्या आदर्शाची भुमिका गरजेची आहे. ज्यांनी स्त्रीयांना स्वंतत्र्यतेच्या, समानतेच्या आणि समाजातील सर्व वर्गाच्या समाज भागीदारीची मान्यता केली आहे.

महिला उदयोजक त्यांचा समुदायात विकसित करणाऱ्या सक्षम करण्याच्या आणि सामाजिक संदेश पाठवण्याचा जागरूकतेस सुचारू भागीदार असतात. त्यांच्या उदयोजनात नागरीकांना समाजातील विविध जबाबदारीची भागीदारी घेता येते.

महिला उदयोजक अनेक क्षेत्रांमध्ये सक्रीय असून त्यांच्या कामाने समाजात सामाजिक, आर्थिक आणि प्राकृतिक संसाधनांचा उपयोग करण्यात आला आहे. त्यांच्या उदयोजनात महिलांना आत्मनिर्भर बनविले जाते ज्याने त्यांच्या स्वार्थातील आत्मविश्वासाची मदत करते.

महिला उदयोजकांची भुमिका सामाजिक आणि आर्थिक उत्तेजनासाठी महत्वाची आहे आणि त्यांचा समुदायात सक्रिय प्रवेश असल्याने समाजात विकासाच्या धारात अत्यंत महत्वपुर्ण भुमिका असते.

- **उदेश्य :-** **1. विविध यशस्वी महिला उदयोजिकांचा अभ्यास करणे.**
  **2. उदयोगात महिला सक्षमीकरणातील योगदान अभ्यासणे.**

**संशोधनाची पध्दत –**

या शोध निबंधासाठी आवश्यक असलेली माहिती दुय्यम माहितीच्या स्त्रोतावर गोळा करण्यात आली आहे. त्यात विविध पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, वेबसाईट यांचा उपयोग करण्यात आला आहे त्यानुसार निष्कर्ष मांडण्यात आले आहे.

**महिला उदयोजक –**

"महिला उदयोजकता म्हणजे महिलांनी स्थापन केलेले किंवा महिलांकडुन ज्या उदयोगाचा कारभार संचलित होतो असे उदयोग होय" या शिवाय 1991 च्या औद्योगिक धोरणात प्रथमच महिला उदयोजकेची व्याख्या करण्यात आली. त्या व्याख्येनुसार ज्या उदयोगाची मालकी व नियंत्रण महिलेकडे आहे. उदयोगाच्या भांडवलात किमान 51 टक्के भांडवल महिलेचे असावे आणि त्या उदयोगात 51 टक्के महिलांना रोजगार दिलेला असावा असे ठरविण्यात आले. परंतु असा आग्रह धरल्यामुळे महिला उदयोजकाचे प्रमाण कमी होतांना दिसते महिला उदयोजकतेचा सर्वांगीण, विकासाच्या दृष्टिने अडथळा येत आहे हे लक्षात आल्यावर भारत सरकारने महिला उदयोजकतेच्या व्याख्येमध्ये सुधारणा केली महिलांचे उपक्रम हे लघुउदयोग, उदयोगांशी संबंधीत सेवा किंवा व्यावसायिक उपक्रमाची एका महिलेचे किंवा जास्त महिलांची मालकी असावी आणि त्यांनी व्यस्थापन करावे तसेच महिलांनी त्यातील भांडवलाचा 51 टक्के भांडवल भागीदारी, भागधारकांचा किंवा खाजगी मर्यादित कंपनीच्या संचालकाच्या स्वरूपात आणावे. अशी दुरूस्ती करण्यात आली. भारतात क्रेडीस सुईस संस्थेच्या "वुमन इन बिझीनेस" या अहवालात असे म्हटले आहे की, ज्या कंपन्यामध्ये महिला सीईओ आहेत किंवा संचालक मंडळात महिला आहे अशा कंपन्या भागधारकांना अधिका लांभाश देतात असे दिसुन आले तसेच महिला सीईओ नियुक्ती मध्ये भारत विकसित देशाच्या पुढे गेला आहे. भारतात नोंदणीकृत कंपन्यांच्या संचालक मंडळात किमान एक महिला संचालक नियुक्ती न केल्यास सेबीने जुलै 2016 मध्ये 530 कंपन्यांना दंड केला आहे.

**भारतातील काही यशस्वी महिला उदयोजकांची माहिती –**

**1. ऋषिका श्रेष्ठा :**

ऋषिका नेपालमध्ये "पश्चिमी कुटूंब" या संस्थेची संस्थापक आणि संचालक आहेत त्यांनी गरीब आणि असमान समाजातील महिलांसाठी रोजगारांच्या अवसारे तयार केल्या आहेत.

**2.किरण माजुमदार :**

ह्या भारताच्या सबबे अँड रासायन उदयोगात स्त्री उदयोजकांपैकी एक अग्रगण्य आहे. त्या अब्जाधीश उदयोजक आहे. ब्युरोनोर, भारत आणि इंडियन इंस्टीटयुट ऑफ मॅनेजमेंट बैठकीत अध्यक्षा असलेल्या बायोटेकनॉलॉजी कंपनी बायोकॉन लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक आहे.

**3.फाल्गुली नायर :**

2012 मध्ये त्यांनी आपल्या उत्तम अश्या करिअरला राम राम केला आणि नायका या ई-कॉमर्स स्टार्टग्रुप कंपनीची स्थापना केली यामध्ये सौंदर्य प्रसाधने, पर्सनल केअर तसेच आरोग्य विषयक प्रोडक्टसचा समावेश होता सर्व उत्पादने ऑनलाईन आणि वाजवी दरामध्ये उपलब्ध करून देण्यात आली.

**4.लिना नायर :**

मुळ कोल्हापुरच्या आहेत शनल नावाच्या फ्रेंच लक्झरी फॅशन हाऊसमध्ये सीईओ ची जबाबदारी सांभाळणाऱ्या पहिल्या भारतीय व अश्वेन आणि दुस-या महिल्या ठरल्या. शनलसारख जागतिक लक्झरी बॅन्ड सीईओ च्या रूपाने गो-या पुरूषाची भरती करत आले. तशी त्यांची परंपराच होती परंतु शनलच्या 114 वर्षाच्या इतिहासात पहिल्यांदाच त्यांच्याकडे महिला सीईओ व क्रिएटिव्ह संचालकपदावर कार्यरत अराहे.

H.R. हेड झाल्या तेथे महिलांचे प्रमाण त्याच्यामुळे 38 टक्के वरून 50 टक्केवर त्यांनी केले.

**5. जयंती कठाळे :**

"पुर्णब्रम्ह" च्या व्यवस्थापकीय संचालिका आहेत. हा "मनस्विनी फुडस प्रायव्हेट लिमिटेड" चा प्रकल्प असुन जगभरात मराठी खाद्यपदार्थाची गुणवत्तापूर्ण उपहारगृह उभारणे व मराठी खाद्यसंस्कृती सर्वदुर पोहचविणे हे त्यांचे संकल्पीत कार्य 5 हजार शाखा उभारण्याचे कढाळे यांचा बेत आहे. स्वत:चे अस्तीत्व निर्माण करून रोजगार उपलब्ध करून दिला. त्याचा बरोबर त्यांचा दृढनिश्चय, आत्मविश्वास आणि प्रत्येक अडथळयांना न थांबता सामोरे जाण्याच्या ध्यासाने ती भारतात आणि परदेशात 14 रेस्टारेस्टस यशस्वी चालवत आहे.

ऑनलाईन होम शेफ प्रशिक्षण केंद्र दिल्ली, मुंबई पुणे बंगलुरू आणि युएस मध्ये यशस्वी रित्या चालू आहे.

**6. कल्पना सरोज**

महाराष्ट्र राज्यातील विदर्भातील एक महिला उदयोजक आहेत. त्या मुंबईत कमानी टयुल्स टयुब्स या कंपनीच्या अध्यक्ष आहेत. "स्लमडॉग मिलीयनेयर" म्हणुन ओळखल्या जाणा-या कल्पना सरोजांनी कमानी टयुब्स कंपनीच्या वादात सापडलेल्या मालमत्तेची खरेदी केली आणि ती कंपनी यश् स्वी पणे चालवुन तिला नफयात आणले.

**7.वंदना लुथ्रा :**

भारतीय उदयोजक व VLCC हेल्थ केअर लिमिटेड च्या संस्थापक आहेत. प्रधानमंत्री कौशल्या विकास योजनेअंतर्गत प्र शिक्षण देणारी ही संस्था आहे.

**8.आदिती गुप्ता :**

व्यवसायाला प्रेरणा देणारी होती. सुस्कृत समाजाच्या मध्यभागीही त्यांना मासिक पाळी विषयी जाणीव आणि ज्ञानाचा अभाव आढळुन आला आणि त्यामुळे त्यांनी व्यवसाय करण्याचा निर्धार केला. Mentrupedia.com नावाच्या संपूर्ण वेबसाईडवर व्यवसाय विस्तारलेला आहे. 18 विविध देशांमध्ये माहिती वितरीत करण्यास सक्षम आहे आणि 11 पेक्षा जास्त भाषांमध्ये त्याचा अर्थ लावला गेला आहे. 2014 मध्ये फोर्ब्स इंडियाच्या 30 वर्षाखालील यादीत स्थान मिळवले आहे कारण तीने मासिक पाळीबद्दलच्या गैरसमजांना दुर ठेवण्याचा व्यवसाय केला आहे.

**9.पार्वती बाईफुंदे :**

औंरगाबादमध्ये उदयोग सुरू केला पाईप फॅक्टरी सुरू केली, महाराष्ट्रात त्यांची विक्री होते त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी इतर महिलांना व्यवसायांचे मार्गदर्शन करून व्यवसायाला लावले आहे. 1 ते 1/1.5 कोटी त्यांचा टर्नओव्हर आहे 51 उदयोग चालू करण्याचा त्याचा मानस आहे.

**10. शोभना भारतीया :**

ह्या हिंदुस्तान टाईम्स समुहाचे अध्यक्ष व संपादकीय संचालक आहेत. शोभना भारतीय ह्या एक भारतीय उदयोगपती आहे. त्या HT मिडीयाच्या अध्यक्षा आणि संपादकीय संचालक आहेत जे भारतातील सर्वात मोठे वृत्तपत्र आणि मिडीया हाऊस आहे, जे तीलला तीच्या वडीलांकडुन मिळाले आहे.

**11. लावण्या नल्ली :**

भारतीय उदयाजिका आहेत द नल्ली ग्रुप ऑफ कंपनीस या उपाध्यक्ष म्हणुन नेतृत्व करतात. मला नल्ली हे जगातील पहिल्या क्रंमाकावर साडीचे ठिकाण बनवायचे आहे आणि मला वाटते की मी करू शकते असा त्यांचा दृढविश्वास होता देशातील स्टोअरची संख्या 34 वरून 74 पर्यंत करण्याचे त्याचे लक्ष्य आहे.

**निष्कर्ष** :

संबंधीत सादर करण्यात आलेल्या पेपर मध्ये दिलेल्या माहितीवरुन व इतर दिलेल्या माहितीवरुन असे निर्दशनास येते की, भारतात सुध्दा काही उदयोजक महिला यशस्वी झाल्या असुन महिलांनी स्वत: आपल्या ज्ञान व कौशल्यातुन उदयोगात उंच भरारी घेतली आहे. जागतिक स्तरावर सुध्दा भारतीय महिलांचा उदयोग जगतात विचार करण्यात येत आहे.

तसेच काही महिला आपल्या कुटुंबाचा आधार किंवा वारसा हक्काने यशस्वी उदयोजिका आहेत. अशा महिलांनी अत्यंत कमी वेळेत आर्थिक स्वातंत्र, स्वत: ची ओळख, क्रियाशिलता, जोखिम स्विकारण्याची क्षमता, क्रियाशिलता, आत्मसन्मान, दृढनिश्चय, आत्मविश्वास, प्रत्येक समस्यांना समोरे जाणे इ. ची प्रेरणा नवीन पिढीतील तरूणींना मिळू शकेल आणि महिलामध्ये एकुण उदयोजकता वाढून भारतामधील 48 टक्के महिला वर्गाचा देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावण्यास मदत घेवुन देश लवकर समृध्दी प्राप्त केल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ :**


- प्रकाश बियाणी (मराठी अनु. सुवर्णा बेडेकर) – भारतीय उदयोजिका –इंदिरा प्रकाशन 2010
- प्रभाकर देशमुख (1987)–श्रमाचे अर्थशास्त्र - विद्या प्रकाशन, नागपुर.
- कवी माधवी (1999) –महिला कल्याण आणि विकास - विद्या प्रकाशन, नागपुर.
- Desai Vasant (2006)–Dynamic of Entrepreneuraial Developmnet and Management" Himalaya publishing House, Mumbai
- www.gov.maharashtra.inc.in
- Madhulika Sonawane (2021)-Women at 2021 –Published Edited Book by Jitendra Ahirrao –ISSN-9789354577598
- लोकराज्य सप्टेंबर -2007 व डिसेंबर 2007
- दिव्य मराठी न्युज पेपर –दि.9.2.2024

ISSN : 2278-9308
February 2024

# सर्वप्रथम महिला असा बहुमान प्राप्त असलेल्या शास्त्रज्ञ महिलांचा अभ्यास

**डॉ. भारती प्रमोद गायकवाड**
धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव

**प्रास्ताविक :**

साक्षरता हे ज्ञान प्राप्तीचे अत्यंत महत्वाचे साधन आहे. गृह शिक्षणाची सर्व जबाबदारी स्त्रीयांवर असल्यामुळे स्त्रीया ज्ञान संपन्न असाव्यात हे सर्वमान्य झाले आहे. शिक्षणामुळे व्यक्ती विकास, संस्कार निर्मीती व सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होते, आर्थिक समानता मिळते या उद्देशाने स्त्रीयांच्या शिक्षणाला विशेष प्राधान्य देण्यात आले. आज महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र बनविणे हा मुलभूत हक्क आहे. पुरूषांच्या बरोबरीने कर्तृत्व गाजवुन आज सर्वच क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवित असल्याचे सर्वत्र दिसुन येत आहे. म्हणजेच स्त्रीया या पुरूषां इतक्यात बुद्धीमान आहेत.

अलीकडील काळात महिलांनी अर्थाजन करणे काळाची गरज आहे. केवळ अर्थाजनच नव्हे तर राजकारण, समाजकारण यातही काही स्त्रीया पुरूषांवर मात करून पुढे आल्या आहेत. स्त्री शिक्षणाच्या प्रसारामुळे स्त्रीयांमध्ये स्वत:च्या पायावर उभे राहण्याची प्रवृत्ती वाढत आहे. शिक्षण क्षेत्र, बँकीग क्षेत्र, अशा सुरक्षित समजल्या जाणाऱ्या नोकऱ्यांनाच प्राधान्य दिले जायचे. पण काळाच्या ओघात हे चित्र बदलत आहे, एकदम हटके म्हणता येतील अशा क्षेत्रातही महिलांनी स्वत:ची ओळख निर्माण केली आहे.

**अल्बर्ट आईनस्टाईन –**

इतरांचे अनुकरण करून अर्थाजन शिक्षण व इतर क्षेत्रात स्थान प्राप्त करीत असलेले पुरुष किंवा महिला जिथ पर्यंत पोहचतात / पोहचू शकतात परंतु ज्या धाडसी महिला असतात त्या कुणीही पोहचू न शकणारे स्थान प्राप्त करीत असतात.

**संशोधनाचे उद्देश :-**

प्रथम महिला असा बहुमान प्राप्त महिला शास्त्रज्ञांनी कोणता शोध लावला याचे अध्ययन करणे.

**संशोधनाचे गृहीतकृत्य : -**

ज्या कालावधीत महिलांना शिक्षण घेणे शक्य नव्हते त्या काळात शिक्षण घेतले. पीएच.डी. पदवी मिळवुन व या ज्ञानाद्वारे भारताच्या विकासात आपले कौशल्य व ज्ञान सिद्द केले.

**तथ्य संकलन : -**

सदर संशोधन पेपर मध्ये भारतात नावाजलेल्या संशोधक महिलांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यासाठी पुस्तके, वर्तमानपत्रे, इन्टरनेट, विकीपीडीया या द्वितीय स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. याद्वारे तथ्य संकलीत करण्यात आले आहे.

**सर्वप्रथम बहुमान प्राप्त अशा महिला –**

1. **मादाम क्युरी –** 20 व्या शतकातील प्रतिभावंत शास्त्रज्ञांच्या मांदियाळीतील एक तेजस्वी तारका म्हणून यांना सार जग ओळखतं. अत्यंत हलाखीच्या आर्थिक परिस्थितीतून अभ्यास करून फ्रान्स मधील सुप्रसिद्ध झोर्बान विद्यापीठाकडून डॉक्टरेट पदवी मिळविणाऱ्या या पहिल्या महिला, पती पीटर क्युरी बरोबर "किरणोत्सरी च्या घटनेच्या शोधाबद्दल 'नोबेल' पारीतोषकावर ( भौतिक शास्त्र) यांचे नाव कोरले गेले. नंतर आठ वर्षांनी 'रेडीयम' धातुच्या शोधाकरीता त्यांना रसायनशास्त्राचे दुसरे नोबेल पारीतोषीक मिळाले. रेडियोॲक्टीव्हिटी – किरणोत्सर्ग या घटनेचा शोध लावण्याची प्रकांड बुद्धीमत्ता असलेल्या नोबेल पुरस्कार मिळविणाऱ्या जगप्रसिद्ध संशोधिका, लखलखत्या बुद्धीमत्तेच्या

या संशोधक महिलेने विज्ञान जगतात नवे मापदंड प्रस्थापीत केले. मादाम क्युरी यांना दुसरे नोबेल मिळाले ते 1971 साली आज आपण गृहीत धरतो ह्या गोष्टी अस्तित्वातच नव्हत्या. त्या काळात विज्ञान प्रवास, टेलिफोन, विजेवर चालणारी हिटींग व्यवस्था, मोटार गाडीचा वेग प्रतितास 45 कि.मी. वेगाने करणे शक्य झाले. या अशा अचिव्हमेन्टचा हेवा वाटावा असा तो काळ होता.

2. **भारतातील पहिल्या महिला शास्त्रज्ञ – कमला सोहोनी –** भारतीय विज्ञान संस्था बेंगलोर – दुधातील व कडधान्यातील प्रथिनांचे पृथ्थकरण ल्युमनायझेशन ऑफ बफेलो मिल्क – सर विल्यम इन इन्सिट्युट ऑफ बायोकेमिस्ट्री, केंब्रिज, इंग्लंड – वनस्पतीमध्ये 'सायटोक्रोम' चा शोध या शोधाबद्दल केंब्रिज विद्यापीठाने पीएच.डी. पदवी दिली. आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ जगतात नाव झाले. निरा या पेयातील उपयुक्त घटक, त्यांचे माणसांवर होणारे परिणाम, राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते 29 एप्रिल 1960 रोजी विज्ञान क्षेत्रामध्ये उत्कृष्टता आणि त्याच्या योगदानासाठी मिळाला. कमला सोहोनी या जैवरसारनशास्त्रज्ञ व आहारशास्त्रातील तज्ञ. भारतातील लोकसंख्येतही काही गरीब वर्गाद्वारे खाल्ल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांचे पौष्टीक मुल्य त्यांनी शोधले. त्यांनी आपले सारे आयुष्य अन्न भेसळी विरोधातच काम करण्यात व्यतीत केले.

3. **राजेश्वरी चटर्जी :-** राजेश्वरी चटर्जी या भारतातील पहिल्या महिला इंजिनियर होत्या. इंडियन इन्स्टीट्युट ऑफ सोशल सायन्स, बेंगलोर येथे पहिल्या शास्त्रज्ञ होत्या. मायक्रोव्हेव इंजिनियरींग मध्ये 1953 मध्ये त्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली. विद्युत चुंबकीय सिद्धांत इलेक्ट्रॉन ट्युब सर्किट रेडीयो हे विषय त्यांनी शिकवीले. बेंगलोर मध्ये त्या प्रोफेसर म्हणून काम करीत होत्या. कर्नाटकातील पहिल्या महिला अभियंता होत्या. याच काळात चटर्जी यांची इलेक्ट्रीकल कम्युनिकेशन इंजिनियरींग विभागात अध्यक्ष पदावर निवड झाली.

4. **प्रा. असिमा चटर्जी –** सेंद्रिय रसायनशास्त्र आरि फायटोमेडीसीन क्षेत्रातील त्यांच्या कार्यासाठी प्रसिद्ध असलेल्या भारतीय सेंद्रिय रसायन शास्त्रज्ञ होत्या. त्यांच्या सर्वात उल्लेखनिय कार्यामध्ये विन्का अल्कलॉईड्स वरील संशोधन, मिरगी विरोधी औषधांचा विकास आणि मलेरीया विरोधी औषधांचा विकास याचा समावेश होतो. त्यांनी भारतीय उपखंडातील औषधी वनस्पतींवर मोठ्या प्रमाणात काम केले आहे. भारतीय विद्यापीठातुन डॉक्टरेट ऑफ सायन्स ही पदवी मिळविणाऱ्या या पहिल्या महिला आहेत. यांनी आपल्या जीवनातील 40 वर्षाचा कालावधी कर्करोग आणि कर्करोग विरोधी औषधांवर संशोधन करण्यासाठी समर्पित केला आहे. त्यांनी अल्कलाईडचा अभ्यास केला. ज्याचा उपयोग कर्करोगाच्या रूग्णासाठी केमोथेरपी मध्ये प्रभावीपणे केला जातो. डॉक्टरेट मिळविणाऱ्या त्या पहिल्या महिला आहेत. त्यांनी कलकत्ता विद्यापीठाच्या लेडी ब्रेबॉर्न कॉलेजमध्ये रसायनशास्त्र विभाग सुरू केला.

5. **एडावलथ कक्कर जानकी अम्मल:-** या एक भारतीय वनस्पतीशास्त्रज्ञ होत्या ज्यांनी वनस्पती प्रजनन, सायटोजेनेटीक्स आणि फायटोजिओग्राफीवर काम केले आहे. त्यांच्या सर्वात उल्लेखनीय कामात ऊस आणि वांगी यावरील अभ्यासाचा समावेश आहे. भारतातील पर्जन्य, जंगलातील वांशिक वनस्पती आणि औषधी आणि आर्थिक मुल्य असलेल्या वनस्पतीमध्ये काम केले. 1977 मध्ये भारताच्या तत्कालीन पंतप्रधानांनी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. स्थानिक शेतकरी वर्ग यांचे मार्गदर्शन घेण्यासाठी येत असत. जानकी अम्मल यांनी अमेरीकेतील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक विद्यापीठातून पीएच.डी. पदवी मिळविणाऱ्या पहिला महिला आहेत. भारत सरकारच्या पर्यावरण आणि वनीकरण मंत्रालयाने 2000 मध्ये त्यांच्या नावावर वर्गीकरणाचा राष्ट्रीय पुरस्कार स्थापीत केला.

6. **टेसी थॉमस :-** डॉ. टेसी थॉमस यांनी 1983 मध्ये इलेक्ट्रीकल इंजिनियरींग मध्ये बी.टेक केले. 2014 मध्ये हैद्राबादच्या जवाहरलाल नेहरू टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सीटी मधुन क्षेपणास्त्र मार्गदर्शन यात पीएच.डी. केली. युपीएससी च्या माध्यमातुन IAS होण्याचा मानस होता. परंतु DRDO च्या मुलाखतीत प्रथम पास झाल्यामुळे त्यांनी देशाची सेवा करण्याचा निर्णय घेतला. 32 वर्षाहून अधिक काळ चाललेल्या त्यांच्या कार्यात डॉ. टेसी थॉमस यांनी मार्गदर्शन,

नियंत्रण, इनर्शियल नेव्हीगेशन, ट्रजेक्टरी सिम्युलेशन आणि मिशन डिझाईन यासारख्या विविध क्षेत्रात योगदान दिले आहे. प्रथमच अनेक नवीन तंत्रज्ञानासह अत्याधुनिक प्रणालीसाठी आणि यशस्वीरीत्या उड्डाण चाचरी आणि सिद्ध झालेल्या अत्याधुनिक प्रणालीसाठी प्रकल्प संचालक म्हणून त्या AGNI-4 या मोठ्या प्रकल्पाचे नेतृत्व करीत होत्या आणि लांब पल्ल्याच्या AGNI-5 साठी प्रकल्प संचालक ( मिशन) देखील होत्या. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हे भारताचे "मिसाईल मॅन" म्हणून ओळखले जातात. तर फार कमी लाकांना माहिती आहे की, भारतातही "मिसाईल वुमन" आहे या DRDO च्या वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ. टेसी थॉमस आहेत.

**निष्कर्ष :-**

1. ज्या कालखंडात मुलींना घराबाहेर जाण्याची परवानगी नव्हती त्या काळात परदेशात जावुन या महिलांनी शिक्षण घेतले व पुरस्कार आणि सन्मान प्राप्त केले.
2. कुटुंबातील सदस्यांनी या महिलांच्या शिक्षणास पाठींबा दिला, मदत व सहकार्य केले.
3. या महिला शास्त्रज्ञांच्या शोधामुळे राष्ट्रविकासास खुप मोठा फायदा झाला.
4. महिला शास्त्रज्ञांच्या संशोधनामुळे आरोग्याच्या क्षेत्रात खुप मोठी क्रांती झाली व प्रगती झाली.

**संदर्भ ग्रंथ सुची :**


- विकीपिडीया
- इन्टरनेट
- लोकमत पेपर चतुरंग पुरवणी – 26 फेब्रुवारी 2015
- नोकरदार स्त्री : गृहव्यवस्थापन पद्धती आणि समस्या – डॉ. सौ. सुवर्णा डायगव्हाणे
- डॉ. संजिव वेलणकर पुणे – संदर्भ वसुमती गुरू / विकीपिडीया
- लोकरंग रविवार 5 एप्रिल 2015

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B

ISSN : 2278-9308 February 2024

# ग्रामीण महिला सशक्तीकरण धोरणांचा अभ्यास

**प्रा. डॉ. आर. पी. पाटील**

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय विज्ञान महाविद्यालय ता.भडगाव . जि. जळगाव

E mail:- drrpatil१०६८@gmail.com

**प्रा.डॉ. जनार्दन जानजी देवरे**

सौ.र.ना.देशमुख कला वाणिज्य व नगाव ता.जि. धुळे .

Email:- janardandevare@gmail.com

**प्रस्तावना –:**

मानवाला आपले दैनंदिन जीवन जगण्यासाठी प्रथमतः आपल्या मूलभूत गरजांचे पूर्तता करावी लागते. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान यासारख्या गरजांची पूर्तता करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. या संघर्षात पुरुषांबरोबर महिलांची भूमिका समान पातळीवर सारखीच असते. सामाजिक प्रबोधनपुर्व काळात पितृसत्ताक कुटुंब पद्धतीत महिलांना दुय्यम स्थान दिले जात असे; परंतु आजच्या आधुनिक काळात महिलांना प्रगतीची समान संधी उपलब्ध आहे. याची सुरुवात जगामध्ये अमेरिका, युरोपियन देशांमध्ये स्त्रीवादी महिला चळवळीच्या स्वरूपात झालेली दिसून येते. महिलांचा हक्क, अधिकार, स्वातंत्र्य बाबत सामाजिक प्रबोधन व सुधारणावादी चळवळीमुळे पाश्चिमात्य देशांमधील स्त्रीवादी चळवळ व विचारधारा जगातील इतर अनेक देशांमध्ये महिलांच्या सबलीकरणाच्या दृष्टिकोनाला पाठबळ मिळवून दिले आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघामार्फत मानवी हक्काच्या वैश्विक जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. १९७५ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले तर १९७५ ते १९८५ ही आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून जाहीर करण्यात आले. परंतु तरीही जगामध्ये स्त्री पुरुष भेदभावाप्रमाणे जगातील अनेक देशांमध्ये शहरी व ग्रामीण महिला भेदभावही दिसून येतो. शहरी महिलांना प्रगतीच्या, स्वातंत्राच्या, अधिकारांच्या आर्थिक क्षमतेच्या जेवढ्या संधी उपलब्ध होतात तेवढ्या प्रमाणात ग्रामीण महिलांना उपलब्ध होत नाहीत. त्या दृष्टिकोनातून ग्रामीण महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने १५ ऑक्टोंबर २०१८ हा दिवस मुख्य महत्त्वपूर्ण मानला जातो कारण याच दिवशी संयुक्त राष्ट्रसंघामार्फत पहिला आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिनाची घोषणा करण्यात आली आहे. भारतातही २००१ हे वर्ष राष्ट्रीय महिला सबलीकरण वर्ष म्हणून घोषित केलेले आहे. या वर्षात महिला सबलीकरणासाठी विविध बाबींवर भर देण्यात आला आहे. ज्यामध्ये महिला विकासासाठी कार्यक्रम योजना तयार करणे, महिलांवरील अन्याय अत्याचार हिंसाचार कमी करण्यावर भर देणे, महिलांना कौटुंबिक व आर्थिक निर्णयासाठी सक्षम बनविणे, महिलांच्या शिक्षण, आरोग्य, रोजगार यामधील सहभाग निश्चित करणे, महिलांना सामाजिक राजकीय आणि आर्थिक दृष्ट्या समान अधिकार प्रदान करणे. पुढील काळात महिला धोरणानला व्यापक स्वरूप देण्यासाठी केंद्र सरकारने महिला सशक्तीकरनासाठी राष्ट्रीय महिला धोरण मसुदा २०१६ तयार केलेला आहे. या मसुद्यात तिसऱ्या भागात महिला सक्षमीकरणासाठी विशेष तरतूद केलेल्या आहेत

**संशोधनाचे उद्देश:-**

1) ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महिलांची भूमिका अभ्यास करणे.

2) ग्रामीण महिला सक्षमीकरण योजनांचा अभ्यास करणे.

**तथ्य संकलन :-**

सदर संशोधन पेपर तयार करण्यासाठी प्रामुख्याने प्राथमिक आणि दुय्यम तथ्य सामग्रीचा वापर करण्यात आलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथ, वार्षिक अहवाल, विविध शासकीय निमशासकीय संकेतस्थळे, दैनिक, साप्ताहिक, मासिक इत्यादी साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**सक्षमीकरण म्हणजे काय :-**

जागतिक बँकेच्या मते- सक्षमीकरण म्हणजे लोकांच्या निवड करण्याच्या संधीत वाढ करणे, लोकांच्या जीवनमानावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांच्या जबाबदारीची निश्चिती करणे, त्यामध्ये सहभागी होणे, प्रभाव पाडणे नियंत्रण ठेवणे होय.

**महिला सक्षमीकरण म्हणजे :-**

लिंगभेदाला खत पाणी घालणाऱ्या परंपरागत समाज रचना व समाज धारणेत बदल घडवून आणणारी अशी प्रक्रिया ज्यातून महिला समानता निश्चित होते व हाच महिला सक्षमीकरणाचा आधार मानला जातो.

अर्थात महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत लिंगभाव समानता, महिलांच्या निर्णय प्रक्रियेत सहभाग, विकासाची समान संधी हे घटक महत्त्वपूर्ण आहेत.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचे स्थान :-**

ग्रामीण अर्थव्यवस्थेत पुरुषांप्रमाणेच महिलांची योगदान खूप महत्त्वपूर्ण आहे कृषी क्षेत्रात पुरुषांप्रमाणेच महिलांची भूमिका ही खूप महत्त्वपूर्ण आहे भारतीय कृषी क्षेत्रात महिला प्रत्यक्ष सहभागी आहेत ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांच्या कृषी क्षेत्रात सहभाग हा मशागतीची कामे पीक काम निश्चित निधनाची पेरणीची इत्यादी स्वरूपाची अवकशुल स्वरूपाचे सहभाग दिसून येतो देशातील एकूण लोकसंख्येत महिलांमध्ये ग्रामीण महिलांचे प्रमाण हे 72% जवळपास आहे ग्रामीण महिलांचे प्रमाण हे कौशल स्वरूपाचे आहे ग्रामीण क्षेत्रात महिला कृषी क्षेत्रातील सहभागावर कृषी प्रमुख उद्योग हस्ते व्यवसाय उद्योग महिला ग्रामीण उद्योग घरगुती उद्योग यामध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे अलीकडील काळात महिला बचत गटांच्या मार्फतही मोठ्या प्रमाणावर आर्थिक सक्षमतेच्या दृष्टिकोनातून सहभागी आहेत आधुनिक काळात महिलांचा सहभाग अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रांमध्ये झालेला आहे

महिला सक्षमीकरणाच्या योजना देशातील ग्रामीण महिला सक्षम करण्यासाठी पंचवार्षिक योजना काळात केंद्र सरकार तसेच राज्य सरकारकडून अनेक योजना शासकीय उपक्रम राबविण्यात आलेली आहेत या उपक्रम योजनांमधील अनेक योजना आज बंद असल्या तरी त्या नव्या स्वरूपात ते अलीकडील काळामध्ये नव्या उद्देशाने वर्तमानातील गरजा लक्षात घेऊन लागू करण्यात आलेल्या आहेत.

**ग्रामीण महिला सशक्तीकरणाची गरज :-**

जगामध्ये महिला सक्षमीकरणासाठी अनेक कार्यक्रम धोरण तयार करण्यात आलेले आहेत. परंतु सामाजिक स्तरावर प्रत्येक ठिकाणी महिलांसोबत भेदभाव केला जातो. संपूर्ण देशामध्ये महिलांच्या आर्थिक क्षमतीच्या दृष्टीने गरिबी दिसून येते. देशातील पार कमी महिला सेवा क्षेत्रात व त्या संलग्न व्यवसायांमध्ये सहभागी झालेले आहेत. त्यांना या क्षेत्रात सक्षम बनवण्यासाठी व पुरुषांसोबत उभे करण्यासाठी आर्थिक सक्षमतेची गरज आहे. तसेच बलात्का,र सामाजिक अवहेलना, मानहानी, लैंगिक अत्याचार यासारख्या अनेक घटना महिलांचे सामाजिक स्तरावरील दुय्यम स्थान निदर्शनास आणून देते. यासाठी महिलांना सर्वांगीण सक्षमीकरणाची आज गरज आहे. देशातील साक्षरतेच्या प्रमाणात पुरुषांच्या तुलने स्त्री साक्षरतेचे प्रमाण खूप कमी आहे. त्यामध्ये ग्रामीण महिला साक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक आहे. शिक्षण महिला सक्षमीकरणाचा महत्त्वपूर्ण घटक आहे व पायरी ही आहे. थोडक्यात महिला सक्षमीकरणासाठी स्वतः महिला पुढे येत नाहीत व स्वतः मदत व सक्रिय सहभाग घेत नाही तोपर्यंत हे शक्य नाही.

**ग्रामीण महिला सक्षमीकरणाच्या योजना :-**

देशातील ग्रामीण महिला सक्षमीकरणासाठी पंचवार्षिक योजना काळात केंद्र सरकार तसे राज्य सरकारकडून अनेक योजना शासकीय उपक्रम राबवण्यात आलेली आहेत या उपक्रम व योजनांमधील अनेक योजना आज बंद असल्या तरी त्या नव्या स्वरूपात अलीकडील काळातील नव्या उद्देशाने व वर्तमानातील गरजा लक्षात घेऊन सुरू करण्यात आलेले आहेत त्यापैकी काही प्रमुख योजना, कार्यक्रम, आयोग पुढील प्रमाणे आहेत-

1) स्वर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजना

2) मनरेगा

3) राष्ट्रीय शेती आणि ग्रामीण विकास बँक

4) प्रधानमंत्री मातृ वंदना योजना

5) महिला आणि बाल विकास मंत्रालय

6) बेटी बचाव बेटी पढाव कार्यक्रम

7) सुकन्या समृद्धी योजना

8) महिला शक्ती केंद्र योजना

9) स्टेट बँक ऑफ इंडिया ची स्त्री सखी योजना

10) इंदिरा प्रियदर्शनी योजना

11) धनलक्ष्मी योजना

12) उज्वला योजना
13) खादी आणि ग्रामोद्योग आयोग
14) स्वयंसेध्दा योजना
15) स्वाधार योजना
16) एकीकृतबाल संगोपन योजना
यासारख्या अनेक योजना केंद्र आणि राज्य शासनामार्फत राबवल्या जात आहेत.

**निष्कर्ष :-**

वरील अध्ययनावरून असे निदर्शनात येते की; वर्तमान काळात ग्रामीण महिला सक्षमीकरणाची स्थिती ही शहरी महिलांच्या तुलनेत खूपच कमी आहे. देशातील ग्रामीण महिला वैयक्तिक उत्पन्न, रोजगाराच्या संधी व साक्षरतेच्या बाबतीत शहरी महिलांच्या तुलनेत तसेच पुरुषांच्या तुलनेतही मागे आहेत. वर्तमान काळात याबाबतीत आज संशोधनाची खरी गरज आहे.

महिला सक्षमीकरणाने लैंगिक भेदभाव समाप्त होऊन स्त्री पुरुष समान संतुलन निर्माण झाल्यास त्याचा प्रत्यक्ष लाभ समाज, देश व राष्ट्रीय निर्मिती होणार आहे. महिलांच्या प्रती सामाजिक दृष्टिकोनात बदल होणे आज काळाची गरज बनली आहे. जेव्हा ग्रामीण कुटुंबातील एकाचे स्त्री पुढे जात असते तेव्हा तिच्या कर्तुत्वाचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष फायदा त्याच्या कुटुंबाला, मुलांना, समाजाला, गावाला व देशाला होऊन राष्ट्र निर्मितीस मदत होते. देशाचा सामाजिक आर्थिक विकास साध्य करण्यासाठी व्यापक दृष्टिकोनातून स्त्री पुरुष दोघांनाही प्रगतीची व विकासाची समान संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. जोपर्यंत देशातील ग्रामीण महिलांना पुरुषांच्या तुलनेत प्रगतीचे समान संधी मिळणार नाही तोपर्यंत समाजालाही ग्रामीण महिलांच्या वास्तविक पूर्ण क्षमतेचा लाभ मिळणार नाही. यासाठी महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करणे गरजेचे आहे व यासाठी केवळ शासकीय धोरणच पुरेशी ठरणार नाहीत तर महिलांच्या विकासासाठी समान संधी देऊन त्या उत्पन्नाच्या, संपत्तीच्या बाबतीत संपन्न करणे गरजेचे आहे. ग्रामीण महिला सक्षमीकरणासाठी सामाजिक स्तरावर, सरकार स्तरावर महिला विकासासाठी तयार केलेल्या योजनांचा योग्य लाभ मिळाला पाहिजे यामध्ये स्त्री पुरुष भेदभाव होता कामा नये. देशातील ग्रामीण महिलांना समानतेच्या दृष्टिकोनातून सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनात स्वतः निर्णय घेऊन सहभागी होऊन समान संधी मिळाली पाहिजे.तेव्हाच खऱ्या अर्थाने ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम होण्यास मदत होणार आहे.

**संदर्भ सूची :-**

१) वि.मा. गिताली, स्त्री चळवळ काल -आज आणि उद्या, पृ. क्र.२००
२) भास्कर लक्ष्मण बोडे, भारतीय प्रबोधन स्वरूप आणि आव्हाने, पृष्ठ क्रमांक ४७
३) स्त्रीवादि चळवळ आणि भारतीय स्त्रियांचे प्रश्न, पृ. क्र. १९१ ते २९९ प्रथम आवृत्ती ८ मार्च २००४ प्रतिमा प्रकाशन, पुणे.
४) शोभा पाटील, स्त्रीवादी विचार आणि समीक्षांचा मागवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
५) प्रतिभा रानडे, स्त्री प्रश्नांची चर्चा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
६) डॉ. दिनेश कुमार विश्ववर्मा, भारतीय समाज मे महिला सशक्तिकरण जे. टी. एस. प्रकाशन दिल्ली.
7) विद्युत भागवत, स्त्री परिवर्तनाची वाटचाल परिवर्तनाच्या दिशेने, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
८) मासिक, योजना, ऑक्टोबर २०१८
९) मासिक, कुरुक्षेत्र, जुलै २०१९

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B

ISSN : 2278-9308 February 2024

# ग्रामीण महिला सक्षमीकरण : 'उमेद' अभियान

**प्रा.अश्विनी राजेंद्र पाटील**

धुळे एज्युकेशन सोसायटीचे, मा.ध. पालेशा वाणिज्य महाविद्यालय,धुळे

**प्रस्तावना**

आजच्या आधुनिक काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार केला असता, मानव संसाधनात भारत जगातील पहिल्या क्रमांकाचा देश आहे. भारतीय अर्थव्यवस्था विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. विकासाच्या टप्प्यावर असणाऱ्या या अर्थव्यवस्थेत एकूण लोकसंख्येच्या निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. देशाच्या एकंदरीत विकासाकरिता महिलांना सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून सक्षम बनविणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. समाजात रुजलेली पितृसत्ताक विचारसरणी आणि स्त्रियां प्रति असलेली असहिष्णुता यामुळे महिलांच्या विकासात अनेक अडथळे निर्माण झाले आहेत. महिलांसाठी कमी रोजगाराच्या संधी, कामाच्या ठिकाणी भेदभाव, सुरक्षितेचा अभाव, असमान वेतन यांसारख्या समस्या आणि बहुतेक कार्यक्षेत्रे भेदभाव पूर्ण असल्याने, महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणात अडथळे निर्माण होताना दिसून येतात.

जागतिक बँकेच्या अहवालानुसार, भारतातील महिलांना आर्थिक विकासाच्या समान संधी दिल्यास भारताचा GDP वाढीचा दर ९ टक्क्यांवर जाऊ शकतो. महिलांचे शिक्षण आणि महिलांचा रोजगार यातील दरी वाढत चाललेली असताना, स्त्रियांना खरोखरच सक्षम केले जात आहे का? असा प्रश्न निर्माण होतो.

एका बाजूला महिलांमध्ये उच्च शिक्षण असूनही, महिलांच्या रोजगाराचे प्रमाण भारतात अत्यल्प आहे. जागतिक बँकेच्या आकडेवारीनुसार, २०१० ते २०२० या कालावधीत भारतातील नोकरदार महिलांची संख्या २४ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत घसरलेली आहे. तर दुसऱ्या बाजूला नॅशनल सॅम्पल सर्वे ऑफिस (NSSO) च्या आकडेवारीनुसार २०१७-१८ मध्ये भारतातील १८६ दशलक्ष महिला या निरक्षर आहेत. वरील आकडेवारी पाहता, देशात महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरिता महिला केंद्रित उपक्रम सरकारकडून वेळोवेळी राबविण्यात येत आहेत. उच्चशिक्षित महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि ग्रामीण भागातील महिलांना शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम, कौशल्य विकास आणि महिलांना उदयोन्मुख बनविण्यासाठी विविध योजना राबविणे यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार प्रयत्नशील असताना दिसते. आधुनिक काळात महिलांची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्थिती, त्यांचा सन्मान आणि महिला सक्षमीकरणाचा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. महिलांच्या सक्षमीकरणात समाजाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. जोपर्यंत राजकारणापासून ते आरोग्य आणि शिक्षणापर्यंतच्या महत्त्वपूर्ण क्षेत्रात महिलांची भूमिका मजबूत होत नाही, तोपर्यंत देशाच्या सर्वसमावेशक विकासाचे स्वप्न साकार होऊ शकत नाही. याच अनुषंगाने २०११ मध्ये **'महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान' (उमेद)** या नावाने या अभियानाची महाराष्ट्रात सुरुवात करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचा विचार करता राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये हे अभियान यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. ग्रामीण भागातील महिलांच्या विकासाच्या नवीन आर्थिक संधी अभ्यासणे.
2. ग्रामीण भागातील महिलांना आत्मनिर्भर आणि सक्षम बनविणे.
3. महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती (उमेद) अभियानाची भूमिका अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आलेला असून यात माहिती संकलनाकरिता शोधप्रबंध, शासनाचे जी.आर, वर्तमानपत्रे, पुस्तके, मासिके तसेच विविध संकेतस्थळांचा वापर केला आहे.

**महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद)**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी 'उमेद' अभियान महत्वपूर्ण कार्य करत आहे.

ग्रामीण विकासात महिलांचा कार्यक्षम सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा आहे समृद्ध गावाचे स्वप्न साकार करण्यासाठी गरीब, आदिवासी, विधवा, निराधार, अपंग इत्यादी घटकांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी शासन कटिबद्ध प्रयत्न करत आहे. तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचत गटांच्या माध्यमातून त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला चांगली बाजारपेठ उपलब्ध करून देणे, योग्य ब्रॅण्डिंग करणे, शहरी भागाला लागून त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला मॉलच्या माध्यमातून विक्री व्यवस्थापनाची सोय करून देणे त्यांना योग्य प्रशिक्षण देण्यासाठी राज्यभरामध्ये जिल्हा निहाय प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करून उमेद अभियानाला गती देण्यासाठी शासन नेहमीच तत्पर आहे.

**'उमेद' अभियानाचे उदीष्टे**

ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलनासाठी समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांमध्ये आत्मविश्वास जागा करून ग्रामीण भागातील गरीब जनतेच्या सक्षम व स्वायत्त संस्था उभारून त्यांना वित्तीय पाठबळ मिळवून देण्याचे त्याशिवाय उपजीविकेचे सर्वांगीण आणि शाश्वत स्रोत निर्माण करून देण्याचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट 'उमेद' अभियानाचे आहे. या उद्दिष्ट पूर्ततेसाठी व्यापक दृष्टिकोन, अपेक्षित परिणामांसाठी कटिबद्ध आणि आवश्यक पोषक वातावरण तयार करणे असा या अभियानाचा उद्देश आहे.

स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेचे रूपांतर राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात करण्यात आले. महाराष्ट्र राज्यात या अभियानालाच **'उमेद'** नाव देऊन उमेद ही कार्य कर्तुत्वाला चालना देणारी, आत्मविश्वास वाढवणारी आणि माणूस म्हणून पुन्हा उभे राहून देण्याचे बळ देणारी योजना बनली. याच **'उमेद'**ने लाखो महिलांना स्वयंरोजगाराची दिशा दाखवली. त्यांच्यातील सुप्त गुणांना आणि कौशल्यांना नवे पंख दिले. त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. ग्रामीण महिलांच्या विकासात या अभियानाद्वारे करण्यात आलेल्या प्रयत्नांचा आढावा पुढील प्रमाणे सांगता येईल.

**ग्रामीण महिलांचे 'उमेद' हक्काचे व्यासपीठ**

महाराष्ट्र शासनाने या अभियानाला 'उमेद' असे नाव दिले आहे. समाजातील प्रत्येक दुर्बल, वंचित, उपेक्षित ग्रामीण नारीशक्तीला आत्मनिर्भर करण्यासाठीचा प्रयत्न आणि राज्यातील ५२ लाखांपेक्षा जास्त ग्रामीण महिलांचे हक्काचे व्यासपीठ आणि आधार असलेले हे अभियान म्हणजे 'उमेद'अभियान होय. तळागाळातील कुटुंबांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध व्हावी आणि त्यातूनच त्यांचे दारिद्र्य कमी होऊन कुटुंब आर्थिक व सामाजिक दृष्टिकोनातून सक्षम व्हावे या दृष्टिकोनातूनच या अभियानाला खऱ्या अर्थाने सुरुवात करण्यात आली. ग्रामीण भागातील महिलांना या अभियानातून आर्थिक बळ देता येते. यासाठी केंद्र सरकारने २०२०-२१ वर्षासाठी ५७ कोटी ६७ लाख ५३ हजार निधी वितरित केला आहे. केंद्र आणि राज्य शासन यांच्या समन्वयाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी या अभियानाद्वारे सरकारने ३१५ कोटी ६० लाखांची तरतूद केली आहे. त्यातील ४१ कोटी ९० लाख वितरित करण्यास सरकारने मंजुरी दिली आहे. महाराष्ट्र राज्यात या अभियाना अंतर्गत ५० लाखांपेक्षा जास्त महिला जोडल्या गेल्या आहेत. मागील नऊ वर्षाच्या कालावधीत या अभियानाच्या अंतर्गत काम करणाऱ्या राज्यभरातील तीन हजारांहून

जास्त कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून शहरापासून गावापर्यंत बचत गटाच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्याचे मोठे कार्य यशस्वीरित्या केलेले आहे.

**ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराची दिशा**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती (उमेद) अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून दिला जातो. ग्रामीण भागातील स्त्रियांना छोट्या छोट्या उद्योगांतून रोजगार निर्माण करून देऊन त्यांना आत्मनिर्भर आणि सक्षम बनविणे हा या अभियानाचा प्रयत्न आहे. या अभियानात **केंद्र सरकार द्वारे ७५ टक्के तर राज्य सरकार द्वारे २५ टक्के** निधी देण्यात येतो. या माध्यमातून ग्रामीण भागातील अनेक महिलांना सक्षमीकरणाकडे वाटचाल करता येते. बचत गटांच्या माध्यमातून महिला नवनवीन वस्तू तयार करणे, निर्मित केलेल्या वस्तूंची विक्री करणे, तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर वस्तूंचे प्रदर्शन भरविणे या माध्यमातून आपल्यातील सुप्त गुणांना वाव देतात. यातूनच त्यांच्यामध्ये आयुष्याकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन मिळतो आणि एक नवीन उमेद त्यांच्यामध्ये निर्माण होऊन कार्यक्षमतेला वाव मिळतो.

या अभियानाच्या माध्यमातून स्वयंसहायता गट, बचत गट यांद्वारे महिलांचे एकत्रीकरण करून त्यांच्या उद्योजकतेला चालना दिली जाते 'उमेद' अभियानाच्या माध्यमातून महिलांना बचत करण्याची सवय लागली असून त्यांच्या स्वयंरोजगारांसह बँकांचे व्यवहार करण्याची क्षमता, आर्थिक नियोजनाचे कौशल्य विकसित झाले आहे. यात अनेक महिला बँकांमार्फत कर्ज घेऊन देखील लहान लहान लघुउद्योग सुरू करत आहेत. हेच या अभियानाचे यश आहे असे म्हणता येईल.

**उत्पादक गटांद्वारे शेतमालाच्या विक्रीतून महिला शेतकऱ्यांना लाभ**

राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानाच्या उद्दिष्टानुसार, या अभियानांतर्गत ग्रामीण महिलांच्या एकत्रीकरणाला प्रोत्साहन देण्यावर भर दिला जात आहे. या कार्यक्रमाची मूलभूत संकल्पना ग्रामीण महिलांना संघटित करणे आणि त्यांना स्वयंरोजगारासाठी सक्षम बनवणे ही आहे. ग्रामीण भागातील महिलांची शाश्वत उपजीविका वृद्धी करणे तसेच त्यांना शेती, पशुपालन, मत्स्यपालन, प्रक्रिया उद्योग याकरिता तांत्रिक मार्गदर्शन करण्याचे प्रयत्न शासन या योजनेद्वारे करत आहे. स्वयंसहायता गटातील समान उत्पादन घेणाऱ्या पिकांवर आधारित १५ ते ४० महिलांचे उत्पादक गट तयार करणे, महिलांना प्रशिक्षण देणे, एकत्रित कृषी विषयक निविष्ठा खरेदी करण्याबाबत मार्गदर्शन आणि अंमलबजावणी करणे, उत्पादनाचा खर्च कमी करणे, तसेच उत्पादित केलेल्या शेतमालाची विक्री एकत्रित केल्यामुळे मध्यस्थांची भूमिका कमी करणे यामुळे शेतकरी महिलांना थेट लाभ झाला आहे. यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता पूर्ण करण्याचे कार्य उमेदच्या मदतीने स्वयंसहायता गटाच्या महिला कार्यक्षमपणे करतात. उमेद अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये महिला शेतकऱ्यांच्या ७३ उत्पादक कंपन्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

**स्वयंसहायता गटांद्वारे निर्मित वस्तूंच्या वितरणाकरिता ऑनलाइन कंपन्यांसोबत करार**

उमेद अभियानाअंतर्गत सहभागी झालेल्या सर्व ग्रामीण भागातील महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी त्यांना किमान वार्षिक उत्पन्न १ लाख रुपये एवढे करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्र राज्यात ग्रामीण महिलांचे कृषी आधारित सुमारे ३१ लाख ४८ हजार ९५० महिलांचे व्यवसाय सुरू आहेत. २०२२-२३ या आर्थिक वर्षाला या अभियानातील महिलांच्या उपजीविकेत वृद्धी करण्यासाठी व त्यांना आत्मनिर्भर आणि सक्षम होण्याच्या उद्देशाने **'उपजीविका वर्ष'** घोषित करण्यात आलेले आहे. या अभियानाद्वारे महिलांना व्यवसाय प्रशिक्षण, कौशल्य प्रशिक्षण तसेच पतपुरवठ्याचे सहाय्य करण्यात आले आहे. या अभियानात सहभागी झालेल्या ग्रामीण महिलांना उत्पादित केलेले पदार्थ आणि वस्तू ऑनलाइन रित्या विकता यावेत याकरिता **ॲमेझॉन आणि फ्लिपकार्ट** या ऑनलाईन कंपन्यांसोबत

करार करण्यात आला आहे. सद्यस्थितीत या दोन्ही पोर्टलवर वस्तू देखील उपलब्ध आहे. हीच आवश्यकता ओळखून राज्य सरकारने स्वतःचे पोर्टल विकसित करण्याचे कार्य सुरू केले आहे. यामध्ये जगभरातील ग्राहकांना स्वयंसहायता गटांनी तयार केलेल्या वस्तू व पदार्थांची खरेदी करण्याची संधी उपलब्ध केली जाणार आहे. या सर्व प्रयत्नांतूनच येणाऱ्या काळात महाराष्ट्राच्या ग्रामीण महिलांचे दारिद्र्य दूर होऊन त्या आत्मनिर्भर बनण्यास नक्कीच मदत होणार आहे.

**'उमेद' अभियानाचा लाभ**

'उमेद' अर्थात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची राज्यात १५ जिल्ह्यात आणि १३४ तालुक्यात इंटेन्सिव्ह पद्धतीने तर उर्वरित तालुक्यात सेमी व नॉन इंटेन्सिव्ह पद्धतीने अंमलबजावणी होताना दिसून येत आहे. महाराष्ट्र राज्यात अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी समुदाय संसाधन व्यक्तींची एक भक्कम संघटना गाव पातळीपर्यंत उभी केली आहे. समुदाय संसाधन व्यक्तींमार्फत गरीब कुटुंबांची नेमकी ओळख करून त्यांना स्वयंसहायता गटात समाविष्ट करण्याचे मोलाचे योगदान या अभियानाअंतर्गत केले जात आहे. समुदाय संसाधन व्यक्ती या स्थानिक स्त्रिया असून त्या समुदाय संस्थांचा एक भाग म्हणून काम करतात. या अभियानांतर्गत ४ लाख ७७ हजार स्वयंसहायता समूह अंतर्गत जवळजवळ ५० लाख कुटुंब स्वावलंबी बनलेली आहेत.

**या योजनेअंतर्गत लाभार्थी संख्या**

- स्वयंसहायता गटांची स्थापना – ५८९३५०
- गटांमध्ये समावेश केलेल्या कुटुंबांची संख्या – ५९१५४९०
- ग्राम संघाची स्थापना – ३०३९१
- प्रभाग संघांची स्थापना – १७६७
- उत्पादक गट संख्या – १३८५१
- शेतकरी महिला उत्पादक कंपनी - ७३

**समारोप**

महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाशिवाय राष्ट्राचा विकास होणार नाही हे निश्चित आहे. शिक्षित आणि अशिक्षित महिलांमध्ये शिक्षित महिलांना रोजगार उपलब्ध करून देणे आणि अशिक्षित महिलांना कौशल्यपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमांच्या द्वारे आत्मनिर्भर बनविणे, त्यांच्यातील उद्योग क्षमतेला प्रोत्साहन देणे, अर्थ पुरस्कर योजना राबविणे, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे यासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील आहे. तरीदेखील महिलांचा पाहिजे तसा विकास अजूनही झालेला दिसून येत नाही. जास्तीत जास्त महिलांपर्यंत विविध शासकीय अभियान, शासनाच्या महिलांसाठी असलेल्या योजना यासंदर्भात सामाजिक दृष्टिकोनातून एक चांगले पाऊल उचलणे अत्यंत गरजेचे आहे. यातूनच महिला सक्षम होऊन स्वतःच्या विकासाबरोबरच कुटुंबाचाही विकास घडवून आणू शकतात. आणि त्यातूनच भक्कम अशी अर्थव्यवस्था निर्मित होऊ शकते.

**संदर्भसूची**

1. डॉ. आढव विलास, महिला सबलीकरण, प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार विभाग पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७, आवृत्ती २०१०.
2. योजना मासिक, महिला सक्षमीकरण , अंक ३, ऑक्टोंबर २०१८.
3. https://www.umed.in
4. https://rdd.maharashtra.gov.in
5. https://mr.vikaspedia.in
6. https://krushisahayak.com
7. https://divyamarathi.bhaskar.com

ISSN : 2278-9308
February 2024

# महिलांच्या समस्या आणि आव्हाने

डॉ. प्रा. संतोष मेंढेकर
समाज ाास्त्र, विभाग प्रमुख, रेणूका कॉलेज, बेसा, नागपूर ,मो.नं. 9860015025, 8788968622
E-mail: santoshmendhekar@gail.com

सरां ा

प्राचीन संस्कृतीत स्त्रीला आदिशक्ती, मानले जात होते. मानवी जीवनाचे सातत्य राखणारी स्त्री ही पृथ्वीप्रमाणे सहनशील आणि नदीप्रमाणे सौम्य वाटत होती. समाजाने तिला सर्वसाधारण समजून तिचा गौरव केला. पण हळुहळू काळ पलटला, पुरुष सत्ताधारक बनल्यामुळे हिंसक आणि आक्रमक बनला. स्वतः स्वामी होवून त्याने तिला गुलाम केले. चातुर्वण्य सारख्या अनर्थकारी समाजरचना पद्धतीमुळे स्त्रीचे स्थान फार रसातळाला गेले.

डॉ. बाबासाहेव आवेडकरांचे विचार आणि कार्य या देशातील भाुद्र आणि अति ाुद्र आणि स्त्रीयांच्या चळवळीसाठी सदैव प्रेरणादायी आहेत त्यांचे विचार भारतीय विषमता प्रेरीत समाज व्यवस्थेची पुर्नरचना करणे आहे. स्त्रीयाच्या बाबतीत त्यांनी मांडलेले विचार आणि हिंदू कोडबिलातील त्यानी सूचविलेल्या तरतूदी यातून त्याचा स्त्रीविषयक दृष्टीकोन स्पष्ट होता महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्रीयांच्या नवजीवन बाधणीचा पहिला प्रयोग सुरु केला पण डॉ. बाबासाहेब आबेडकर यांनी त्याच्याच प्रमाणे स्त्रीयांचे प्रश्न सामाजिक पुर्नरचनेसाठी आवश्यक समजून उचलूनधरले, स्त्रीयांनी मुलांना शिक्षण देण्याचा आग्रह धरावा, गुलामगिरीचे प्रदर्शन करणाऱ्या दागिन्याला फेकून द्यावे. स्त्रियाना निर्भयतेने जगण्यास शिकले पाहिजे मुलींना आपला नवरा निवडण्याचा अधिकार असावा. डॉ. बाबासाहेब आबेडकर यांनी घटनेच्या माध्यमातून स्त्रियाना जे अधिकार दिले त्यामुळेच विसाव्या शतकाच्या उतरार्धात स्त्रियाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात विविध प्रकारच्या समस्या आणि आव्हानाला समोरे जावे लागले. त्यावरच प्रका ा टाकण्याचा सं ाोधकाने प्रयत्न केला आहे.

बीज भाब्द : हिंसाचार, अत्याचार, अन्याय, पीडीत, अबला.

## प्रस्तावना

भारतीय समाजामध्ये महिलांच्या सामाजिक दर्जा संबंधी कमालीचा विरोधाभास आढळतो. एका बाजूला स्त्रियांचे धर्मदिष्ट गौरवीकरण व दुसऱ्या बाजूला समाजात असलेले टोकाचे दुय्यम स्थान व शोषण असा विरोधाभास दिसून येतो. भारतीय समाजामध्ये काही जाती जमातींमध्ये महिलांना मानाचे स्थान मिळाले आहे. परंतु आजही भारतीय समाज हा पुरुषप्रधान समाजच आहे, यामुळे स्त्रियांचे स्थान हे कायमस्वरूपी दुय्यम असल्याचे दिसून येते, भारतीय समाजात असणाऱ्या अनेक रुढी, प्रथा, परंपरा अन्याय यांचा परिणाम स्त्रियांवर झालेला असून स्त्रियांना प्राचीन काळापासून सार्वजनिक जीवनात मानाचे स्थान नाकारलेले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर स्त्रियांचे मोठ्या प्रमाणात शोषण झालेले आहे त्याचप्रमाणे आपले अधिकार न्याय मिळवण्यासाठी स्त्रियांना अनेक चळवळी कराव्या लागल्या आहेत. या चळवळीतून अनेक संघटना उदयास आल्या आणि संघटनांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे यामुळे स्त्रियांना त्यांचे एक अधिकार मिळाले आहे. पुरुषांच्या बरोबर दर्जा मिळाला आहे, स्त्रियांच्या बाबतीत ही सकारात्मक बाजू जरी दिसून आली आहेत. आज भारताला स्वातंत्र मिळून 75 वर्षे पूर्ण झालेली आहे. तरीही भारतीय समाजामध्ये स्त्रियांवरील अत्याचार, अन्याय, भाोषण आणि असमानतेची भावना कमी झालेली दिसत नाही. भारतीय समाजामध्ये स्त्री शिक्षण घेऊन नोकरी करु लागली आहे. तरी तिला पदोपदी आपले अधिकार मिळवण्यासाठी शोषणापासून आपला बचाव करण्यासाठी झगडावेचलागत आहे.

भारतीय समाजामध्ये स्त्रियांचा दर्जा हा दुय्यम असल्याचेच दिसून येते, स्त्रियांचा दर्जा, जातिभेद, लिंगभेद, वर्णभेद त्यानुसार नि चत होत असतो. स्त्री ही कोणत्याही जाती जमातीतील असली तरी तिला मिळणारा दर्जा हा दुय्यमच असतो. जातीच्या श्रेणी रचनेनुसार प्रत्येक जातीला जातिव्यवस्थेत मिळणारा दर्जा वेगळा होता, त्यामुळे कनिश्ट जातीतील स्त्रिया यांचा दर्जा हा कनिष्ठ आणि त्याहून दुय्यम स्वरुपाचा होता.

## महिलांच्या समस्या अध्ययनाचे महत्वः

भारतीय समाज व्यवस्थेत महिलांना असणारे दुय्यम स्थान, त्याचप्रमाणे स्त्रियांना भेडसावणाऱ्या समस्या कशाजाणून घेता येतील? त्यावर उपाय योजना कशा प्रमाणे करता येतील? त्यांचे निराकरण

करण्याच्या दृष्टीने कोणते उपाय करता येतील या सर्व बाबीचा अनेकविध अंगाने अभ्यास करणे हा या अध्ययनाचा प्रमुख उद्देश आहे.

महिलांच्या सामाजिक तथा आर्थिक समस्यांचा अभ्यास व त्यातून येणारे संभाव्य निष्कर्ष यातून स्त्रियांच्या सामाजिक,आर्थिक, शैक्षणिक व राजकीय जीवनाचे विविध पैलू समजून घेण्यास मदत होते

स्त्रियांचे कौटुंबिक जीवन, त्यांच्या गरजा त्यांना समाजात प्राप्त होणारे वागणूक त्यांचा समाजात आणि कुटुंबात असणारा सामाजिक दर्जा याची विविध प्रसंगानुसार बदलणारी भूमिका या सर्व बाबींचा अभ्यास करून महिलांच्या समस्या व त्यांच्या पुढे असणारे आव्हाने यांचा अभ्यास या संशोधन लेखातून केला जाणार आहे.

अध्ययनाची उद्दिष्टे :

१) महिलांपुढे असणाऱ्या सामाजिक आर्थिक सांस्कृतिक व धार्मिक समस्यांचा अभ्यास करणे,

२) स्त्रियांचे प्रश्न व समस्या स्पष्ट करून स्त्रियांपुढे असणारे आव्हाने याबाबत अभ्यास करणे,

३) स्त्रियांचे प्र न व समस्याबाबत अभ्यास त्याबाबत उपाययोजना सुचविणे.

गृहितके :

१) स्त्रियांना त्यांचा समाजात असणारा दुय्यम दर्जा यामुळे अनेक सामाजिक, आर्थिक, समस्यांना तसेच सांस्कृतिकराजकीय समस्यांना सामोरे जावे लागते,

२) समाजात वावरताना त्यांच्या भूमिका निभावताना समाजातून मिळणारी वागणूक हि पुरुषांच्या तुलनेचे दुय्यम स्वरुपाची आहे.

सं ोधन आराखडा :

संशोधन आराखड्याच्या वापराने कोणत्याही संशोधन कार्यासव्यवस्थीतपणा येतो. म्हणून कोणत्याही सं ोधनात संशोधन कार्य प्रारंभ करण्यापूर्वी संशोधनाचा आराखडा तयार करावा लागतो. त्यात संसोधनाचे उद्देश, अध्ययन क्षेत्र, कालावधी, नमुना निवळ इत्यादी विषयांची माहिती मिळते. म्हणून कोणत्याही संशोधनाला सुरवात करण्यापूर्वी संशोधन आराखडा तयार करणे अत्यंत महत्वाचे असते. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक आराखड्याचा वापर केलेला आहे.

प्रस्तुत संशोधन लेख लिहिण्यासाठी १) प्राथमिक स्त्रोत – यामध्ये प्र नावली मुलाखत अनुसूची निरीक्षण आणि सर्वेक्षण याचा वापर केला आहे. २) द्वितीय स्त्रोत – यामध्ये संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, वर्तमानपत्र, मासिके, प्रकाशित– अप्रकाशित ग्रंथ आणि इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर केलेला आहे.

महिलांना समाजात वावरताना पुढील समस्यांना सामोरे जावे लागते.

१) सामाजिक समस्याःभारतीय समाज व्यवस्थेमध्ये आजही पुरुसत्ताक संस्कृती असल्याने स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. आजही स्त्रियांना त्यांच्या स्वातंत्र्यावर सामाजिक रुढी, प्रथा, परंपरा, धर्म व्यवस्था यांचा पगडाअसल्याचे दिसून येते. स्त्रियांना चार भिंतीच्या ती नजर कैद करण्यात आलेली आहे.

२) स्त्री भृणहत्या : हूंडाह्या प्रचलित पद्धतीचा परिणाम म्हणजे स्त्रीभृणहत्या होय. मुलगी जन्माला आली म्हणजे मुलीच्या विवाह साठी भविष्यात हुंड्याची तरतूद करावी लागते. त्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च येईल त्यामुळे त्या मुलीचा जन्म होण्याआधीच तीची गर्भामध्ये हत्या केली जाते. मुलगा वंशाला दिवा असून मुलगा हा वृद्धपकाळातील आधार असतो तर मुलगी ही दुसत्याच्या घरचा वंश वाढवणारीअसते. अ ी देखील अनिष्ट धारणा भारतीय समाजामध्ये आजही दिसून येते. याचा परिणाम म्हणजे आजही गर्भात स्त्रीभृणहत्या केली जाते.

३) कौटुंबिक हिंसाचारात वाढ : पूर्वीपासून भारतीय समाजामध्ये हुंडा पद्धती मोठया प्रमाणे प्रचलित झाली आहे. याचा परिणाम बघता हुंडयाच्या स्वरुपात रक्कम न दिल्यास नववधूला मोठ्या प्रमाणात शारीरिक आणि मानसिक अत्याचाराला सामोरे जावे लागते, वधूच्या कुटुंबाकडे त्यांच्या मुलीच्या संरक्षणासाठी मोठ्या प्रमाणात हुंडा मागितला जातो. भारतीय समाजात आजही मोठ्या प्रमाणात हुंडाबडी सारखी समस्या आहे. महिलांवरील शारीरिक व मानसिक अत्याचारात वाढझालेली दिसून येते. हुंडाबळीसारख्या घटनांनमध्ये तरुणीची हत्या करणे, मारहाण करणे यासारखे गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्याचा यात समावेश होती.

४) वैवाहिक जीवनः काळाच्या ओघात या प्रत्येक क्षेत्रामध्ये आपले अस्तीत्व प्रस्तापित करत आहे. जबाबदारी पार पाडताना स्त्रिया पुरुषाच्या बरोबरीने समाजामध्ये वावरत आहे. स्त्रिया सक्षमीकरणाच्या वाटेवर जात असताना त्यांना घरातील कौटुंबिक जबाबदाऱ्या देखील पार पाडाव्या लागत आहे. परंतु या जबाबदारी पार

ISSN : 2278-9308
February 2024

पाडत असताना त्याचे य ा समाजामध्ये सं ाय बळावतो व त्यातून घरामध्ये विविध प्रकारचा कलह निर्माण होऊन त्यातून महिलांना शारीरिक व मानसिक समस्याने सामोरे जावे लागते

५) शारीरिक व मानसिक समस्या : भारतीय समाजामध्ये पुरुशसत्ताक संस्कृती असल्याने कुटुंबामध्ये पुरुशाचेच वर्चस्व प्रस्थपित होते. असे असताना अनेक कुटुंबातील पुरुषही व्यसनाच्या आहारी गेलेले असतात. परंतु याचा कुटुंबामध्ये कोणीही जाब न विचारता याउलट पुरषामध्ये असणारे व्यासनधीनता यास घरातील स्त्रियांनाच कारणीभूत ठरले ठरवले जाते. यातून व्यसनामुळे कुटुंब उध्वस्त होतो. याचा परिणाम म्हणजे कुटुंबाजील स्त्रीला मानसीक व भारीरिक त्रासाला सामोरे जावे लागते. त्यांना कुटुंबाच्या जवाबदाऱ्या एका हाताने स्वीकाऱ्याव्या लागतात. कुटुंबामध्ये निर्माण झालेल्या कौंटुंबिक समस्यांसाठी स्त्रियांना जवाबदार धरले जाते. पुरुशांना कोणतेही प्रकारचा दोश देण्यात येत आहे.

६) अपत्य न होणे : भारतीय समाजामध्ये एखाद्या स्त्रिला मुलगा होत नसेल तर त्यासाठी स्त्रिलाच जवाबदार धरले जाते. पती– पत्नी यांच्यापैकी कोणामध्ये दोष आहे, हे लक्षात न घेता सर्व कलंक हा स्त्रियांनाच लावला जातो. समाजाकडून अशा स्त्रियांना वांझ म्हणून त्यांना समाजामध्ये हिनतेची वागणूक दिली जाते. याचा परिणाम बघता अशा स्त्रियांना कुटुंबाकडूनच शारीरिक मानसिक जाचाला सामोरे जावे लागते.

७) आरोग्यविषयक समस्याःभारताला स्वातंत्र्याला 75 वर्ष पूर्ण झालेली आहे. भारतामध्ये आधुनिकतेचे वारे हे मोठ्या प्रमाणात वाहत आहे. तरी आजही ग्रामीण भागामध्ये स्त्रियांमध्ये आरोग्यविषयक जागृतीचा निर्माण झालेली नाही. ग्रामीण भागातील स्त्री आपल्या आरोग्याच्या बाबतीत निष्काळजी असतात, आपल्या आरोग्य विषय प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याने त्याचा परिणाम आपल्या होणाऱ्या अपत्यावर होत असतो, त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये आरोग्याबाबत अज्ञान असल्याने त्यांना कुपोषण, अस्वच्छता यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. यातून त्यांच्यामध्ये आरोग्यविषयक सुविधांबाबत असणारे समज गैरसमज, अज्ञात दिसून येते. यातून त्यांच्यात मानसिक ताणतणाव निर्माण होतो. त्याचप्रमाणे याचा परिणाम बघता ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये रक्ताची कमतरता, कॅल्शियम, व्हिटॅमिन यांची कमतरता निर्माण होते व त्यांच्यात आरोग्य विषयक अनेक समस्या निर्माण होतात.

उपाय योजनाः

१) स्त्रियांमध्ये सामाजिक जागरूकता निर्माण करणे,

२) स्त्रियांमध्ये राजकीय नेतृत्वास चालना देणे.

३) स्त्रियांना पुरेशा प्रमाणात आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून देणे, व आरोग्य विषयक असणाऱ्या साधनांबद्दल त्यांच्यात असणारे समज गैरसमज या बाबत त्यांच्यात प्रबोधन करावे,

४)स्त्रियांना पुरुष सत्ता समाजामध्ये अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, त्याचप्रमाणे स्त्रियांना दारिद्रयामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. दारिद्रयाचा परिणाम मध्ये शिक्षणाचे प्रमाण, शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा ही आहे.

५) कौटुंबिक हिंसाचारातून महिलांची सुटका व्हावी यासाठी महिलांचे संरक्षण अधिनियम 2005 हा कायदा 26 ऑक्टोबर 2006 पासून लागू करण्यात आला आहे. या कायद्याबाबत महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण करणे.

महिलांसाठी कार्य करणाऱ्या विविध महिला संघटनांची माहिती महिलांना करुन देणे, जर एखादा महिलेवर अन्याय होत असेल तर या महिला संघटनेद्वारे आपल्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत याबाबत दाद मागण्याची जाणीव महिलांमध्ये निर्माण करणे, या महिला संघटना कशाप्रकारे महिलांसाठी कार्य करतात, याबाबत महिलांमध्ये जागृतता निर्माण करणे,

६)शासनाने हुंडा प्रतिबंधक कायदा तयार केला आहे. हा कायदा संमत केल्यानंतर हुंडा घेणे आणि देणे हे कायद्याने गुन्हा असणे याबाबत महिलांमध्ये जागृती निर्माण करणे व हुंडादेण्यास किंवा घेण्यास प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तीना पाच वर्ष कैद व 25 हजार रुपये दंडाची शिक्षा होऊ शकते. याबाबत महिलांमध्ये जागृती निर्माण करणे,

७)महिलांमध्ये स्त्री–पुरुष समानता बाबाबत जागृतता निर्माण करणे, त्याचप्रमाणे मुलींचे शिक्षणात होणारे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी जी पुरुष भेदभाव न करता शिक्षण प्रवाहात स्त्री व पुरुष या दोघांना समान संधी देणे,

८)स्त्रियांमध्ये कुटुंबाचे अर्थार्जन करण्यासाठी त्याचप्रमाणे त्यांचे आर्थिक समस्यांवर उपाययोजना म्हणून स्त्रियांना उच्च शिक्षणात व नोकरीत मोठ्या प्रमाणात संधी निर्माण करून देणे.

९)महिलांमध्ये आरोग्याच्या संदर्भात जाणीव निर्माण करून देणे, यासाठी महिलांमध्ये साक्षरता वाढवणे गरजेचे आहे. कारण साक्षर झालेल्या महिला आपल्या आरोग्य बाबत जागृत होतील,
१०)पुरुषांचे व्यसनाधीनतेचा त्रास हा महिलांना मोठ्या प्रमाणात होत असतो. हा त्रास होऊ नये यासाठी शासनाने विविध कायदे तयार करून व्यसनमुक्ती सारखे कडक कायदे समाजामध्ये निर्माण करून या कायद्यांची अंमलबजावणी ही कठोररित्या झाली पाहिजे.
११)हुंडा पद्धती कशाप्रकारे चुकीची आहे हे महिलांना समजून देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे याचा परिणाम बघता हुंडा पद्धती विषयी समाजात असणारी मानसिकता बदलण्यास स्त्रिया मोठ्या प्रमाणात सहभाग घेतील असे नियोजन करणे,

सारांश : सारांशरूपाने महिलांमध्ये असणाऱ्या समस्या व उपाययोजना यावर या शोधनिबंधा द्वारे प्रकाश टाकण्यात आलेला आहे. शहरी भागात व ग्रामीण भागात असणाऱ्या महिलांच्या समस्या जरी थोडयाफार प्रमाणात वेगळ्या असल्या तरी पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांना दुय्यम स्थान देण्यात आल्याने कुठेतरी त्यांच्या समस्यांमध्ये साम्यता दिसून येते. यामध्ये सामाजिक समस्या, स्त्री भूणहत्या, कौटुंबिक हिंसाचारात वाढ, वैवाहिक जीवन, शारीरिक व मानसिक समस्या, अपत्य न होणे, आरोग्यविषयक समस्या यासारख्या गंभीर स्वरूपाच्या समस्या दिसून येतात. या गंभीर स्वरूपाच्या समस्यांचे उच्चाटन करण्यासाठी समाजाचा एक जबाबदार नागरिक म्हणून उपाययोजनांची अमलबजावणी केली पाहिजे.

संदर्भग्रथसूची

१) देशपांडे लिमये आणि मानकर, (२००१) उदयोजकतेची मुलतत्वे, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
२) देशमुख प्रभाकर (२००८), उद्योजकता विकास संकल्पना आणि व्यवहार, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
३) Ministry Of Statistics And Implementation Program & 6th Economic censes` –2014.
४) महिला उद्योजकांची मास्टर कार्ड इंडेक्स – २०१८
५) सब्रिना कोररेचक –The Indian startup ecosystem: drivers] challenges] and pillars of supports-
६) रिषभ मन्सुर– एमएसएमई निधी – भारतामधील महिला उद्योजकासाठीची ९ वी योजना
७) जागतिक बँकेचा उद्योग सर्वे :– मालकी व्यवसाय असलेल्या संस्था मधील महिला सहभाग – २०१४
८) जागतिक आर्थिक मंच – जागतिक लिंगभेद अहवाल २०१८
९) सांगळे शैलजा, (२०१८), महाराष्ट्रातील महिला उद्योजक – डायमंड पब्लीकेशन्स, २०१६
१०) www-yourarticlelibrary-com
११)डॉ. वा. धो काचोळे २००५ ''भारतीय समाज प्रश्न आणि समस्या'' विद्या बुक पब्लिकेशनऔरंगाबाद
१२)Rani Jethmalani& P.K. Dey (1995). Dowry Deaths and Access to Justice in Kall's Yug
१३)Empowerment, Law and Dowry Deaths.
१४)India, The Dowry Prohibition Act 1961: 28 of 1961, Ministry of Law, Universal LawPublishing, 1961.

# पचोरा तालुक्यातील जिनिंग व प्रेसिंग कामगारांचा शैक्षणिक स्तर व आर्थिक विकास

**डॉ.मानसिंग हरचंदसिंग राजपूत**
सहाय्यक.प्राध्यापक
भूगोल विभाग
सौ.र.ना.दे.कला,वाणिज्य व
भडगांव ता.भडगांव जि.जळगांव

**डॉ.देवेंद्र अनंतरामजी मस्की**
सहयोगी प्राध्यापक
भूगोल विभाग
सौ.र.ना.दे.कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

**प्रस्तावना:—**

जळगाव जिल्हा हा कापुस उत्पादक जिल्हा मानला जातो जिल्हा याच्या बहुतांश तालुक्यात प्रमुख नकदी पिक म्हणून कापुस उत्पादनास प्राधान्य दिले जाते. परिणामी त्यावरील प्रक्रिया उदयोगाची निर्मिती देखील मोठयाप्रमाणात झालेली दिसते सदर संशोधन कार्य हेतुने जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्याचा विचार करण्यात आला आहे.कापसावरील प्रक्रिया उदयोग म्हणजे जिनिंग व प्रेसिंग होय. हे कार्य शारीरिक कष्टाचे मानले जात. यात कार्यरत कामगांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर चालतो. परंतु त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते त्यात कामातील अनियमितता, आर्थिक समस्या व शैक्षणिक पात्रता नसल्याने जाणवणाऱ्या समस्या अशा सर्व घटकांचा उहापोह करण्यासाठी संशोधकाने जिनिंग प्रेसिंग व्यवसायातील कार्यरत कामगांचा अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे

**उद्दीष्ठे:—**

१)पाचोरा तालुक्यातील जिनिंग प्रेसिंग व्यवसायाचा अभ्यास करणे.
२)पाचोरा तालुक्यातील जिनिंग प्रेसिंग व्यवसायात कार्यरत कामगारांचा शैक्षणिक स्तर तपासणे .
३)पाचोरा तालुक्यातील जिनिंग प्रेसिंग व्यवसायात कार्यरत कामगारांच्या समस्यांचा शोध घेणे.
४)पाचोरा तालुक्यातील जिनिंग प्रेसिंग व्यवसायातील कार्यरत कामगांचा वयोगट तपासणे.
५)पाचोरा तालुक्यातील जिनिंग प्रेसिंग व्यवसायातील स्त्री कामगारांचे प्रमाण तपासणे.

**गृहतिक:—**

पाचोरा तालुक्यातील जिनिंग प्रेसिंग कामगारांच्या शैक्षणिक स्तरानुसार त्यांचा आर्थिक विकास यांचा सबंध आहे.

**अभ्यास क्षेत्र:—**

सदर संशोधन अभ्यासाचे कार्यक्षेत्र म्हणून उत्तर महाराष्ट्रतील एक जळगाव जिल्हा व त्यातील प्रमुख कापुस उत्पादक तालुका पाचोरा विचारात घेतला असून पाचोरा तालुक्यात वर्तमानस्थिती मध्ये ०३ जिनिंग प्रेसिंग कार्यरत असुन त्या शहरापासुन १० कि.मी अंतरांच्या आत कार्यरत आहेत. पाचोरा तालुल्यात भौतीक व वाहतुक सुविधा,रेल्वे वाहतुक सुविधा सुसज्ज अशा परिस्थीतीत असल्याने सदर कार्यासाठी पाचोरा तालुक्यास अभ्यास क्षेत्र म्हणून निवडण्यात आले आहे.

**संशोधन पध्दती:—**

सदर कार्यासाठी आधार सामग्री, तथ्य संकलन या सोबत प्राथमिक व व्दितीय स्त्रोतांच्या आधारे माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात प्राथमिक स्त्रोत म्हणुन प्रश्नावली व प्रत्यक्ष मुलाखती मधुन माहिती गोळा करुन तिचे विश्लेषण करण्यात आले आहे.

तसेच दुय्यम स्त्रोत मध्ये जिनिंग प्रेसिंग चावार्षीक अहवाल तालुक्यातील उत्पन्न प्रमाण आकडेवारी च्या आधारावर माहीती गोळा करून सदर माहीतीची टक्केवारी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तक्ते व सारणी माहिती दर्शविण्यात आली आहे.

**कामगार प्रश्नावली विश्लेषण:—**

जिनिंग प्रेसिंग व्यवसायात कापसातून सरकी काढणारे, कवडी बाजुला करणारे, प्रेसिंगचे कार्य करणारे, गठन सेट करणारे असे मजुर मुख्य स्वरूपाचे कार्य करत असतात अशा कामगांराकडून प्रश्नावलीभरुन घेण्यात आली व महिती गोळा करून तिचे खालील प्रमाणे विश्लेषण करण्यात आले आहे.

**सारणी क्र १.१कामगारांचा शैक्षणिकस्तर व आर्थिकस्तर**

| अ.क्र | शैक्षणिकस्तर | संख्या | | शेकडेवारी % | | मासिकउत्पन्न | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष |
| १ | निरक्षर गट | ०८ | ०५ | २८.५८ | ४.०९ | ७५०० | १०.५०० |
| २ | प्राथमिक | १३ | ५६ | ४६.४२ | ४५.९१ | ७५०० | १०.५०० |
| ३ | माध्यमिक व उच्च माध्यमिक | ०७ | ४५ | २५.०० | ३६.८९ | ७५०० | १०.५०० |
| ४ | उच्च शिक्षण | ०० | १६ | ००.०० | १३.११ | –– | १५.०० |
| | एकूण | २८ | १२२ | १०० | १०० | | |

**संदर्भ**:—मुलाखत व प्रश्नावली

**विश्लेषण**:—वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, निरक्षर कामगारांमध्ये स्त्री कामगार निरक्षरतेची शेकडेवारी २८.५८% असून पुरूष कामगाराची शेकडेवारी ४.०९% असुन प्राथमिक शिक्षण पुर्ण करणारे स्त्री कामगारांचे प्रमाण ४६.४२% इतके आहे तर पुरूष कामगारांचे प्रमाण ४६.४२% इतके आहे तर पुरूष कामगारांचे प्रमाण ४५.९१ % इतके आहे. तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा टप्पा गाठणारे स्त्री कामगार २५.००% आहे तर पुरूष ३६.८९% इतके आहे तसेच उच्च शिक्षण पूर्ण करणारे जिनिंग प्रेसिंग व्यवसायात स्त्री कामगारचे ०% प्रमाण आढळले या तुलनेत पुरूषांचे प्रमाण देखील कमी म्हणजे १३.११% इतके निदर्शनास आले.

**निरिक्षण**:— १)निरक्षर गटात स्त्री कामगांराचे प्रमाण अधिक आहे.
२)प्राथमिक शिक्षण पुर्ण करणारे स्त्री पुरुष कामगारांचे प्रमाण जवळपास समान आहे.
३) जिनिंग प्रेसिंग व्यवसायात उच्च शिक्षित कामगारामध्ये महिलांचा समावेश नाही

**सारणी क्र. १.२ कामगारांच्या समस्या**

| **अ.क्र** | **समस्या** | **संख्या** | **शेकडेवारी** |
|---|---|---|---|
| १ | वाहतुकसमस्या | २० | १३.३३% |
| २ | वेतनसमस्या | ३८ | २५.३३% |
| ३ | रोजगारसातत्य | ८१ | ५४.००% |
| ४ | कौटुंबिकसमस्या | ११ | ०७.३४% |
| | **एकुण** | **१५०** | **१००%** |

**संदर्भ** :—मुलाखत व प्रश्नावली

**विश्लेषण** :—

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की कामाच्या ठीकाणापर्यंतच्या प्रवासाठीच्या वाहतूक समस्येला सामोरे जाणारे कामगारांचे प्रमाण १३.३३% इतके आहेत वेतन विषयक समस्या महत्वाची मानणारे कामगारांचे प्रमाण २५.३३% आहे तसेच जिनिंग प्रेसिंग क्षेत्रातील रोजगारात सातत्याची समस्या भेडसावणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिक ५४.००% इतके आहे. तर कौटुंबिक व इतर समस्या जाणवणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ०७.३४ % इतके आहे

**निरिक्षण** :—

१)जिनिंग प्रेसिंग क्षेत्रातील कामगारांच्या दृष्टीने या क्षेत्रात कामात सातत्य नसल्याची समस्या मोठी आहे.

२)या क्षेत्रातील कार्यरत मजुरांना आर्थिक समस्या देखील मोठया प्रमाणात भेडसावताना जाणवली.

**सारणी क्र.१.३ स्त्री कामगारांचे प्रमाण**

| अ.क्र | स्त्री पुरुषप्रमाण | संख्या | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | स्त्री | ४१ | २७.३३% |
| २ | पुरूष | १०९ | ७२.६७% |
| | एकुण | १५० | १००% |

**संदर्भ** :— प्रश्नावली

**विश्लेषण** :—

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, जिनिंग प्रेसिंग व्यवसायत संपुर्ण कामगारांच्या संख्येपैकी स्त्री कामगारांचे शेकडा प्रमाण केवळ २७.३३% इतके असुन पुरूष कामगारांचे प्रमाण हे ७२.६७% इतके आहे.

**निरिक्षण** :—

१)जिनिंग प्रेसिंग व्यवसायात स्त्री कामगारांचे प्रमाण कमी आहे.

**सारणी क्र १.४ वयोगट दर्शक**

| अ.क्र | वयोगट | संख्या | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | २० पेक्षा कमी | २८ | १८.६६% |
| २ | २० ते ४० वयोगट | ६१ | ४०.६७% |
| ३ | ४० ते६० वयोगट | ५२ | ३४.६७% |
| ४ | ६०पेक्षा कमी | ०९ | ०६.००% |
| | एकुण | १५० | १००% |

**संदर्भ** :—प्रश्नावली

**विश्लेषण** :—

वरील सारणी वरून वयोगट २० पेक्षा कमी असणाऱ्या कामगारांचे शेकडा प्रमाण १८.६६% आहे तर २० ते ४० वयोगटचे प्रमाण सर्वाधिक ४०.६७% असुन ४० ते६० वयोगटातील कार्यरतकामगांराचेप्रमाण ३४.६७%आहेतर ६०च्या वरीलकामगारांचेप्रमाण ०६.००%इतकेआहे.

**निरिक्षण**:— १)२० ते ४० वयोगटाचे कामगारांच प्रमाण सर्वाधिक आहे.

२)६० च्या वरील वयोगट म्हणजे ज्यांना वरिष्ठ नागरिक म्हणुन आळखले जाते ते देखील परिस्थिती अभावी या क्षेत्रात कार्यरत आहे.

३)या क्षेत्रात तरूण वयोगटाला कार्यसंधीचे प्रमाण अधिक आहे.

**निष्कर्ष**:—

१) जिनिंग प्रेसिंग व्यवसायात कार्यरत कामगारांपैकी प्राथमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्याचे प्रमाण अधिक आहे.

२) या व्यवसायात शैक्षणिक पात्रतेला फारसे महत्व नाही, परंतु शैक्षणिक स्तराचा आर्थिक उत्पनावर प्रत्यक्ष परिणाम होतो.

३) जिनिंग प्रेसिंग व्यवसायात कामगारांना रोजगारात सातत्य नाही ही त्यांच्या दृष्टी नेत्यांना भेडसावणारी मोठी समस्या आहे.

४)या क्षेत्रात स्त्री कामगार संख्या फार कमी असुन त्यांना या क्षेत्रात व्यावसायीक विकासास संधी कमी आहे.

५)या व्यवसायात कार्यरत कामगार तरूण वयोगटाचे अधिक प्रमाणात आहे.

६)काही प्रमाणात का होईना परंतु जेष्ठ नागरिक या व्यवसायात कार्यरत असल्याचे दिसते.

**शिफारशी :—**

१) जिनिंग प्रेसिंग व्यवसायात सातत्यता येण्यासाठी शासनास्तरावर उपाय योजना कराव्यात.
२) कामगारांच्या अनुभवासोबत शैक्षणिक पात्रतेलाही महत्व दिले जावे.
३) कामगारांचा आर्थिक स्तर सुधारण्यासाठी प्रयत्न करावे.
४) कामगारांचा कार्य जोखीमेला सुरक्षा प्रदान करावी.

**संदर्भ:—**

१) डॉ.घारापुरेविठ्ठल., (२०१८),महाराष्ट्राचा भूगोल, पिंपळापुरे ॲण्ड. कं. पब्लीशर्स, नागपुर.
२) रसाळराजेंद्र. अ.,(२०१०), संख्यात्मक तंत्रे आणि प्रकाल कार्य, सक्सेस प्रकाशन, पुणे.
३) https://www.congnitive market research.com/cotton-ginning-machincemarket-report, report insights.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLX) 460 -B
ISSN : 2278-9308
February 2024

# भारतीय अर्थव्यवस्थेत महिला उद्योजकांची भूमिका

**प्रविण सुभाष देसले**
संशोधक
मु.पो.पिंपळगाव, ता.भडगाव
जिल्हा: जळगांव
मोबाईल:८३२९९२००९१

**डॉ.बी.एस. भालेराव**
मार्गदर्शक
सौ.र.ना. देशमुख कला
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
भडगाव जि. जळगाव

**प्रस्तावना:-**

